म. ग्रं. सं. ठाणे

विषय

विषय क्रमांक

लेखक

पुस्तकाचें नांव

सन



संग्रहालय
१८८

वाग्विलास-रत्नहार.

रत्न १ ले.

# A LUCKY WIFE

OR

# KARPOORMANJARI.

COMPOSED FROM

PRAKRITA OR MAHARASHTRI DIALECT

BY

PT. VAMAN SHASTRI ISLAMPURKAR.

**Bombay:**

PRINTED AT THE "TATTVA-VIVECHAKA" PRESS.

*October* 1890.

Price 12 Annas.

To be had at MESSRS. V. RELE & Co.,

*2nd Carpenter Street, Khetwadi, Bombay.*

[*Registered for Copy-Right under Act XXV. of 1867.*]

वाग्विलास-रत्नहार.

नं. ३६८

रत्न १ लें.

# भाग्यशाली बायको

अथवा

# कर्पूरमंजरी.

हें पुस्तक

पंडित वामन शास्त्री इसलामपुरकर

यांणीं

प्राकृत अथवा महाराष्ट्री भाषेंतील मूळ ग्रंथावरून मराठींत

तयार केलें.

मुंबईंत:—"तत्त्वविवेचक" छापखान्यांत छापिलें.

अक्टोबर सन १८९०.

किंमत १२ आणे.

हीं पुस्तकें विकत मिळण्याचें ठिकाणः

व्ही. रेळे आणि मंडळी. ३ री सुतारगली खेतवाडी, मुंबई.

हें पुस्तक कर्त्यानें सन १८६७ च्या २५
आक्टाप्रमाणें नोंदलें आहे.

# प्रस्तावना.

अत्थणिएसां ते च्चिअ सद्दा तें च्चेअ परिणमंताइं ।
उत्तिविसेसो कव्वो भासा जा होई सा होउ ॥

---

हें लहानसें मनोरंजक पुस्तक महाकवि **श्रीराजशेखर** याणें केलेल्या **कर्पूरमंजरी**नांवाच्या ग्रंथाच्या आधारें तयार केलें आहे. मूळग्रंथ प्राकृत, अर्थात् पूर्वकालीं सर्व साधारण लोकांच्या नित्य व्यवहारांतल्या भाषेंत, रचला आहे. याला सामान्यतः नाटक ह्मटलें तर चालतें; पण प्राचीन ग्रंथकारांनीं नाटकादिकांविषयीं जे विशेष नियम करून ठेवले आहेत त्यांप्रमाणें याला सट्टक हेंच विशिष्ट नांव आहे.

**राजशेखर** हा मोठा नामांकित कवि होता. हा जातीचा क्षत्रिय असून **महाराष्ट्र**देशांत जन्मलेला होता. जरी तो क्षत्रियकुलोत्पन्न होता तरी तो कोणत्याही एका देशाचा राजा अथवा जहागीरदार असावा असें वाटत नाहीं. कारण तसें असतें तर तो **कनोज**-देशचा राजा **महेंद्रपाल** याचा आश्रित झाला नसता. **माधवाचार्यांनीं** केलेल्या **शंकरविजय**नांवाच्या काव्यांत या कवीचें जें वर्णन केलें आहे त्यावरून तो

एक राजा असावा असा जरी भास होतो; तरी त्यावर विशेष भरंवसा ठेवतां येत नाहीं. कारण **राजशेखरा**च्या स्वतःच्या ग्रंथांत जर तो 'रघुकुलचूडामणि जो **महेंद्रपाल** त्याचा आपण गुरू होतों' असें म्हणतो, तर त्याविषयीं संशय घेण्यास मुळींच जागा राहिली नाहीं. **राजशेखराला बालकवि, कविराज** व **निर्भयराज** अथवा **महेंद्रपाल** याचा गुरु इत्यादि नांवांनीं त्याकाळचे लोक ओळखत असत*. **चाहमान** अथवा **चव्हाण** नांवानें प्रसिद्ध असलेल्या क्षत्रियकुलांतली कन्या **अवंतिसुंदरी** ही **राजशेखरा**ची बायको होती. हा कवि आपल्या जीवनसमयीं व त्यानंतरही हांवेळपर्यंत मोठा नामांकित व लोकप्रिय असल्याचें दिसून येतें मोठमोठ्या कवींनीं त्याच्या नांवाचा उल्लेख करून त्याच्याविषयीं आपली पूज्यबुद्धी दाखविल्याचें ठिकठिकाणीं पाहण्यांत येतें. हा कवि अनेक भाषेंत निपुण होता, असेंही दिसून येतें प्राचीनकाळीं संस्कृत ही तर एक मुख्य भाषा झालीच; पण हीशिवाय **महाराष्ट्री, शूरसेनी, मागधी, पैशाची** इत्यादि ज्या अनेक देशभाषा निरनिराळ्या देशांत प्रचलित होत्या; त्या सर्व या कवीला चांगल्या अवगत होत्या स्वतः तो **महाराष्ट्र**

---

* मूळग्रंथाची प्रस्तावना पहा.

असल्यामुळें त्यावेळीं प्रचारांत असलेली भाषा—जिला महाराष्ट्री असें संस्कृतग्रंथकारांनीं म्हटलें आहे ती—याला फारच अवगत असली पाहिजे. प्रकृत पुस्तकाचें मूळ या कवीनें याच महाराष्ट्री भाषेंत रचलें आहे.

आतां हा कवि कोणत्यावेळीं जन्मला किंवा विद्यमान होता, याविषयीं विचार करतां त्यासंबंधानें फार मत-भेद आहे. **माधवाचार्यांच्या शंकरविजयावरून राजशेखर** हा **शंकराचार्यांच्या**वेळीं होता असें दिसून येतें. **शंकराचार्यांचा** काळ कित्येक अर्वाचीन शोध-कांनीं ख्रिस्ती सनाचें नववें शतक ठरविलें आहे; पण जुन्या विद्वानांच्या मताप्रमाणें तो काल फारच मागें, अर्थात् ख्रिस्ती सनाचा उदय होण्याच्याही पूर्वीं कांहीं शतकें, गेला आहे. तेव्हां यासंबंधानें निश्चय कांहींच करतां येत नाहीं. आम्हीं आमच्या भोळ्याभोळ्या वाचकांस इतक्या खोल पाण्यांत शिरण्याचें संकट मुळींच घालीत नाहीं. कारण प्राचीन "इतिहासांतल्या गोष्टींचा शोध लावणारे म्हणून सांप्रतकाळीं जे प्रसिद्ध आहेत त्यांची स्थिति मोठी चमत्का-रिक आहे. ते ऐतिहासिक पुरुषांला एकाजागीं मुळीच बसूं देत नाहींत! एकाला जो आज सातव्या शतकांत मांडतो तो—दुसरें कांहींतरी एखादें प्रमाण मिळालें म्हणजे—

त्याला आपणच कितीएक शतकें मागें ढकलतो किंवा पुढें ओढून घेतो! दुसरा शोधक याहून निराळीच कांहीं व्यवस्था लावतो. असें असल्यामुळें आमच्या देशांतल्या इतिहासांतर्गत पुरुषांची सांप्रत जी कांहीं दुर्दशा होत आहे ती सांगतां पुरवत नाहीं. विचारे मरून कित्येक वर्षे होऊन गेलीं; तरी त्यांचा कर्मभोग कसा ओढवला आहे तो पहा! आधीं सर्वसाधारण समजुतीप्रमाणें विद्वान् म्हटलें म्हणजे तो **लक्ष्मीच्या** कृपाकटाक्षाला पात्र असायचा नाहीं. तेव्हां ज्या ग्रंथकारांच्या माहितीविषयीं सांप्रत वाटाघाट चालली आहे ते बहुतकरून दरिद्रीच असायचे. अर्थात् त्यांच्या जीवनसमयांत त्यांला एकत्र स्थिति वगैरे असण्याचा संभव कमी. कनकसंपादना-करितां त्यांला नेहमीं भटकत फिरावें लागलेंच असेल. जिवंतपणची ही गोष्ट झाली. मेल्यावर तरी त्यांना एकत्र स्थितीचा लाभ घडावा कीं नाहीं; पण तोदेखील त्यांच्या नशीबीं नाहीं! त्यांच्या हयातींत त्यांचा काळ तरी एक होता; पण सांप्रत आमच्या विद्वान् शोधकांच्या चढा-ओढीनें त्यांना स्थळ व काळ या दोघांचाही लाभ अंतरला आहे. नेहमीं या स्थळाहून त्यास्थळीं व या काळां-तून त्याकाळांत त्यांचें परिभ्रमण चाललेंच आहे! शोधक-

मंडळी तसें करतात ते खुशाल करोत बापडे; पण आमच्या वाचकांकडून तरी त्यांला विश्रांति मिळो! म्हणून त्या-विषयीं आम्ही येथें विशेष विवेचन करीत नाहीं.

या पुस्तकाचा नायक राजा **चंडपाल** हा होय. नायिका **कर्पूरमंजरी**. या उभयतांच्या संबंधानें विशेष कांहीं माहिती मिळत नाहीं. **चंडपाल** हा **चंपानगरीचा** राजा होता, व **कर्पूरमंजरी** ही **कुंतलदेशाच्या** राजाची मुलगी होती, इतकेंच कायतें मूळावरून समजून येतें. तथापि या ग्रंथाचें संविधानक केवळ कपोलकल्पित असेल असें वाटत नाहीं. कवीनें रसाला अनुगुण होईल अशारितीनें संविधानकाची योजना—कांहीं काल्पित भाग मध्यें घालून—केली असेल; तथापि यांतील नायक, नायिका वगैरे मुख्य पात्रें खरोखरीं त्याकाळीं झालेलीं असावींत असें वाटतें. असो. आणखी पुष्कळ लिहिण्यासारखें आहे, तथापि या लहानशा पुस्तकाला मोठी प्रस्तावना जोडली तर ती अवजड दिसेल म्हणून विशेष विवेचन न करतां यथामति जें कांहीं करतां आलें व तें जसें झालें तसें हें वाचकांस सादर केलें आहे. यांतील गुण अथवा दोष ज्यांला जे घ्यावेसे वाटतील ते त्यांणीं घ्यावे, हें आम्ही सांगायला कशाला पाहिजे? त्यांच्या इच्छेप्रमाणें तें होणारच आहे

तेव्हां प्रार्थना करण्यासारखें कांहीं, नाहीं इतकें सांगितलें ह्मणजे झालें.

ही लहानशी प्रस्तावना पुरी करण्यापूर्वी आमच्या प्रिय वाचकांविषयीं आभार प्रदर्शित केले पाहिजेत. गेल्या तीन वर्षांत निव्वळ मराठी पुस्तकें सुमारें १२–१३ रचून प्रसिद्ध करण्यांत आलीं. वाचकांनीं त्यांचा जो स्वीकार केला त्यावरून आह्मी आरंभलेला उद्योग तसाच अव्याहत पुढें चालविण्याविषयां विशेष उमेद आली, हें कळविण्यास फार आनंद वाटतो. व वेळ्यावांकड्या आमच्या कृतीचें त्यांच्याकडून जें अभिनंदन झालें त्याबद्दल मनापासून त्यांचे आह्मी आभारी आहों. तसेंच ज्या सर्वशक्ति परमेश्वरानें साधनांची अनुकूलता करून हें काम आमच्याहातून इतके दिवस अव्याहत चालविलें त्या समर्थ व दीनदयाळ जगदीश्वराच्या चरणारविंदाला नमस्कार करून व सर्वप्रकारें त्याचें साह्य मागून लेखणी खालीं ठेवितों.

मुंबई, गिरगांव,

ता. २०।१०।९०.

धामनशास्त्री इसलामपुरकर.

# वाग्विलास-रत्नहार.

या नांवाखालीं लहान लहान मराठी पुस्तकें प्रसिद्ध केलीं जातील. या रत्नहारांत जीं रत्नें ओंवा-यचीं तीं सर्व संस्कृत इत्यादि भारतवर्षीय प्राचीन भाषांतील ग्रंथांतून निवडलीं जातील. बहुतकरून काव्यें, नाटकें, आख्यायिका व ऐतिहासिक पुरुषांचीं चरित्रें ज्या ग्रंथांत समाविष्ट असतील त्यांचाच यांत संग्रह होईल. कोणत्याही ग्रंथाचें अक्षरशः भाषांतर देण्याचा क्रम बहुतकरून ठेविला जाणार नाहीं. तर त्याचा सारांश महाराष्ट्र वाचकांच्या रुचीस अनुरूप होईल अशारितीनें सोप्या व सरळ आणि चटकदार भाषेंत लिहिला जाईल. यांत केवळ मनोरंजक पुस्तकांचाच संग्रह करावयाचा नसून ऐतिहासिक, बोधपर व नीतिपर इत्यादि अनेक उपयुक्त विषयांवरच्या लहान लहान पुस्तकांचा संग्रह करण्यांत येईल. या रत्नहारापैकीं प्रकृत पुस्तक अर्थात् '**भाग्यशाली बायको** अथवा **कर्पूरमंजरी**' हें, पहिलें रत्न होय. पुढच्या सर्व रत्नांचा टाईप, सांचा, छपाई वगैरे अगदीं एकसारखी असून बायंडिंगही याप्रमाणेंच उत्तम करण्यांत येईल.

## रत्न २ रें.

# मंत्रभेदाचा परिणाम अथवा मुंजराजाचा शोचनीय मृत्यु.

( छापत आहे )

हें पुस्तक प्राचीन इतिहासांत मिळालेल्या माहिती-वरून तयार केलें आहे. त्यांत धारेचा राजा **मुंज** याला दक्षिणेंतील **कल्याणपुरचा** राजा **तैलप** यानें जिंकून आपल्या येथें कैद करून ठेविलें असतां **मुंजरा-जानें** तेथून पळून जाण्याची तयारी केली होती ती **तैलप** राजाची बहीण—जी त्याची बायको झाली होती—तिला सांगितल्यावरून तिणें, **मुंजराजाला** कोणत्याहीरितीनें येथें ठेवून घ्यावें याहेतूनें, आपल्या भावाला कळविली. तेव्हां त्याणें **मुंजाचे** हाल व अप्रतिष्ठा करून त्याला ठार मारिलें. व त्यादुःखानें **तैलपाच्या** बहिणीनेंही देहत्याग केला. ही हृदयद्रावक गोष्ट वर्णन केली आहे. हींत—राजेलोक राजकीय कामांत आएले आप्त, सोयरेधायरे इत्यादिकांस किती मानतात वगैरे गोष्टींचें मनोवेधक वर्णन आलें.

**मुंबई**, गिरगांव. **वा० शा० र०**

ता० २०। १०। ९०. **वाग्विलास-रत्नहार** कर्त्ते.

ॐ नमः श्रीगणेशाय.

# कर्पूरमंजरी

भद्रं भवतु सरस्वत्याः कवयो नन्दन्तु व्यासादयः
अन्येषामपि परं प्रवर्ततां वरा वाणी विदग्धप्रिया ।
वैदर्भी तथा मागधी स्फुरतु नः सा किं च पाञ्चालिका
रीतिका विलिहन्तु काव्यकुशला ज्योत्स्नां चकोरा इव ॥

**चंपा**नगरींत **चंडपाल**नांवाचा राजा महाप्रतापी असून स्वधर्मनिष्ठ व सर्वकार्यनिपुण असा होता. त्याची दक्षिणदेशच्या राजाची कन्या **विभ्रमलेखा** नांवाची राणी होती. राजाला सर्वप्रकारचें ऐश्वर्य अनुकूल होतें. प्रजा त्याच्यावर अनुरक्त होत्या. प्रधान व इतर कामगार लोक आपल्या यजमानाविषयीं विशेष अगत्य बाळगणारे होते. तरी राजा **चंडपाल** हा सार्वभौम नव्हता. त्याचें राज्य लहान असून वेताबाताचेंच होतें.

शूर असून उदार अशा पुरुषांला वंशपरंपरेनें जें कांहीं मिळालें असेल तेवढ्यावरच संतुष्ट होऊन कालक्रमण करणें हें मुळींच आवडत नाहीं, त्याप्रमाणें **चंडपाल**राजाच्या

मनांत फार मोठी इच्छा उत्पन्न झाली होती. आपल्याला सार्वभौमपदवी प्राप्त व्हावी असें त्याच्या मनांत होतें. व त्याविषयीं त्याची एकसारखी तयारी चालली होती. त्यांत दुसरें एक शुभ चिन्ह झालें.

एकेदिवशीं राजा **चंडपाल** आपल्या राणीसहवर्तमान बागेंतल्या महालाच्या गच्चीवर वसंतऋतूची शोभा पाहत बसला होता. **कपिंजल** नांवाचा एक ब्राह्मण राजाचा समवयस्क असून परम मित्र होता. थट्टामस्करी करून राजा व राणी यांचें मनरंजन करणें व त्या उभयतांतल्या प्रेमकलहांत मध्यस्थी करणें, व अनेक प्रकारच्या चैनीच्या गोष्टींत राजाला साह्य करणें हीं **कपिंजलाचीं** मुख्य कामें होतीं. दरबारच्या कामाचा वेळ खेरीज करून राजाला **कपिंजला**वांचून क्षणभरदेखील चैन पडत नव्हती.

यावेळीं राजा वसंताची शोभा पाहत बसला होता; तेव्हां त्याच्याबरोबर **कपिंजल** होता व राणी **विभ्रमलेखा** इच्याबरोबर **विचक्षणा**नांवाची दासी होती. राजा राणीला ह्मणाला, 'देवि, **दक्षिणापथ*** नरेन्द्रतनये,

* सांप्रत दक्षिणप्रांत अथवा महाराष्ट्रदेश किंवा इंग्रेजींत Deccan असें ज्याला ह्मणतात. त्या प्रदेशालाच पूर्वी **दक्षिणापथ** अर्थात् दक्षिणेकडचा प्रदेश, असें ह्मणत होते.

ह्या वसंताच्या आरंभानें तूं फार शोभतेस.' पहा, सांप्रत ह्या वसंतऋतूचा प्रभाव जिकडेतिकडे कसा पसरला आहे तो! हा ऋतु प्राप्त झाल्यामुळें थंडीच्या दिवसांप्रमाणें स्त्रिया आपल्या ओंठाला लोणी इत्यादि मृदु होण्याचे पदार्थ लावीत नाहींत, सुगंधी तेल लावून वेण्या घालीत नाहींत, कारण केंस चिकचिकित झाल्यानें त्यांनां त्याचा कंटाळा येतो. हवा उष्ण असल्यामुळें अंगांत चोळ्या घालाव्या असें त्यांना वाटत नाहीं. तरुण स्त्रिया—घामानें पसरतें ह्मणून—कुंकूंदेखील लावण्याविषयीं शिथिलादर झाल्याचें दिसून येतें. यावरून शिशिरऋतूला बलात्कारानें मागें सारून हा वसंतोत्सव पुढें सरला असें वाटतें.'

याप्रमाणें राजानें वसंतऋतूचें वर्णन केलें तें ऐकून राणी **विभ्रमलेखा** म्हणाली, 'आर्यपुत्र, जसें आपण वसंताचें वर्णन केलें तसें मीही आपल्याबरोबर वर्णन करतें. पहा, थंडीचे दिवस गेल्यामुळें दांत शिवशिवत नाहींत. हल्लीहल्लीं, चंदनाचा शीतल रस अंगाला लावण्याविषयीं लोक इच्छा करितात. सांप्रत उष्णकाल प्राप्त झाल्यामुळें स्त्रीपुरुष आपापल्या घरांतील उंच व हवाशीर प्रदेशांत निजण्याची इच्छा करितात. निजतेवेळीं पांघरण्याकरितां बिछान्यावर ठेविलेलें वस्त्र पायांकडे तसेंच

असतें. थंडी नसल्यामुळं तें पांघरण्याची इच्छाच होत नाहीं.'

याप्रमाणें राजा आणि राणी वसंताचें वर्णन करीत आहेत तों एका बाजूला उभाराहिलेला भाट राजाचे वर्णन करूं लागला. तो वसंताला उद्देशून म्हणाला, 'पूर्वदिशारूप स्त्रीची इच्छा करणारे' **चंपा**नगरीला केवळ भूषणभूत, **महाराष्ट्र**देश ज्यांनीं लीलेनें जिंकला आहे, ज्यांच्या पराक्रमानें **कामरूप**देश नम्र झाला आहे, जे स्त्रियांशीं अनेक प्रकारच्या लीला करणारे ज्यांच्या अंगाच्या कांतीनें उत्तम सुवर्णाचाही रंग तुच्छ केला आहे, ज्यांचीं सर्व अंगें सुंदर आहेत, अशा हे प्रभो महाराज, हा वसंताचा आरंभ आपल्याला सुखकारक होवो!

सांप्रत, **पांड्य**देशांतल्या स्त्रियांच्या गालांवर रोमांच उभे करणारे, **चोल*** देशांतील स्त्रियांना उत्सुक करून आपल्या पतीच्या भेटीविषयीं; मान अभिमान वगैरे सर्व एकीकडे ठेवून प्रवृत्त करणारे, **कर्नाटक**देशांतील स्त्रियांचे आंखूड केंस हालविणारे, **कुंतल**देशांतील

* दक्षिणेंत तंजावर व कुंभकोण नांवाच्या प्रसिद्ध शहरांच्या आसपासचा प्रदेश, अर्थात् कावेरीनदीच्या किनाऱ्यावरचा मुलूख यालाच पूर्वकाळीं व सांप्रतही चोलदेश म्हणतात.

स्त्रियांची आपल्या पतीशीं प्रेमाची गांठ बांधणारे, असे हे मलय* पर्वतावरचे सुगंध व शीतल वायू वाहत आहेत.'

याप्रमाणें एका भाटानें वर्णन केलें, तों दुसरा पुढें सरला. तो म्हणाला, 'ज्यांला हळद लाविली आहे अशा महाराष्ट्रदेशांतील स्त्रियांच्या गालांप्रमाणें हीं केतकीचीं फुलें पिवळीं जर्द झालीं आहेत. तशींच दुधाच्या भोंवऱ्यासारखीं सफेत दिसणारीं हीं मोगरीचीं फुलें उमललीं आहेत. देंठाकडे किंचित् काळसर असून ज्यांच्या शेवटांवर भ्रमर बसले आहेत अशीं हीं पळसांचीं फुलें, दोन दिशेला लागलेल्या भ्रमरांनीं जणुंकाय दोहोंकडून प्राशन केलीं आहेत अशीं दिसतात.'

---

* सह्याद्रि नांवाच्या पर्वताची ओळ समुद्राच्या किनाऱ्या किनाऱ्यानें दक्षिणेकडे फार दूरवर गेली आहे. याला सह्याद्रि हें मुख्य नांव आहे; तरी निरनिराळ्या ठिकाणीं दुसरीं अनेक नांवें पडलीं आहेत. केरल अथवा सांप्रत ज्याला मलबार म्हणतात त्या देशाच्या भागांत ह्या पर्वताला मलयाचल असें नांव प्राप्त झालें आहे. चंदनाच्या उत्पत्तीचें मुख्य स्थान हाच मलयाचल होय. वसंतऋतूंत अर्थात् उन्हाळ्यांत दक्षिणेकडून वारा वाहत असतो. व तो मलयपर्वतावरून येतो. ह्मणून त्याला मलयानिल असें ह्मणतात. ह्या पर्वतावरील चंदनाचा वास तो दक्षिणवात फार दूरवर पोहोंचवितो ह्मणून विलासी जनांला त्याचा स्पर्श मोठा आनंदकारक वाटतो.

दोघां भाटांनीं ह्याप्रमाणें वर्णन केलें तें ऐकून राजा राणीला म्हणाला, 'प्रिये **विभ्रमलेखे**, तुला उद्देशून वंसतांचें वर्णन करणारा मी एकटाच होतों व तूंही मला उद्देशून त्याचें वर्णन करणारी एकटीच होतीस. पण, सांप्रत आह्मी दोघेंही **कांचनचंड** आणि **रत्नचंड** या दोघां भाटांच्या वर्णनाला पात्र झालों आहों, तर तरुण स्त्रियांना विलासाच्या चाळ्यांचा गर्व उत्पन्न करणाऱ्या **मलयमारु**तानें हालविलेल्या वेली ह्याच कोणी नर्तकी, त्यांला नाचविणारा; ज्यांचा कंठ अत्यंत मधुर आहे अशा कोकिलांच्या शब्दांनीं ज्यानें पंचम* रागाचा उत्तम प्रकारें आलाप केला आहे, व त्या योगानें मदनाच्या धनुष्याचा कठोरपणा स्तंभित केला आहे असा; सुखी असलेल्या स्त्रीपुरुषांचा स्नेह वाढविणारा परम मित्र जो हा वसंतसमय त्याची शोभा, कानांपर्यंत विस्तार पावलेल्या विशाल नेत्रांनीं तूं अवलोकन कर.'

---

* सांप्रत गाणारे लोक निरनिराळ्या अनेक रागांचीं नांवें घेतात तरी त्यांत शुद्धराग फारच थोडे आहेत. **भैरव, पंचम, नट, मल्हार, गौडमालव**, आणि देस हे सहाच मुख्य राग आहेत, असें प्राचीन ग्रंथकार म्हणतात. त्याप्रमाणें पंचम नांवाचा एक राग आहे, असें सिद्ध होतें. कोकिलांचा स्वर पंचमावर लागतो हें प्रसिद्ध आहे, व म्हणूनच वर तसा उल्लेख केला आहे.

मग विभ्रमलेखा ह्मणाली, 'ह्या भाटांनीं वर्णन केलें तें अगदीं खरें आहे. मलयानिल प्रवृत्त झाले ह्यांत कांहींच संशय नाहीं. ते पहा, लंका* नगरीच्या वेशीवर लावलेल्या पताका हालविणारे, अगस्त्यऋषीच्या आश्रमांतील† चंदनाच्या वेली हळू हळू हालवून त्यांचा सुवास ग्रहण करणारे, कंकोळांचे घोस कंपित करणारे, नागवेलींनीं पानें हालवून त्यांना नर्तकी बनविणारे, ताम्रपर्णी‡

---

* लंकानगराचें एक बेट थेट दक्षिणेस सुमारें चारशें कोसांच्या अंतरावर समुद्रांत आहे. सांप्रतचे शोधकलोक सिलोन अथवा सिंहल या नांवानें जें बेट प्रसिद्ध आहे तेंच लंका असें ह्मणतात. पण प्राचीन पौराणिक ग्रंथांत याला कांहीं आधार नाहीं. भागवत नांवाच्या पुराणाच्या पांचव्या स्कंधांत भूगोल वर्णन केलें आहे तेथें जंबूद्वीपाच्या सभोंवती नऊ उपद्वीपें असल्याचें वर्णन करून लंका व सिंहल हीं दोनही निरनिराळीं असून त्या नऊ उपद्वीपांतच त्यांची गणना केली आहे.

† अगस्त्यऋषीचा आश्रम दक्षिणदिशेकडे आहे. सांप्रत चेन्नपट्टण अथवा मद्रास या नांवानें जें शहर प्रसिद्ध आहे, तेथेंच अगस्त्याचा आश्रम असल्याचें वर्णन करितात. व तेथे कांहीं खाणाखुणाही दाखवितात.

‡ ताम्रपर्णी या नांवाची नदी दक्षिणेस पांड्य नांवाच्या देशांतून वहात जाते. सांप्रत तिरुनेल्वेली या नांवानें जें शहर

नदीच्या उदकाचा स्पर्श करून तिचे तुषार हरण करणारे, असे हे चैत्र मासांतील वायु वाहत आहेत खरे.

तसेंच ह्या चैत्रमहोत्सवांनें भगवान् कामराजा याची– *'गर्व सोडा, आपल्या प्रियपतीवर प्रेमदृष्टि द्या, तारुण्य हें फार थोडेदिवस राहणारें आहे. तशीच शरीरांची तरतरीही दहापंधरा दिवसांची, अर्थात् फार थोड्या दिवसांची सोबतीण आहे. याकरितां उगीच आपल्या पतीला दुःख देऊं नका.' अशी आज्ञा कोकिलांच्या मधुरशब्दाच्या मिषानें चहूंकडे जाहीर केली आहे.'

याप्रमाणें राजा, राणी व भाट यांनीं वसंतसमयाचें निरनिराळ्या रीतीनीं वर्णन केलें. तें ऐकून कपिंजलालाही स्फुरण आलें. तो म्हणाला, 'अहो, तुम्ही

प्रसिद्ध आहे, तें ह्या नदीच्या काठीच वसलेलें असून त्याच प्रदेशाला पूर्वी पांड्यदेश म्हणत असत.

* या वाक्यांतील अर्थ सामान्य समजुतीच्या वाचकांच्या लक्षांत येण्यास अमळ कठीण आहे. कोकिलांचा मधुर शब्द विलासिजनांला फार मोहक वाटतो. कोकिल वसंत ऋतूंतच शब्द करितात. तेव्हां त्यांचा शब्द ऐकून आपल्या प्रिय पतीवर रागावलेल्या व ताठ्यानें त्याला अनुकूल न होणाऱ्या स्त्रिया कोकिलांचा मधुर शब्द श्रवण करून उत्कंठित होत्सात्या गर्व सोडून आपोआप आपआपल्या पतीला अनुसरतील, असा अभिप्राय.

आपापल्यांतच सर्व वर्षाव करीत आहां. माझ्याकडे मुळींच कोणी पाहत नाहीं. तर काय तुमच्या मंडळींत मीच एकटा अक्षरशत्रु आहें? खरें विचाराल तर अस्मादिकांचें पांडित्य कांहीं निराळ्या प्रकारचें आहे. आमच्या सासऱ्याचे सासरे हे एका मोठ्या पंडिताच्या घरीं पोथ्यांचे भारे वाहण्याच्या कामावर नेमलेले होते! असें असून तुम्ही मला मान देत नाहीं हें काय?'

कपिंजलाच्या या प्रश्नावर राजानें अथवा राणीनें कांहींच उत्तर दिलें नाहीं. राणीनें हळूच आपली दासी विचक्षणा हिला इषारा केला. तेव्हां ती हंसतहंसत कपिंजलाला म्हणाली, 'भटजीपुत्रा, तर मग वंशपरंपरेनेंच तुम्हांला पांडित्य आलें आहे म्हणावयाचें!'

विचक्षणेच्या बोलण्याचा अभिप्राय कपिंजलाच्या लक्षांत आला. आणि तिनें आपली थट्टा केली, असें समजून रागावून तो तिला म्हणाला, 'अग चटकीचे कारटे; थेरडी झालीस म्हणून कुंटीण होणारे, निर्लक्षणे, मूर्खे, अग मी इतका मूर्ख आहें का? कीं ज्याची तुझ्या सारख्या बटकुरानेंदेखील थट्टा करावी? आणखी असं पहा का, अग दुसऱ्याच्या तरुण मुलांना फसविणारे, बाजारबसवे, उगीच टं टं टं काय करतेस? अग हातातील कांकण

आरशांत पाहिलें पाहिजे काय? माझ्या अंगीं पांडित्य आहे किंवा नाहीं तें आपल्या आपणच दिसेल.'

याप्रमाणें **विचक्षणा** आणि **कपिंजल** या दोघांची जुंपवून राजा आणि राणी स्वस्थ मौज पाहत बसलीं. **विचक्षणा कपिंजलाला** ह्मणाली, 'अरे भट्या, तूं ह्मणतोस तें खरें. घोडा जलद चालतो किंवा नाहीं याचा निर्णय करण्यास साक्षीदारांची गरज नाहीं. बरें आतां काय उजेड पडणार तो पडूं दे. तूं ह्या वसंताचें वर्णन कर ह्मणजे झालें.'

हें ऐकून **कपिंजल** ह्मणाला, 'अग चटकिचे, तूं पिंजऱ्यांतील मैनेसारखी उगीच फुरफुर करीत असतेस; पण तुला मुळींच कांहीं समजत नाहीं. तेव्हां तुझ्या पुढें वर्णन करण्यांत काय अर्थ आहे? मी आपला माझा प्रिय मित्र (राजा) आणि राणीसाहेब यांच्या पुढें आपली कविताशक्ति दाखवीन. कारण कस्तुरी गांवढ्या गांवांत किंवा जंगलांत विकली जात नाहीं. तसेंच सोन्याची परीक्षा कसोटीवरच केली जाते, सामान्य दगडावर केली जात नाहीं.'

राजाला त्या दोघांचें भांडण लावून देऊन घटकाभर मजा पहावयाची होती. तो **कपिंजलाला** ह्मणाला, 'गड्या **कपिंजला**, हे पहा, आह्मी कविता ऐकण्यास

[library stamp]

तयार आहों. तर तूं कसें काय वसंताचें वर्णन करतोस, तें पाहूंया बरें.'

राजानें सांगितल्यावरून कपिंजलाला समाधान वाटलें. तो मान हालवून म्हणालाः-

पुष्पोत्करा कलमकूरसमा वहाती ।
जे सिन्धुवारविटपी मज मान्य होती ॥
जे गाळिल्या महिषिच्या दधिशीं समान ।
ते कां न सुंदर विकासित पुष्पपुंज ॥ १ ॥

कपिंजलाच्या वर सांगितलेल्या कवितेंत दहींभातावांचून दुसरें महत्वाचें असें कांहींच नव्हतें. तें ऐकून **विचक्षणा** हंसतहंसत ह्मणाली, 'काय उत्तम कविता पण! अहो **कपिंजल** भट्टजी, तुमचें हें वर्णन फक्त आपल्या बायकोला रंजविण्याच्या कामीं मात्र उपयोगी पडेल. यावांचून त्यांत कांहींच अर्थ नाहीं.'

**कपिंजल** ह्मणाला, 'बरं, आमचें असूंदे आपलें तसें. आतां तुमचा काय उत्तम कवित्वाचा मासला आहे तो एकदां बाहेर पडूंद्या.'

हें ऐकून **विचक्षणा** उगीच राहिली. तेव्हां राणी तिला ह्मणाली. 'अग **विचक्षणे**, आमच्या मंडळींत बसलीस ह्मणजे तूं आपल्या कवितेचा मोठा ताठा मिरवितेस.

तर सांप्रत आर्यपुत्राच्या पुढें कायती तुझी कविता म्हण पाहूं. कारण त्यालाच काव्य म्हणावें कीं, जें रसिकाच्या सभेंत म्हणण्याला योग्य असेल. त्यालाच सुवर्ण म्हणावें कीं, जें कसोटीवर उत्तम ठरेल. तिलाच गृहिणी म्हणावी कीं, जी आपल्या पतीचें मनरंजन करील त्यालाच पुत्र म्हणावा कीं, जो आपल्या कुलाचा लौकिक वाढवील. तर यावेळीं कायती तुझी कविता पुढें येऊंदे.'

राणीचें हें भाषण ऐकून **विचक्षणा** म्हणाली, 'मी कांहीं तशी उत्तम कवन करणारी आहें असें नाहीं. तरी आपली आज्ञा असेल तर मला येईल तसें वसंताचें वर्णन मी करितें:—

जे लंकागिरिमेखलास्खलितही संभोगखिन्नोरगी ।
वारंवार पिऊनि* ज्यांसि करिती वाळें दरिद्रापरी ॥
ते हे सांप्रत होउनी विरहिणीनिःश्वाससंपर्कित † ।
बालत्वा त्यजुनी युवे मलयिचे वायू कसे वाहती ॥१॥

* नाग मुळ्यलें वायु भक्षण करितात अशी प्रसिद्धि आहे. थकलेल्या नागिणींनीं पिऊन टाकल्यामुळें वायु अगदीं कृश व क्षीण झाले असा अभिप्राय. विरहिणी स्त्रियांना इतर ऋतूंपेक्षां वसंत फारच दुःखद होतो.

† मलयानिलाच्या स्पर्शानें मनोविकार अनावर होऊन प्रियसमा-

विचक्षणेची ही कविता ऐकून राजा म्हणाला, 'खरोखरच ही विचक्षणा मोठी विचक्षण आहे. हिची वर्णन करण्याची शैली विशेष चातुर्याची आहे. फार काय सांगणें ही मोठ्या कवीपेक्षांही श्रेष्ठ आहे.'

राणीला ह्यावेळपर्यंत विचक्षणेच्या कवित्वाविषयीं विशेष खात्री नव्हती. वायकांच्या सभेंत ही उगाच आपली प्रौढी मिरविते असें तिला वाटत होतें. पण सांप्रत राजानेंही तिच्या कवित्वाची तारीफ केली. तेव्हां राणीची तिच्या त्या गुणाविषयीं विशेष खात्री झाली. ती ह्मणाली, 'आपणदेखील इच्या कवित्वाची प्रशंसा करतां तेव्हां ही कविचूडामणीच झाली आहे यांत संशय नाहीं.'

राजाच्या मनांत कांहीं तरी करून कपिंजलाला खिजवावयाचें होतें, त्यानें व राणीनें विचक्षणेची स्तुती केली हें कपिंजलाला सहन झालें नाहीं. तो रागावून ह्मणाला, 'असें मोघम कशाला ह्मणतां? ही विच-

---

गम होत नाहीं ह्मणून त्या दुःखित होऊन जे सुसकारे सोडतात, त्यांची भर पडल्यामुळें नागिणींनीं प्राशन करून कृश केलेले वायु भरगच्च होऊन जातात, असा याचा अभिप्राय.

क्षणा कविता करण्यांत उत्तम. व कपिंजल ब्राह्मण अधम असें सरळच कां ह्मणानां?'

**विचक्षणा** ह्मणाली, 'आर्या **कपिंजला,** असा रागावूं नकोस. कवित्वाचा गुण ज्याचा त्याच्या काव्यांतच दिसून येतो. तुझें काव्य केवळ आपल्या बायकोला खुष करून रंजविण्याच्याच योग्यतेचें आहे. तुझ्या कवितेचा विषय अगदीं हलक्या प्रतीचा असून तूं कोमल शब्दांनीं त्याचें वर्णन केलेंस तें शोभत नाहीं. उतार वयाच्या स्त्रीला मोत्यांचा सर काय उपयोगाचा? अथवा तिच्या कटाक्षांत तरी काय अर्थ आहे? तूंच पहा; कीं जिचा केशकलाप कापलेला असेल तिला मोगरीच्या फुलांचा गजरा काय कामाचा? आंधळ्या मनुष्याच्या डोळ्यांत काजळ घालावें, त्याप्रमाणें तूं निंद्य अर्थ चांगल्या शब्दांनीं वर्णन करण्यास प्रवृत्त झालास. यामुळें तुझी कविता चांगली वाटत नाहीं.'

**कपिंजल** ह्मणाला, 'तुझीदेखील कविता चांगली नाहीं. तूं विषय चांगला घेतलास; पण शब्दरचना तुझी चांगली नाहीं. सोन्याच्या कंबरपट्याला लोखंडाच्या घागऱ्या लावाव्या त्याप्रमाणें, अथवा स्वतःसिद्ध गौरवर्ण असलेल्या स्त्रीच्या अंगाला चंदन लावावें त्याप्रमाणें तुझी

कविता चांगली शोभत नाहीं. तरी पण बाई तुझें दैव बरें आहे, ह्मणून राजा आणि राणी तुझी तारीफच करीत आहेत ! व लोकही तुला मोठी कवयित्री ह्मणतात.'

**विचक्षणा** ह्मणाली, 'आर्या, माझ्या बोलण्याचा राग आणूं नकोस. खरें ह्मणशील तर या कामांत मी तुझ्याशीं प्रतिस्पर्धा करावी-यांत काय अर्थ आहे? कारण तूं निरक्षर आहेस ; तरी लोखंडाच्या सळीप्रमाणें रत्नांच्या तुलेंत तुझा उपयोग केला जातो. आणि मी विदुषी साक्षर आहें, तरी तराजूला जसा सोन्याचा संपर्क होत नाहीं तसा मला मोठेपणाचा एक रजदेखील मिळत नाहीं.'

यावर **कपिंजल** रागावून ह्मणाला, 'तूं मला असें घालून पाडून बोलतेस याकरितां **युधिष्ठिराच्या** वडील भावाचें (**कर्णाचें**) नांव धारण करणारे तुझे डावे आणि उजवे अवयव ( अर्थात् कान ) उपटून हातावर देईन !'

**विचक्षणा** ह्मणाली, 'तूं तरी इतका शेफारूं नकोस **उत्तराफाल्गुनी** नक्षत्राच्या पुढच्या नक्षत्राचें नांव धारण करणारें तुझें अंग (अर्थात् हस्त) तोडून टाकीन !

याप्रमाणें दोघेंही हातघाईवर आलेलीं पाहून राजा **कपिंजलाला** ह्मणाला. 'गड्या, तूं ज्या त्या कामांत

असा एकेरीवर येतोस हे काय? त्या **विचक्षणेला** उगीच वांकडें तिकडें बोलूं नकोस. खरोखरच ती मोठी उत्तम कवयित्री आहे.'

, **कपिंजल** ह्मणाला, 'तर मग असें म्हणा कीं, आमची बटीक **हरिचंद, नंदिचंद, कोटिश, हाल** इत्यादि जे मोठमोठे कवी पूर्वी होऊन गेले त्यांच्या पेक्षांही मोठी कवयित्री आहे.'

राजा म्हणाला, 'यांत काय संशय आहे! खरोखरच ती उत्तम कविता करते.'

राजाचें हें बोलणें **कपिंजलास** अगदीं सहन झालें नाहीं. तो अतिशय क्रुद्ध होऊन तेथून जाण्यास निघाला. तेव्हां **विचक्षणा** ह्मणाली, 'जाजा, मी तें बोंडळ उकिरड्यावर टाकलें आहे तिकडे जा! तुझी योग्यताच तितकी.'

**कपिंजल** जातां जातां मागें तोंड फिरवून ह्मणाला, 'अग बटकी, तूंही जा. माझ्या भ्रात्याच्या आईचे दांत पडले तेव्हां तिनें पडलेला दांत प्रथमच ज्याठिकाणीं टाकला तिकडेच तूं जा!' राजाला उद्देशून ह्मणाला, 'असल्या राजदरबाराला नमस्कार असो! जेथें बटकीची कार्टी ब्राह्मणाबरोबर टक्कर मारायला तयार होते, त्या दर-

वाराला काय म्हणावें? मदिरा आणि पंचगव्य एकाच भांड्यांत घालून विकावें, अथवा कांच व रत्न एकाच दागिन्यांत गुंफावें त्याप्रमाणें या दरबारांत ब्राह्मण आणि वटकी सारख्याच आहेत!'

यावर **विचक्षणा** म्हणाली, 'भगवान् **महादेव** ज्याला आपल्या मस्तकावर धारण करितो तो, अर्थात् अर्धचंद्र (गचांडि) या दरबारांत तुला बक्षीस मिळो! आणि अशोक वृक्षाला ज्याच्या योगानें दोहद* मिळतें, त्यानें तुझें तोंड चांगलें ठेंचलें जावें म्हणजे बरें होईल.'

**कपिंजल** रागानें तसाच पुढें जाऊन म्हणाला, 'असल्या राजघराण्याला दुरूनच नमस्कार करावा! जेथें वटकी ब्राह्मणा बरोबर स्पर्धा करितात तेथें रहाण्याची काय शोभा आहे? मी तर पुनः या दरबारांत कधींही येणार नाहीं. आजपासून मी आपली घरकरीण **वसुंधरा** नांवाची ब्राह्मणी, हिच्या पायांची सेवा करून खुशाल घरांतच राहीन!' असें बोलून **कपिंजल** निघून गेला.

---

* अशोक वृक्षाला तरुण व सुस्वरूप स्त्रीनें लाथ मारली असतां त्याला फुलें येतात असें प्राचीन ग्रंथांत वर्णन केलें आहे. 'दोहद' म्हणजे फुलें येण्याचा उपाय.

**कपिंजला**च्या बोलण्याचें सर्वांस हंसूं आलें; पण तो गेल्यामुळें एक गमतीचें साधन गेलें असें समजून राणी राजाला ह्मणाली, 'आर्यपुत्र, आपला **कपिंजल** गेला, त्याच्यावांचून आतां गोष्टी काय कराव्यात. डोळ्यांत काजळ घातल्यावांचून चट्टीपट्टी करण्यांत अर्थ नाहीं. त्याप्रमाणें **कपिंजला**वांचून विनोद करण्यांत कांहीं मजा नाहीं.'

**कपिंजल** रागानें खालीं निघून गेला होता; तरी त्याचें मन इकडेच गुंतलें होतें. व तो जवळच, इकडे काय बोलतात तें ऐकत उभा राहिला होता. वस्तुतः यावेळीं त्याला कोणी बोलवायास गेलें नव्हतें. तरी राणीनें त्याचें नांव घेतलें तेवढ्यावरूनच ती आपल्याला बोलावीत आहे असें समजून तो रागानें तेथूनच ह्मणाला, 'नाहीं नाहीं. मी कधीं यायचा नाहीं. दुसरा कोणी तरी प्रिय मित्र पहा. अथवा ती दुष्ट वटीक वाकड्या ओठाची व टपोऱ्या कानांची **विचक्षणा** हिला माझा वेष देऊन माझ्याजागीं थट्टा करण्याचें साधन करा. मी आज मेलोंच असें समजा. तुम्हां सर्वांला उदंड आयुष्य असो!'

हें त्याचें बोलणें ऐकून **विचक्षणा** म्हणाली, 'महाराज, त्याचीं आर्जवें करूं नका. तो **कपिंजल**भट जसें जसें आपण आर्जवें कराल तसा तसा फारच ताठेल

जशी सणाची दोरी पाण्यानें भिजली म्हणजे अधिकच कठीण होते; तसा हा भट आर्जव करायला लागलें म्हणजे कठीण होतो. ह्या पहा, दर्शनीय वस्तु समूर दिसत आहेत तिकडे दृष्टि लावा. ही **वसंताची** शोभा किती रमणीय आहे पहा तरी.!

**विचक्षणेचें** भाषण ऐकून राजाची दृष्टी **सूर्याच्या** प्रकाशाकडे लागली. तो म्हणाला, 'सांप्रत सूर्य फार-वेळानें अस्तास जातो. सुंदर स्त्रिया झोंपाळ्यावर बसून कृष्णाचीं गीतें गातात त्यांच्याकडे दृष्टि लागल्या मुळें हा भगवान् **सूर्य** आपला रथ हळू चालवतो, व त्यामुळेंच दिवस मोठे होतात असें वाटतें!'

**भैरवानंद**नांवाचा एक मोठा मांत्रिक व सिद्धपुरुष तेथे राहत होता, सर्व लोक त्याला मोठा मान देत असत. राजालाही त्याच्या सामर्थ्याचा अनुभव आल्यामुळें तो त्याला विशेष मान देत होता. यावेळीं राजाचें दर्शन घ्यावें अशी इच्छा झाल्या वरून तो **भैरवानंद** राजवा-ड्यांत आला. राजा तेथें नसल्या मुळें तो राजाचा शोध करीत करीत बागांत येत असतां; **कपिंजलाच्या** दृष्टीस पडला. **कपिंजल** रागावला होता; तरी तो त्याचा राग मनापासून नव्हता, केवळ विनोदाचेंच सर्व प्रकरण होतें.

**भैरवानंद** दृष्टीस पडला तेव्हां हा राजाकडेच जात असेल असें समजून **कपिंजल** लवकर लवकर राजवळ येऊन ह्मणाला; 'अहो, आसन आणा आसन आणा.'

राजा ह्मणाला, 'अरे तें कशाला? आसनाची काय गरज आहे?'

**कपिंजल** म्हणाला, 'अहो, कशाला म्हणजे काय? ते **भैरवानंद**जी येत आहेत.'

हें ऐकून राणी म्हणाली, "जो अद्भुतशक्ति आहे म्हणून सांगतात तोच का **भैरवानंद** येत आहे?'

**कपिंजल** ह्मणाला, 'होय होय तोच. आणखी त्या नांवाचा दुसरा कोण याठिकाणीं येणार?'

राजा म्हणाला, 'तरमग जाजा, लवकर त्याला घेउन ये जा.'

राजाची आज्ञा घेऊन **कपिंजल** खालीं गेला आणि **भैरवानंदा**ला गच्चीवर घेऊन आला. **भैरवानंद** एकाप्रकार आपल्या सिद्धीच्या गुर्मीत असून त्याचे डोळे तारवटल्यासारखे दिसत होते. तो आपल्या तंत्र मार्गाची स्तुति करीत ह्मणाला, 'वाहवा! मंत्र नको तंत्र नको; ध्यान नको ज्ञान नको; एका गुरूच्या प्रसादावांचून आमच्या या मार्गांत दुसरें

कांहीं एक नको. आह्मी **कौलमार्गांत** असणारे लोक यथेच्छ मद्यप्राशन करतों. स्त्रियांशी विलास करून चैन भोगतो; तरी शेवटीं आम्हांला मोक्षप्राप्ति आपली होतेच! 'तसेंच वालरंडा असो चांडाळीण असो, किंवा मोठ्या दीक्षितांची धर्मपत्नी असो; कोणी असल्या तरि आह्मांला सारख्याच. जी आमच्या मार्गांत येईल ती आह्मांला वंद्यच आहे! आम्हीं खुशाल मद्य पितों व मांसही खातों; तरी भिक्षेवर पोट भरतो! आमचा बिछाना ह्मटला तर एक हरिणाजिनाचा तुकडा. जगांत आह्माला कोणाचीच परवा नाहीं.' असा हा आमचा **कौलधर्म** खरोखर कोणाला चांगला वाटणार नाहीं?

आणखी असें आहे कीं, कित्येक लोक—**विष्णु, ब्रह्मदेव, शिव** इत्यादि देवांच्या ध्यानानें, वेदपठणानें, व यज्ञयागादिक कर्मांनीं मुक्ति प्राप्त होते असें समजतात. व **विष्णु ब्रह्मा** इत्यादि देवांनींही तसेंच सांगितलें आहे. पण आह्माला त्याची कांहींच जरूर नाहीं. भगवान् **उमापति** याला मात्र आमचा हा मार्ग ठाऊक आहे. मद्य प्यावें व अनेक विलास करावे, आणि त्यांच्या योगानेंच शेवटीं मुक्तीची प्राप्ति करून घ्यावी हा उपाय दुसऱ्या कोणत्याही देवाला माहित नाहीं.!

असें बोलत बोलत **भैरवानंद** राजाच्या जवळ प्राप्त झाला. तेव्हां त्याला उत्थापन देऊन राजानें त्याच्या पायांवर मस्तक ठेविलें. व मोठ्या सत्कारानें त्याला आसनावर बसविलें. परस्परांनीं क्षेमसमाचार विचारिला व एकंदरींत जे कांहीं शिष्टाचार व्हायचे ते झाले. नंतर **भैरवानंद** राजाला ह्मणाला, 'राजन् मी तुझ्याकरितां काय करावें तें सांग.'

हें ऐकून राजा ह्मणाला, 'आपली कृपा असली ह्मणजे झालें. दुसरें कांहीं नको; तथापि आपण अलौकिक चमत्कार दाखवितां असें मी ऐकलें आहे. म्हणून कांहीं तरी, आश्चर्यकारक गोष्ट दाखवावी अशी माझी विनंती आहे.'

**भैरवानंद** हा खरोखरीच मोठा सिद्धपुरुष होता. मंत्रसामर्थ्यानें तो पाहिजे ते चमत्कार करीत असे. राजाला आश्चर्य पाहण्याची इच्छा आहे असें पाहून तो ह्मणाला, 'राजा, तुला कोणता चमत्कार पाहण्याची इच्छा आहे तें सांग. हा जो **चंद्र** आकाशांत उदय पावतो, त्याला मी पाहिजे तर भूमीवर आणूं शकतों. **सूर्याचा** रथ अर्ध्याच वाटेंत उभा करूं शकतों. यक्ष, देव, सिद्ध, गंधर्व यांच्या स्त्रिया पाहिजेत तर आकर्षण करितों. राजा, फार काय सांगूं;

मला सिद्ध व्हावयाचें नाहीं असें या भूमंडलावर काहींच नाहीं! तर मी काय करावें तें सांग?'

कुंतलनामक देशच्या राजाची कन्या **कर्पूरमंजरी** ही मोठी सुंदर असून 'जो तिच्याशीं विवाह करील तो सार्वभौम होईल.' असा तिला एका सिद्धपुरुषानें आशीर्वाद दिला होता. व ही गोष्ट चहूंकडे प्रसिद्ध झाली होती. राजा **चंडपाला**च्या मनांत आपण सार्वभौम व्हावें अशी मोठी उमेद होती, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. '**कर्पूरमंजरी**शीं विवाह करून घेईल तो सार्वभौम होईल' अशी गोष्ट ऐकून राजा तिच्याशीं विवाह करून घेण्याविषयीं फार दिवसांपासून प्रयत्न करीत होता; पण '**विभ्रमलेखा** ही पट्टराणी आहे तेव्हां आपण आपली मुलगी देणार नाहीं' असें **कर्पूरमंजरी**च्या बापानें सांगितल्यावरून राजा **चंडपाला**चा निरुपाय झाला होता. तरी कोणत्या ही रीतीनें तो हेतु सिद्ध व्हावा अशी त्याच्या मनांत मोठी उमेद होती.

**भैरवानंदा**नें 'पाहिजे त्या स्त्रीला आपण आपल्या मंत्रसामर्थ्यानें आकर्षण करून आणीन,' असें सांगितल्यावरून राजाला फार आनंद झाला. व त्यानें

त्या **कर्पूरमंजरीलाच** आकर्षण करून आणण्यास सांगावें, असें मनांत आणिलें. तरी राणीचें त्याला भय होतें. नांव घेऊन अमक्याच स्त्रीला आणण्यास सांगितलें तर तिला राग येईल म्हणून राजानें मुद्दाम **कपिंजलाला** प्रश्न केला. तो म्हणाला, 'मित्रा **कपिंजला**, तूं अशी अपूर्व एखादी स्त्री कोठें असल्याचें ऐकलें आहेस काय?'

राजा **कर्पूरमंजरीशीं** विवाह करून घेण्याचा प्रयत्न करीत आहे, हें **कपिंजलाला** माहितच होतें. तो म्हणाला, 'ऐकलें असें कां म्हणतोस? मी प्रत्यक्ष पाहिली देखील आहे.'

राजा म्हणाला, 'तर मग सांग पाहूं. हे **भैरवानंदजी** पाहिजे तिला आणतो म्हणतात. तेव्हां आपण हा चमत्कार पाहूं.'

हें ऐकून **कपिंजल** म्हणाला, 'ह्या दक्षिणदेशांत **वैदर्भ** नांवाचें नगर आहे. तेथील राजाची कन्या कुळ रत्नभूत आहे, आणायची तर तिलाच येथें आणावी.'

**कपिंजलानें** ह्याप्रमाणें सांगितलें. व राजानेंही त्याविषयीं अनुमत दिलें हें पाहून **भैरवानंद** म्हणाला, 'हो हो, त्यांत काय मोठें आश्चर्य आहे, आतां आणतो पहा.'

राजा ह्मणाला, 'महाराज, कृपाकरून आणाच तर मग अपण तिला. तिचा मुखचंद्र हाच कोणी एक पौर्णिमेचा पूर्णचंद्र तो आपण भूतलावर आल्यासारखे होईल.' "

याप्रमाणें राजानें आग्रहपूर्वक सांगितलें. तेव्हां **भैरवानंदानें** तें मान्य करून तत्काल डोळे झांकून तो ध्यान करीत बसला. व लागलीच क्षणमात्रांत मंत्रसामर्थ्यानें त्यानें **कर्पूरमंजरीला** आकर्षण करून घेतली. **कर्पूरमंजरी** यावेळीं आपल्या घरीं स्नान करीत बसली होती. **भैरवानंदानें** आकर्षण केल्यावरून ती तशीच ओलेत्यानें त्याच्याजवळ प्राप्त झाली.

एकाएकीं **कर्पूरमंजरी** तेथें आली, हें पाहून सर्वांला मोठें आश्चर्य वाटलें. तें त्याचें सामर्थ्य पाहून सर्व मंडळी कांहींवेळ चित्रासारखी तटस्थ झाली. नंतर राजा ह्मणाला, 'अरे वाहवा! हा मोठाच चमत्कार! ही सुंदरी (**कर्पूरमंजरी**) यावेळीं स्नान करीत बसली होती असें वाटतें. कारण डोळ्यांतलें काजळ पाण्यानें धुपून गेल्यामुळे ते आरक्त दिसत आहेत; केंस तोंडावर विखरलेले आहेत; हिनें आपल्या केसांचा पिळा डाव्या हातांत धरलेला असून त्यांतून पाण्याचे थेंब खालीं पडत आहेत; ही लहानसें वस्त्र आडवें नेसली आहे, त्यावरून स्नानक्रीडा

करीत असतां योगीश्वरांनीं, आम्हांला आश्चर्य उत्पन्न करणाऱ्या हिला येथें आणलें आहे. तसेंच एका हस्तकमलानें ही आपल्या अंगावरचा पदर सांवरून घेत आहे; व नेसलेली पडदणी आंवरीत आहे. अशा स्थितींत इतक्या दूर हिला येथें आणलें हा मोठा चमत्कार!'

**कपिंजल कर्पूरमंजरी**कडे लक्षपूर्वक पाहून म्हणाला, 'स्नानकरण्या करितां जिनें आपल्या अंगावरचे सर्व अलंकार काढून ठेविले आहेत; व पाण्याच्या घर्षणानें जिच्या अंगावरचे वेलबुट्टे नाहींसे झाले आहेत; ओल्यावस्त्रानें जिचें शरीर शोभतें आहे; अशी ही सौंदर्याची खाण आमच्या दृष्टीस पडली ही या योगीश्वरांची कृपा!'

**कर्पूरमंजरी** थोडावेळ शुद्धिवरच नव्हती. मी कोठें होतें व सांप्रत कोठें प्राप्त झालें, आणि याचें कारण काय हें तिच्या मुळींच लक्षांत आलें नाहीं. बराच वेळ ती चित्रवत् तटस्थ उभी राहिली होती. ती स्वतः मोठी चतुर होती. जरी तिची येथें बसलेल्या मंडळींतून कोणाचीही ओळख नव्हती; तरी तिनें सर्वांकडे लक्षपूर्वक पाहिलें. तेव्हां **भैरवानंदा**च्या मुद्रेवरून—'हा कोणीतरी मांत्रिक असावा व याणेंच आपल्याला येथें आणिलें असावें,' असें तिच्या लक्षांत आलें.

ती मनांत ह्मणाली, 'ह्या वीरानेंच (भैरवानंदानें) आपल्याला आणलें. एकाएकीं माझ्या आप्तांचा वियोग झाला, हें योग्य झालें नाहीं; पण आतां काय उपयोग! झालेली गोष्ट आपल्याला मान्य आहे, असेंच यांना दाखविलें पाहिजे. नाहींतर ज्यानें आपल्याला इतक्या दूर आकर्षण करून आणिलें; तो आणखींही काय पाहिजे तें करूं शकेल. तेव्हां उगीच असंतोष दाखविण्यांत कांहीं-एक अर्थ नाहीं.' असा विचार करून कर्पूरमंजरीनें आपलें मन स्थिर केलें.

जरी तिचें चित्त घाबरल्यासारखें झालें होतें. तरी राजाला पाहून तिला फार समाधान वाटलें. ती त्याच्याकडे पाहून मनांत ह्मणाली; 'हा पुरुष कोण आहे तें मला माहित नाहीं, तरी याच्या उत्तम स्वरूपावरून व गंभीर असून मधुर अशा शब्दावरून हा येथला महाराज असावा असें वाटतें. तशीच ही याच्याजवळ बसलेली ही याची राणी असावी. मला कोणी सांगितलें नाहीं, तरी भगवान् अर्धनारीनरेश्वराची जशी गौरी तशी ही याची राणी मोठी तेजस्वी दिसते. हा कांहीं कुटुंटत आहे; हा कोणीतरी मांत्रिक आहे, हें आधींच माझ्या लक्षांत आलें आहे. बाकीचे हे लोक राजा

आणि राणी यांचें सेवक असावेत. बरें पण मला यांनीं येथें कां आणिलें? कदाचित् ह्या राजानेंच आणविलें असावें असे ह्मटलें तर तेंही योग्य दिसत नाहीं. कारण याची ही राणी येथें जवळ बसलीच आहे. बरें पण हा राजा राणीसहवर्तमान आहे तरी माझ्या दृष्टीला फार प्रिय वाटतो ह्याचें काय कारण?' याप्रमाणें आपल्या मनांत विचार करीत असतां त्या **कर्पूरमंजरीला** कांहींसें भय व उदासीनता वाटली.

इकडे राजा हळूच **कपिंजलाला** ह्मणाला, 'गड्या, ह्या स्त्रीचे नेत्रकटाक्ष टपोऱ्या मोत्यांसारखे दिसतात. नाहीं बरें? मी सांप्रत हिच्या कटाक्षांला पात्र झालों आहें, यामुळें मला किती सुख वाटत आहे ह्मणून तुला सांगूं! कापुराचा रस अंगाला माखावा, किंवा **चंद्राच्या** शीतल प्रभेनें स्नान करावें, अथवा मौक्तिक रजानें लेप करावा त्याप्रमाणें यावेळीं माझी स्थिती झाली आहे.'

हें ऐकून **कपिंजल** ह्मणाला, 'खरोखर हिचें सौंदर्यच तसें आहे. ज्याच्यावर तीन वळकट्या शोभताहेत अशी हिची कंबर इतकी बारीक आहे कीं, सहज लहान मुलाच्यादेखील ती मुठींत मावेल! तसेंच हिचें उरःस्थल इतकें उंच आहे कीं तें हिच्या दोनही बाहूंत सांपडत

नाहीं. फार काय सांगूं, खरोखरीच ह्या अद्वितीय रूपवतीची मूर्ति चित्तानेंदेखील ग्रहण करितां येत नाहीं. मग कसलाही चितारी असला तरी त्याला हिची तसबीर कोठून काढवेल!

वस्तुतः स्नान केल्यामुळें इच्या अंगाचें चंदन वगैरे यावेळीं धुपून गेलें आहे, व दागिने मुळींच नाहींत; तरी ही किती रमणीय दिसत आहे! खरोखर ज्या सुंदर असतात त्यांना दागिन्यांची मुळींच जरूर नाहीं. ज्यांला सौंदर्यानें रजा दिली असेल त्याच पुष्कळ नटूनथटून आपल्याला शोभवितात. ज्या स्वभावतःच सुंदर आहेत त्यांना दागिन्यांची काय गरज आहे? उलट दागिनेच त्यांच्या योगानें शोभतात!'

राजा ह्मणाला, 'गड्या, तूं ह्मटलेंस तें खरें आहे. हिचें गोंडस शरीर उत्तम सुवर्णासारखें दिसत आहे. नेत्र विशाल आहेत. कान आणि नेत्र यांची भेट झाली आहे! दोन्ही गाल चंद्राच्या दोन शकलांसारखे रमणीय दिसतात. मला वाटतें कीं, भगवान् मदन आपलें धनुष्य सज्ज करून हिचें रक्षण करीत आहे. आणि ह्मणून य शोषण, मोहन, इत्यादि त्याचे बाण माझ्या अंगावर एकसारखें लागत आहेत.'

यावर कपिंजल हंसून ह्मणाला, 'सांप्रत ह्या सुंदरीला अशी उघडी आणून उभी केली आहे, यामुळें हिच्या लावण्यरत्नांची अगदीं चवाठ्यावर लूट चालली आहे, असें ह्मटलें तरी हरकत नाहीं.'

हें ऐकून राजा हंसून ह्मणाला, 'प्रिय मित्रा, मी सांगतों हें ऐक. असें निसर्गतः सुंदर अशा स्त्रियांचें शरीर त्यांच्या अंगच्या उत्तम गुणांनींच फार शोभतें. दागदागिने घालून त्यांना सजविल्या ह्मणजे उलट त्यांचें लावण्य झांकलें जातें. व याप्रमाणें ज्यांच्या अरूपत्वांत स्वाभाविक सौंदर्य असेल त्यांचा, ज्यानें आपलें धनुष्य खेंचून धरलें आहे असा भगवान् **मदन** नेहमीं सेवक बनलेला असतो. तेव्हां लुटीविषयीं तूं भिऊं नको.

'आणखीं असें पहा कीं; हिच्या कंबरेचा भाग इतका विस्तृत झाला आहे कीं त्यामुळें कंबरपट्टा देखील तेथें ठरत नाहीं. हिचे नेत्र असे पाणीदार आहेत कीं; त्यांपुढें कमलांची शोभा कांहींच नाहीं. आणि हिचें मुख इतकें सुंदर दिसतें कीं, जणुं काय तो एक दुसरा **चंद्रमाच** उदय पावला आहे.!'

राणीला ती कोण हें ठाऊक नव्हतें. ती **कपिंजलाला** ह्मणाली; 'आर्या **कपिंजला**, ही कोण आहे तें विचारून घे.'

हें ऐकून **कपिंजल कर्पूरमंजरीला** म्हणाला, 'बाई सुमुखि, अशी कावरीबावरी होऊं नकोस. अशी पुढें ये पाहूं. आणि तूं कोण? कोणाची? व येथें कशी आलीस? तें नीट सांग.'

राजा म्हणाला, 'अरे कोण आहे तेथें. हिला आसन आणून द्या कोणी तरी.' राजाचा हुकूम होतांच सेवकांनीं **कर्पूरमंजरीला** आसन आणून द्यायचें, इतक्यांत **कपिंजल** म्हणाला, 'दुसरें आसन कशाला पाहिजे? हें माझें अंगवस्त्रच आसन आहे.' **कर्पूरमंजरीला**, म्हणाला; 'बाई, याच्यावर बैस.'

**कपिंजलानें** तिला आपल्या अंगवस्त्रावर बसवून तूं कोण? कोठली? तें सांगण्यास सांगितलें. तेव्हां **कर्पूरमंजरी** लाजत लाजत ह्मणाली. 'या दक्षिणप्रांतांत **कुंतलदेशांत विदर्भ**नांवाची राजधानी आहे. तेथें सर्व लोकांना प्रिय असा **वल्लभदेव** नांवाचा राजा आहे.'

हें ऐकून राणी **विभ्रमलेखा** मध्येंच ह्मणाली, 'हो हो, तो तर माझा प्रत्यक्ष मावसा आहे!'

**कर्पूरमंजरी** ह्मणाली, 'त्या **वल्लभदेवराजाची शशिप्रभा** नांवाची पत्नी आहे.'

हें ऐकून राणी ह्मणाली, 'होय. ती तर माझी मावशी.'

यावर **कर्पूरमंजरी** ह्मणाली, 'ते **वल्लभदेव** आणि **शशिप्रभा** हे माझे माता पितर होत.'

राणी हावेळपर्यंत **कर्पूरमंजरीचें** सौंदर्य पाहून ही कोणुची कोण असावी, याविषयीं गोंधळांत पडली होती. **शशिप्रभेची** आपण मुलगी असें तिनें सांगितलें. तेव्हां राणी मनांत ह्मणाली, 'आतां ठीक आहे. हावेळपर्यंत मी घोटाळ्यांत पडलें होतें. **शशिप्रभेच्या** गर्भापासून उत्पन्न झाल्यावांचून असें सौंदर्य यायचेंच नाहीं. पोवळीं उत्पन्न होण्यायोग्य जागा असल्यावांचून तीं कशीं उत्पन्न होतील? **कर्पूरमंजरीला** म्हणाली, 'तर मग तुझें नांव काय. **कर्पूरमंजरी** का?'

हें ऐकून **कर्पूरमंजरी** लाजेनें खालीं मान घालून उभी राहिली. तिनें कांहीं उत्तर दिलें नाहीं, तरी तीच ही असें समजून राणी म्हणाली, 'माझे लाडके बहिणी, लाजूं नकोस. अशी इकडे ये. आणि मला घट्ट मिठी मार पाहूं.'

**कर्पूरमंजरीनें** राणी **विभ्रमलेखेला** यापूर्वी पाहिलें नव्हतें; तरी घरांत आईबापांच्या तोंडातून तिचें नातें ऐकलें होतें. राणीनें जवळ बोलावतांच ती पुढें येऊन म्हणाली, 'अक्का, तुझी धाकटी बहीण **कर्पूरमंजरी** हिचा हा आजीं प्रथमचा नमस्कार घे!'

सहज विनोदाकरितां म्हणून ही गोष्ट काढली तिच्या योगानें राणीला आपल्या बहिणीच्या भेटीचा लाभ झाला. व हें सर्व **भैरवानंदा**च्या कृपेनें झालें असें समजून राणी त्या योग्याला म्हणाली, 'महाराज, हा सर्व तुमचा प्रसाद आहे. ही माझी प्रिय बहीण **कर्पूरमंजरी,** हिची भेट झाली हा मोठा चमत्कारिक योग घडून आला. पण आतां कृपा करून हिला लवकर परत मात्र नेऊं नका. आठपंधरा दिवस माझ्याजवळ राहूंद्या. मग आपल्या ध्यानरूपी विमानानें पाहिजे तर स्वस्थानीं पोंचवा.'

हें ऐकून, **भैरवानंद** म्हणाला, 'तसें कां होईना. तुझी मर्जी असेल तर थोडे दिवस हिला तुझ्या जवळ राहूंदे.'

हें ऐकून राजाला तर फारच आनंद झाला. कारण **कर्पूर-मंजरीचें** दर्शन तरी होईल कीं नाहीं याची त्याला प्रथम शंकाच होती. परंतु एकदाचें दर्शन तर घडलें. दर्शन झाल्यावर त्याला दुसरी काळजी उत्पन्न झाली; ती अशाबद्दल कीं, ज्या **भैरवानंदानें** तिला इतक्या दूर आणलें तोच तिला कदाचित् लवकर परत पोहोंचवील, तर तिला राहून घेण्याविषयीं काय उपाय करावा, याचा तो विचार करीत होता. ती गोष्ट आयतीच घडून आली. राणीचें तिच्याशीं

नातेंहीं निघालें व तिणें तिला ठेऊन घेण्याविषयीं सांगितल्यावरून **भैरवानंदानें** तें मान्य केलें.

**कर्पूरमंजरी** आणि राणी दोघींही एकमेकींकडे पाहून हर्षित झाल्या आहेत, असें अवलोकन करून **कपिंजल** राजाला म्हणाला, 'मित्रा, आतां येथें आम्ही दोघेच कायते परके झालों आहों. यांच (राणी आणि **कर्पूरमंजरी**) हें कटुंब एकत्र मिळालें आहे. कारण ह्या दोघी परस्परांच्या बहिणी आहेत. हे **भैरवानंद**जी ह्या दोघींची भेट करून देणार आहेत. तेव्हां अर्थात् यांचा सत्कार व्हायचाच! आतां ही (**विचक्षणा**) तर प्रत्यक्ष महीतलावरची सरस्वती असें आपल्याला म्हणविणारी नर्तक, राणीचा अंतरात्माच आहे! तेव्हां हीं सगळीं एक आहेत यांत संशय नाहीं.'

इकडे राणी दासीला म्हणाली, 'अग **विचक्षणे**, तुझी वडील बहीण **सुलक्षणा** हिला मागून हे योगिराज **भैरवानंद**जी यांच्या इच्छेप्रमाणें त्यांची सेवा करावयास लाव.'

हें ऐकून **विचक्षणा** म्हणाली, 'जसा बाईसाहेबांचा हुकूम असेल तसें करतें.' लगेच तिणें आपल्या बहिणीला हांक मारली. आणि राणीचा हुकूम तिला कळविला. तेव्हां **भैरवानंद** सर्वांचा निरोप घेऊन **सुलक्षणे**सह निघून गेला.

नंतर राणी राजाला म्हणाली, 'आर्यपुत्र, आतां मला

निरोप द्यावा. ही माझी प्रिय भगिनी **कर्पूरमंजरी** ओलेल्यानें उभी राहिली आहे. हिला असें कितीवेळ तिष्ठत ठेवायचें. मी हिला वाड्यांत घेऊन जातें.. व वस्त्रें अलंकार वगैरे लेववून सजवितें.'

हें ऐकून राजा म्हणाला, 'योग्य आहे. चंपकाच्या वेलीचें आळें कस्तुरी, कापूर इत्यादि सुगंधि पदार्थांनीं भरून काढणें उचितच आहे.'

राजाचा निरोप घेऊन राणी, **कर्पूरमंजरी विचक्षणा** व इतर दासी यांसह वाड्यांत निघून गेली. व इकडे राजा **कर्पूरमंजरीच्या** लावण्याचें वर्णन करीत बसला. इतकें होईपर्यंत संध्याकाळ झाला. तेव्हां संप्रदायाप्रमाणें, राजाला वेळ सुचविणारे **कांचनचंड** आणि **रत्नचंड** नांवाचे दोघे भाट त्याच्या दृष्टीआड उभे राहून त्याला संध्याकाळ झाल्याची सूचना करीत झाले.

**कांचनचंड** म्हणाला, 'महाराजांना हा संध्यासमय सुखकारक होवो! जणुं काय दिवसाचा प्राणच, असें **सूर्याचें** मंडळ सांप्रतकाळीं कोठें गेलें? हें कोणास कांहींच समजत नाहीं. आपला प्राणनाथ गेल्यामुळें विरहानें व्यथित होऊन शोकाकुल झालेली जी कमलिनी ती मिटण्याच्या मिषानें जणुं काय मूर्छित होऊन पडली आहे.'

**रत्नचंड** म्हणाला, 'सायंकाळ प्राप्त झाल्यामुळें, क्रीडा-करण्याकरितां रत्नखचित भिंतीवर काढलेल्या चित्रां-बरचे पडदे काढून, या दासी ते पुसून साफ करून ठेवीत आहेत. या वसंतऋतूंत सुखकर वाटतील अशाप्रकारचे शीतळ बिछाने तयार केले आहेत. राजवाड्यांतील काम करणाऱ्या या दासींची गडबड उडाल्यामुळें त्यांच्या कंक-णांचा मोठा ध्वनि होत आहे. तशाच जनानखान्यांतल्या कांहीं स्त्रिया रुष्ट झाल्या आहेत व कांहीं संतुष्ट झाल्या आहेत. जिकडेतिकडे सायंकालची तयारी चालली आहे.'

याप्रमाणें भाटांची सूचना ऐकून राजा **कपिंजलाला** म्हणाला, 'गड्या, सायंकाल झाला खरा. तर आतां आपण संध्यावंदन करण्यास जाऊं या.' असें बोलून **कपिंजला**-सहवर्तमान तो आपल्या महालांत निघून गेला.

---

# कलिका दुसरी.

पूर्वी सांगितल्याप्रमाणें **कर्पूरमंजरीची** व राजाची दृष्टिभेट झाली. तशाप्रकारच्या स्त्रीरत्नाचें राजा **चंड-पाला**सारख्या रंगेल्या राजपुत्राला दर्शन झाल्यावर ती त्यांची भेट वज्रलेपासारखी दृढ होणें यांत फारसें आश्चर्य नाहीं." राजाला त्या सुंदरीचें दर्शन झालें त्याच-

वेळीं त्याचें मन तिच्या ठिकाणीं शिशाच्या रसानें ओतविल्या प्रमाणें दृढ आसक्त झालें. त्याप्रमाणेंच **कर्पूरमंजरीचें** ही हृदय राजाच्या ठिकाणीं आसक्त झालें.

याप्रमाणें त्या उभयतांचें परस्परांवर अंतःकरण बसलें; तरी त्यांना आपला हेतु पूर्ण करून घेण्याची सवड नव्हती. **कर्पूरमंजरी** राणीची प्रत्यक्ष बहीण असून तिच्या देखरेखीखालीं होती. यामुळें राणीच्या इच्छेवांचून तिला कोणतीच गोष्ट करतां येत नव्हती. राजाला तर राणीचा मोठाच धाक होता. यामुळें उभयतांही राणीला न कळवितां आपापला हेतु सिद्ध करून घेण्याविषयीं प्रयत्न करूं लागलीं

इकडे राणीनें **कर्पूरमंजरीला** वाड्यांत नेली, व तिला न्हाण माखण वस्त्र अलंकार इत्यादिकांनीं सजवून मोठ्या प्रीतीनें सर्वकाळ आपल्या जवळ ठेवली. यामुळें स्वतंत्रतेनें राजाचें दर्शन घेण्यास तिला मुळींच सवड मिळाली नाहीं. राजा कांहींतरी निमित्त काढून वरचेवर राणीच्या भेटीला जात होता; पण त्याचा हेतु जाणून तिनें असा पक्का बंदोबस्त ठेवला होता कीं, **कर्पूरमंजरी** आल्याला बरेच दिवस झाले तरी राजाला तिचें नख देखील दिसूं दिलें नाहीं!

याप्रमाणें राजा आणि **कर्पूरमंजरी** दोघेंही चक्रवाकमिथुनाप्रमाणें परस्परांच्या भेटीविषयीं उत्कंठित झालीं असून अगदीं जवळ असतांही त्यांच्या भेटीचा योग आला नाहीं. **कर्पूरमंजरीला** राजवाड्यांतलीं सर्वच मनुष्यें अगदीं अपरिचित होतीं. राणी तिची प्रत्यक्ष बहीण होती; तरी परस्परांचा भीड चेपली नसल्यामुळें **कर्पूरमंजरीला** मन मोकळें करून बोलण्यासारखें कोणीच तेथें नव्हतें.

राजवाड्यांत येऊन तिला बरेच दिवस झाले होते. राणीनें **कर्पूरमंजरीच्या** तैनातीस आपली **विचक्षणा** दासी दिली होती. ती अनेकप्रकारच्या करमणुकीच्या गोष्टी सांगून त्या सुंदरीचें मन रंजवीत होती. **विचक्षणा** ही चतुर असल्यामुळें **कर्पूरमंजरीच्या** मनांत काय आहे तें ती अनुमानानें तेव्हांच समजली. तिचें मन राजावर आसक्त झालें आहे असें समजून तिनें तिचा तो हेतु पुरविण्याच्या कामीं साह्य करण्याचा निश्चय केला. यद्यपि ती राणीची विश्वासु दासी होती व **कर्पूरमंजरीचा** राजाशीं समागम व्हावा ही गोष्ट राणीला मनापासून इष्ट आहे किंवा नाहीं हें तिला समजलें नव्हतें. तरी राणी उदारमनाची असून पतीचें प्रेम राखण्याकरितां अशा गोष्टीला ती आड येणार

नाहीं, हें तिला पक्कें ठाऊक होतें. यामुळें **कर्पूरमंजरीला** साह्य केलें असतां राणी आपल्यावर रागावेल याची तिला फारशी भीति नव्हती.

एकेदिवशीं **कर्पूरमंजरी** गोष्टी बोलत असतां, बोलतां बोलतां तिनें सहज राजाच्या संबंधानें उद्गार काढले. त्याव-रून **विचक्षणेनें** खोदून खोदून विचारून तिचा हेतु ऐकून घेतला. व या कामांत आपण तुला पूर्ण साह्य करणारी आहें अशी तिच्या मनाची खात्री केली. तेव्हां त्या दोघींचें, राजाचा समागम घडण्यास काय उपाय करावा यासंबं-धानें बराच वेळ बोलणें झालें. शेवटीं **कर्पूरमंजरीनें** आपला भाव जींत व्यक्त होईल अशाप्रकारची कांहीं कविता करून द्यावी व ती **विचक्षणेनें** राजाकडे पोंच-वावी असें ठरलें.

इकडे राजा तिच्याविषयीं अत्यंत उत्सुक झाला होताच. **भैरवानंदानें** तिला आणली त्यादिवसापासून पुढें तिचा काय समाचार आहे; हेंही त्याला मुळींच समजलें नव्हतें. अशाकामांत त्याचा पूर्ण साहाय्यकर्ता काय तो **कपिंजल.** त्याणें **कपिंजलाला** **कर्पूरमंजरीचा** समाचार आण-ण्याविषयीं आग्रह करून त्याला विशेष तिकडे पाठविलें.

कामिपुरुषाला, आपलें मन जिच्यावर आसक्त झालें

असेल; तिच्या मनाची स्थिति कशी आहे हें समजून घेण्याची मोठी उत्कंठा असते. राजाचें मन जसें **कर्पूरमंजरी**कडे लागलें होतें; तसेंच तिचेंही अंतःकरण त्याच्याकडे वेधलें होतें हें खरें आहे. तथापी त्या उभयतांना परस्परांच्या मनाची स्थिति अद्याप कळून आली नव्हती. म्हणून **कर्पूरमंजरीनें विचक्षणेला** राजाकडे व राजानें **कपिंजलाला कर्पूरमंजरी**कडे दूत करून पाठविलें.

इकडे राजा फार उत्सुक झाला असल्यामुळें त्याला क्षणभरदेखील चैन पडत नव्हतें. परिवारापैकीं त्याच्या बरोबर चोपदारीण मात्र होती. तिच्या सहवर्तमान तो बागेंत फिरून कशीतरी मनाची करमणूक करावी असें इच्छित होता.

तो कांहीं पावलें पुढें जाऊन **कर्पूरमंजरी**ला उद्देशून म्हणाला, 'खरोखर ज्यावेळीं तिला त्या योगिराज **भैरवानंदानें** आणली, त्यावेळीं ती आमच्या पुढें सारखी उभी राहिली होती. तिच्या डुंगणाचा भाग आपल्या ठिकाणावरून तीळभरदेखील हालला नाहीं. लाजेनें तिची मान वांकडी झाली होती. एका हातांत तिनें आपला केशपाश धारण केला होता व तिचा मुखचंद्र तिरकस झाला असून ती एकसारखी माझ्याकडे टक लावून पाहत होती!

राजानें **कर्पूरमंजरी**चें नांव घेतलें नव्हतें. तरी त्या

वर्णनावरून चोपदारीण समजली. ती मनांत ह्मणाली, 'अद्यापि यांच्या मनांत तीच गोष्ट आहे हें काय? तर आतां आपण यांचें मन दुसरीकडे नेलें पाहिजे. **वसंताचें** वर्णन करून मी यांची उत्कंठा अंमळ शिथिल करतें.' असा विचार करून ती राजाला ह्मणाली, 'महाराज, हळूहळू जिचा भर उतरत जात आहे अशा **वसंत**शोभेकडे कृपाकर दृष्टि द्यावी.'

सांप्रत कोकिलांच्या स्त्रियांचा स्वर मधुर करणारे, भ्रमरांच्या गुंजारवाला गोड वाटविणारे, विरहिजनांच्या मनांत विलक्षण प्रीति उत्पन्न करणारे, असे हे वसंतांतील दिवस, प्रतिदिवशीं मोठे मोठे होत चालले आहेत!'

चोपदारिणीनें याप्रमाणें वर्णन केलें; पण राजाचें मन दुसरीकडेच लागलें होतें. तो सभेंत बसला असतां **भैरवानंदानें कर्पूरमंजरीला** आणली त्या प्रसंगाला उद्देशून ह्मणाला, 'त्यावेळीं तेथें बसलेल्या लोकांच्या नेत्रांला ती एक लावण्याची नदीच आहे काय असें वाटलें असेल! जी अनेक प्रकारच्या लीला आणि विलास यांमध्यें परम निपुण, लोकांच्या डोळ्यांना चंद्रविकासि कमळें जींत प्रफुल्लित झालीं आहेत अशी पुष्करिणी, आणि मला तर केवळ शृंगाराची संजीवनी मात्राच झाली! ती दृष्टीस पडली

मात्र, तोंच मदनानें माझ्यावर बाणांचा वर्षाव करण्याची सुरवात केली!'

कांहींसा उन्मत्त झाल्यासारखा होऊन ह्मणाला, 'तिचें दर्शन झालें त्यावेळेपासून ती मृगनयना माझ्या चित्तांत भरून गेली आहे. माझ्या शय्येवर परिभ्रमण करते! पण दशदिशा पळत सुटते! माझ्या भाषणांत तीच येते. कविता करूं लागलों तरी कवितेचा विषय तीच होते. ध्यान करूं लागलों ह्मणजे ती चंचलनयना एकसारखी माझ्या समोर उभी असते. तिच्या डोळ्यांची कोर सहज माझ्या-वर पडली तेणेंकरून मी इतका विव्हळ झालों आहें! मग ज्यांच्यावर तिची संपूर्ण दृष्टि पडेल त्यांना तर तिलोदकच दिलें पाहिजे असें वाटतें!

राजा ह्याप्रमाणें **कर्पूरमंजरीचें** वर्णन करीत बागेंत फिरत होता. यावेळीं त्याचा मित्र **कपिंजल कर्पूर-मंजरीचा** समाचार आणण्याकरितां गेला होता, हें पूर्वी सांगितलेंच आहे. त्याणें ही बातमी कशी काढावी ह्मणून पुष्कळ वेळ विचार केला. व अंतःपुरांत जाऊन तेथील दासींकडे चौकशी केली असतां कांहीं तरी बातमी लागेल असें समजून तो तिकडे निघाला. तों वाटेंतच त्याचें काम झालें.

**कर्पूरमंजरी**च्या कामाकरितां **विचक्षणा** राजाकडे येण्यास निघाली होती ती वाटेंतच त्याला भेटली. थोड्या दिवसांपूर्वी **विचक्षणेचें** आणि **कपिंजलाचें** कडक भांडण झालें होतें, तरी त्यांत खरेपणा मुळींच नव्हता, हें पूर्वी सांगितलेंच आहे. राजा आणि राणी या दोघांची करमणूक करण्याकरितांच उभयतांनीं मुद्दाम जें भांडण केलें होतें, तें तेवढ्या पुरतेंच होतें. एरव्हीं त्या उभयतांचा चांगला स्नेह होता.

**विचक्षणा** दृष्टी पडतांच **कपिंजल** स्नेहपूर्वक तिला भेटला. उभयतांचें बराचवेळ कांहीं बोलणें चाललें होतें. **कपिंजलानें** विचारल्यावरून **कर्पूरमंजरी** राजावर कितीं आसक्त आहे तें **विचक्षणेनें** त्याला सांगितलें. तें ऐकून **कपिंजल** ह्मणाला, 'अग **विचक्षणे,** तूं सांगितलेंस तें सारें खरेंना?'

**विचक्षणा** ह्मणाली, 'ह्मणजे काय! यांत कांहीं संशय आहे का? खऱ्यापेक्षां खरें असें समज.'

**कपिंजल** ह्मणाला, 'पण माझा तुझ्या बोलण्यावर विश्वास बसत नाहीं. कारण तूं फार थट्टेखोर आहेस.'

हें ऐकून **विचक्षणा** ह्मणाली, 'आर्या **कपिंजला,** असें काय वेरें बोलतोस. थट्टेची वेळ निराळी आणि कामाची

वेळ निघाली. सारावेळ थट्टा करायला मला काय वेड लागलें आहे!'

कपिंजल म्हणाला, "बरें तर. मी तुझ्या सांगण्यावर विश्वास ठेवतों. चल तर मग आतां आपण उभयतां महाराजांकडे जाऊं.' असें बोलून तीं दोघेंही राजाकडे जाण्यास निघालीं.

इकडे राजा उद्विग्न होऊन संचार करीत होता. त्याला पाहून कपिंजल म्हणाला, ' बाई विचक्षणे, हा पहा माझा प्रियमित्र ( राजा ) ज्याचें मन ठिकाणावर नाहीं असा, मानससरोवरांतून भ्रष्ट झालेल्या हंसाप्रमाणें केवळ दीन झाल्यासारखा दिसत आहे. ज्याचा मद वाळून गेला आहे असा हत्ती, उन्हानें सुकलेल्या कमळाच्या दंडाप्रमाणें म्लान, दिवसाच्या दिव्याप्रमाणें निस्तेज व प्रभातकालच्या पूर्णचंद्राप्रमाणें पांढरा फटफटीत झाला असून विशेष क्षीणही दिसत आहे!'

दोघेंही राजाच्या समोर जाऊन 'महाराजांचा जयजयकार असो' असें म्हणालीं.

राजा म्हणाला,' गड्या कपिंजला, ह्या विचक्षणेशीं तुझा कसा मिलाफ झाला?'

कपिंजल म्हणाला, 'छे! छे!! ते कांहीं विचारूं

नको. आज ह्या **विचक्षणेनें** माझ्याशीं पक्का स्नेह केला. हिची आमची गट्टी जमली, तेव्हां जो गोष्टी बोलत बसलों त्याखालीं इतका वेळ झाला! नाहीं तर कधींच आलों असतों.'

राजा म्हणाला, 'तुझें तिच्याशीं सख्य झालें हें बरें आहे; पण त्यापासून कोणतें फळ निष्पन्न झालें?'

**पिंजल** म्हणाला, 'तुला पाहिजे होतें तेंच प्राप्त झालें. ज्या मनुष्यावर तुझें मन अत्यंत आसक्त झालें आहे, त्यानेंच आपला भाव व्यक्त करणारा लेख देऊन ह्या **विच-क्षणेला** आपल्याकडे पाठविलें आहे, आणखी काय पाहिजे!'

**विचक्षणेनें कर्पूरमंजरीकडून** जो लेख आणला होता, तो केतकीच्या पत्रावर लिहिलेला होता. केत-कीचा वास आला असें पाहून राजा म्हणाला, 'अरे; पण हा केतकीचा सुगंध कोठून येतो?'

**विचक्षणा** म्हणाली, 'होय सरकार. केतकीच्या पत्रा-वरच लिहिलेला लेख माझ्या हातांत आहे.'

राजा म्हणाला, 'ह्या वसंतऋतूंत केतकीचीं फुलें कोठून उपलब्ध होणार?'

हें ऐकून **विचक्षणा** म्हणाली, 'तें खरं; पण मोठ्या

चमत्कारिक रीतीनें ह्या वसंतसमयांतदेखील केतकीला फुलें आलीं. ते योगीश्वर भैरवानंद यांणीं पाहिजे त्यावेळीं पाहिजे त्या वृक्षाला फुलें आणण्याचा मंत्र बाईसाहेबांना (राणीला) दिला आहे. त्यांनीं परीक्षेकरितां, ह्मणून आपल्या महालाच्या जवळच्या बागेंतल्या केतकीवर त्या मंत्राचा प्रयोग केला. प्रयोग करतांच त्या केतकीला एक कणिस आलें. तेव्हां तें मोठ्या हौसेनें काढून घेऊन बाईसाहेबांनीं आज भगवति गौरीची, तिला हिंदोल्यावर बसवून पूजा केली. आणि त्या प्रसंगीं त्या केतकीच्या हातांतील लहान लहान सारीं केतकें देवीला अर्पण केलीं. व बाकी राहिलेल्यापैकीं दोन केतकें आपली आवडती लहान बहीण कर्पूरमंजरी हिला दिलीं. तिनें त्यांतलें एक गौरीला अर्पण केलें आणि दुसरें, हें आपल्याला (सरकारास), त्या आपल्या प्रिय सखीनें पत्ररूपानें नजर केलें आहे. कस्तूरीच्या शाईनें याच्यावर दोन पद्य लिहिलीं आहेत तीं अवलोकन करावीं.' असें सांगून विचक्षणानें तें केतकीपत्र राजाच्या हातांत दिलें.

'राजानें त्यांत प्रथम लिहिलेली पुढील आर्या वाचली
अनुरक्त कामिनि हंसी, वंचितमां चक्रवाकिरागि जेव्हां ।
वाटे माझें दुष्कृत, घडवी नच दृष्टिलाभ तव तेव्हां ॥ १ ॥

राजा ह्मणाला, 'हींच तीं मदनरसायनभूत अक्षरें!'

**विचक्षणा** ह्मणाली, 'सरकार, जशी ती आर्या वाचली तसाच तिच्या खालीं मी त्या प्रियसखीच्या (**कर्पूरमंजरीच्या**) अवस्थेचें ज्यांत वर्णन आहे असा दुसरा श्लोक लिहिला आहे तोही कृपा करून वाचून पहावा.'

हें ऐकून राजानें पुढें लिहिल्याप्रमाणें दुसराही श्लोक वाचिला.

निशिदिनीं रखी, मोठी श्वास, ज्वरातुरशी दिसे।
गळति वलयें होते वृष्टी, सदा नयनांतुनी ॥
तव विरह हा, बाधे तीला, करी बहु दुःखित।
मग तनुलता, प्राणाशाही, न कां करि दुर्बल ॥ २ ॥

**विचक्षणा** ह्मणाली 'महाराज, माझी वडील बहीण **सुलक्षणा** हिनेंही एक कविता केली आहे, ती ऐकावी महाराज.' असें सांगून **विचक्षणेनें** आपणच पुढील दिंडी ह्मटली.

श्वास हारापरि दीर्घ, चंदनानें।
फोड येतो, द्विजराज ताप देतो ॥
हास शोभेचे स्मरण अश्रु गंगा।
वस्त्रांति सुभगा तव विरह करी दंगा ॥ ३ ॥

ही ऐकून राजा ह्मणाला, 'ह्या कवित्वाची काय

तारीफ करावयाची आहे! तुझीच वडील बहीण ती. तिची कविता तशी असावयाचीच.'

इतक्यांत **कपिंजल** राजाला म्हणाला, 'मित्रा, खरो-खर ह्या **विचक्षणेला** तर पृथ्वीवरची **सरस्वती** म्हटलेंच आहे. तेव्हां हिच्या वडील बहिणीला आतां त्रिभुवन**सरस्वती** म्हटलें पाहिजे! मी तर आजपासून ह्यांच्याशीं स्पर्धा करण्याचें सोडून देतो. पण प्रियमित्रा, तुझ्यापुढें आपली मदनावस्था योग्य शब्दांनीं मी निवेदन करितो. ती माझी कविता ह्या दोघींचा पाडाव करण्याकरितां आहे असें मात्र समजूं नकोस बरें.'

यावर राजा हंसून म्हणाला, 'हं म्हण, म्हण, आम्ही तुझी-देखील कविता ऐकतों.' याप्रमाणे राजानें म्हणावयास सांगितल्यावरून **कपिंजलानें** पुढें लिहिलेला श्लोक म्हटला.

ज्योत्स्ना अत्युष्ण वाटे, विषसम गमतो, लेप हा चंदनाचा
शोषे हा हार मानें, व्यथितची करितो, वात हा कीर्तनशीचा।
तोयार्द्राही सदैव, ज्वलतचि असते, देहवल्ली जर्यी मी
दृष्टीनें पाहिली ती, कमलमुखि नवी, सुंदरी रम्य रामा ॥४॥

राजा म्हणाला, 'गड्या **कपिंजला**, तुझ्याही अंगाला थोडासा चंदनरस लावतां येईल काळजी करूं नको.

घरें, हें असो. पण तिकडचा (कर्पूरमंजरीकडचा) कांहीं वृत्तांत समजला असला तर सांग पाहूं. राणीनें तिला (कर्पूरमंजरीला) वाड्यांत नेल्यावर मग काय केलें?'

हें ऐकून **कपिंजल** **विचक्षणे**कडे बोट दाखवून म्हणाला, 'याचें उत्तर ही (**विचक्षणा**) सांगेल; माझ्या-पेक्षां हिला चांगलें ठाऊक आहे. आणि चटकीच्या जातीला कोणत्याही गोष्टीचें तिखटमीठ लावून चांगलें वर्णन करतां येतें.' असें बोलून तो **विचक्षणे**ला म्हणाला 'अग **मही-तलसरस्वति**, ह तुझ्या पांडित्याचा काय प्रकाश पडतो तो पडूं दे. हे महाराज काय विचारतात त्याचें उत्तर सांग. तुझें काम साधावयाची वेळ हीच आहे'?

हें ऐकून **विचक्षणा** राजाला म्हणाली, 'सरकार, प्रियसखी **कर्पूरमंजरी**ला बाईसाहेबांनीं अंतःपुरांत नेल्यावर तिला चांगलीं चांगलीं वस्त्रें दिलीं. कपाळाला तिलक लावला. अमूल्य दागिने तिच्या अंगावर घातले. आणि खाऊंपिऊं घालून तिला संतुष्ट केली.'

कामी झालेल्या राजाला तिचें वर्णन जितकें अधिक ऐकण्याला मिळेल तितकें पाहिजे होतें. **विचक्षणे**नें थोडक्यांत सांगितलें. तितक्यानें त्याचें समाधान कसें

होणार? तो म्हणाला, 'अग, विचक्षणे, कसें कसें काय काय केलें तें विस्तारपूर्वक सांग.'

विचक्षणा म्हणाली, 'ऐकावें महाराज. तिला अंतःपुरांत नेल्यावर आधीं केशरासारखें पिवळेंजर्द तिचें अंग स्वच्छ घांसलें.'

यावर राजा म्हणाला, 'तर मग "सोन्याची मूर्ति अधिक उजळून साफ केली' म्हणायाची!'

विचक्षणा—'नंतर पाचेचे पैंजण तिच्या पायांत घातले.'

राजा—'तरमग ज्याचें मुख खालीं वांकलें आहे; अशा दोन कमलांत भ्रमरांची पंक्तीच बसविली असें झालें.'

विचक्षणा—नंतर 'पोपटाच्या पिसां सारखी हिरवागार पटणी नेसवून तसलाच एक पांवरा तिच्या अंगावर दिला.'

राजा—'तीं वस्त्रें, केळीच्या खांबासारख्या तिच्या सरळ मांड्यांला हिरव्याचार पानांसारखींच शोभलीं असतील!'

विचक्षणा—'नंतर निरनिराळ्या पांचें प्रकारच्या रत्नांनीं खचलेला सुंदर कमरपट्टा तिच्या कंबरेंत घातला.'

राजा—'यामुळें सुवर्णमयपर्वताच्या शिखरावर मोराला नृत्य करायास लावल्यासारखेंच झालें.'

**विचक्षणा**—'मग तिच्या हातांत रत्नखचितकांकणें घातलीं.'

राजा—'असें असेल तर मदनाचा उफराटा केलेला भाता कसा बरें शोभणार नाहीं?'

**विचक्षणा**—'नंतर तिच्या गळ्यांत सहा* महिनें पूर्ण झालेल्या मोत्यांचा हार घातला.'

राजा ह्मणाला, 'तर तिच्या मुखचंद्राचें सेवन करण्याकरितां नक्षत्रांचा समुदाय आसपंतांत बसला आहे, असेंच दिसलें असेल.'

**विचक्षणा**—'तिच्या दोन्हीं कानांत रत्नांचीं कुंडलें† घातलीं.'

---

* मोत्यें कशीं उत्पन्न होतात ही गोष्ट सामान्यतः प्रसिद्धच आहे. तीं उत्पन्न झाल्यादिवसापासून पक्कीं होण्याला निदान सहा महिने लागतात असें प्राचीन शोधकांचें मत आहे. सहामहिन्यांच्या पूर्वी मोतीं काढलें तर तें जसें अपुऱ्या दिवसांचें मूल, तसें अपक्क असतें; असें प्राचीन ग्रंथकार ह्मणतात. अर्वाचीन शोधकांनीं जो शोध केला आहे त्यावरून हें प्राचीन ग्रंथकारांचें मत अगदीं बरोबर आहे असें दिसतें. स्वातिनक्षत्राच्या पावसाचे थेंब शिंपल्यांत पडले ह्मणजे त्यांचीं मोत्यें होतात असें जें प्राचीन ग्रंथकारांनीं वर्णन केलें आहे तें अर्वाचीन शोधक सर्वांशीं कबूल करीत नाहींत. मग बाकीच्या गोष्टींत फारसा फरक नाहीं.

† पूर्वकाळीं कुंडलें घालण्याचा प्रचार विशेष होता असें दिसतें.

राजा—'तर मग तिच्या मुखरूपी मदनीच्या रथाला, दोहोंकडे दोन चाकें लावून चालविल्यासारखेंच झालें.'

---

कोणताही प्राचीन ग्रंथ घेतला तर त्यांत स्त्रिया आणि पुरुष दोघांच्याही अलंकारांत कुंडलाचें नांव अवश्य येतें. व कुंडलें हीं आवश्यक पैकीं मुख्य भूषणांपैकीं एक भूषण असें मानीत असल्याचें दिसून येतें. या कुंडलांचा आकार मात्र चोहोंकडे एकसारखा नाहीं. निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या प्रकारचीं कुंडलें घालतात. कानाच्या खालच्या पाळीला भोकें पाडून त्यांत हें भूषण घालावयाचें असतें. दक्षिणदेशांत ह्याचा फारच प्रचार आहे. मलबारांत मुख्य दागिना कायतो कुंडलेंच. व तीं एवढीं मोठीं असतात कीं सुरती रुपयाच्या दसटीएवढा त्यांचा व्यास असतो. श्रीमान् लोक रत्नखचित कुंडलें घालतात; पण मजुरांच्या बायकादेखील लांकडाचीं बनावटी कुंडलें घालून आपली हौस पूर्ण करतात. व त्यामुळें त्यांच्या कानाला भलीं मोठीं भोकें असतात. महाराष्ट्रदेशांत याकुंडलाचा आकार फारच लहान झाला आहे. ज्याला कुडीं म्हणतात तींच कुंडलें होत. कुंडलशब्दाचा अपभ्रंश होऊन 'कुडें' हा शब्द झाला आहे. गुजराथेंत याकुंडलांचा आकार बराच मोठा झाला आहे. पण एकंदरीत मलबारांतील कुंडलांनीं मोठेपणाच्या संबंधानें इतर सर्व देशांतील कुंडलांना मागें सारलीं आहेत. यामुळें त्याला कुंडलराज म्हटलें तरी चालेल. केवळ दक्षिण देशांत मात्र पुरुष कुंडलें धारण करितात; पण इतर प्रदेशांत पुरुषांत त्यांचा फारसा प्रचार दिसून येत नाहीं.

**विचक्षणा**—'नंतर उत्तमप्रकारचें अंजन (काजळ) तिच्या उभय नेत्रांत घातलें.'

राजा—'या योगानें **मदना**च्या बाणांला जणुं काय तुह्मी विषच लाविलेंत.'

**विचक्षणा**—'नंतर तिच्या कुरळ्या केशांचा भांग काढून वेणी घातली.'

राजा—'या योगानें पूर्णचंद्रमंडळावर कृष्णमृगच तुह्मी बसविला?'

**विचक्षणा**—'नंतर त्या सुनयनेच्या वेणींत फुलांचा गजरा घातला.'

राजा—'तर मग तुह्मी **राहु** आणि **चंद्र** या दोघांचें त्या हरिणाच्या ठिकाणीं युद्धच जुंपविलेंत?'

**विचक्षणा**—'ह्याप्रमाणें बाईसाहेबांनीं आपल्या इच्छेप्रमाणें त्या कुमारीला ( **कर्पूरमंजरीला** ) नटवून थटवून सजविली.'

राजा—'एकून या योगानें क्रीडाकाननाला तुह्मी सुवासच उत्पन्न केला ह्मणावयाचा!'

हें एकून **कपिंजल** ह्मणाला, 'महाराज, तुह्मी खरें ह्मणा किंवा खोटें ह्मणा, मला जें वाटतें तें मी सांगतों. जिचे डोळे पाणीदार असून चंचल असतील तिलाच

काजळ शोभतें, जिचें उरःस्थळ विस्तीर्ण असेल तिला हार शोभतो, जिची कंबर भरगच्च असेल तिलाच माजपट्टा घातला तर उपयोग; नाहीं तर उगीच कसल्यातरी शेंबड्या मेकड्या बायकोला दागिनें घालून सजवितात त्यांत कांहीं अर्थ नाहीं. त्याला भूषण म्हणण्यापेक्षां दूषण म्हटलें तर चांगलें.'

अलंकारांनीं भूषित केलेली कर्पूरमंजरी अद्याप राजाच्या पाहण्यांत आली नव्हती. भैरवानंदानें ती स्नान करीत असतां तशीच तिला आणिली तेव्हांच कायती त्याणें पाहिली होती. व त्यावेळीं अलंकारांची अडचण नसल्यामुळें तिचें खरें सौंदर्य पूर्णपणें व्यक्त दिसत होतें. व राजाला तेंच फार आवडलें होतें. तो त्यावेळच्या शोभेची आठवण करून म्हणाला, 'पोटाला तीन वळकट्या पडल्या आहेत, केस अस्ताव्यस्त झाले आहेत, पाण्यानें भिजल्यामुळें नेसलेलें वस्त्र अंगाला चिकटलें आहे, अशी त्या वेळची ती तिची मूर्ति, आपलें सहजसौंदर्य पूर्णपणें व्यक्त करीत असून मोठी रमणीय वाटते!'

राजानें तिचें त्यावेळचें वर्णन केलें तें ऐकून कपिंजल रागावल्यासारखा होऊन म्हणाला, 'वाहवा! तुझें आपलें कांहीतरी निराळेंच! मी सर्वप्रकारच्या अलंकारांनीं

सुशोभित असें तिचें वर्णन केलें असून तूं, पाण्यानें वेलबुट्टे वगैरे पुसून गेले आहेत अशाच तिच्या रूपाची आठवण करतोस हें काय? मनुष्य स्वभावत: कितीही सुंदर असला तरी वस्त्रें, अलंकार इत्यादिकांनीं त्याची शोभा विशेष दिसते. उत्तम खाणीतलें रत्न असलें तरी सोन्याच्या कोंदणांत बसविल्यानें त्याला काहीं निराळीच शोभा येते हें तुला समजत नाहीं का?'

हें ऐकून राजा हंसून ह्मणाला, 'अरे वेड्या भटा, तुला त्यांतील खुबी काय ठाऊक? चट्टीपट्टीच्या जोरावर स्त्रिया अरसिक मनुष्याचें मन हरण करितात; पण रसिकांला तें चांगलें वाटत नाहीं. ते स्वाभाविकसौंदर्य असेल तेथेंच आसक्त होतात. अरे, द्राक्षारसाला साखर घालून गोडी आणावी लागते का?'

यावर विचक्षणा ह्मणाली, 'महाराजांनीं अगदीं खरें सांगितलें. जिचें उर:स्थळ विशाळ आहे; व जी आकर्णनयना आहे, जिचें मुख केवळ पृथ्वीवर उदय-पावलेल्या चंद्रासारखें सुशोभित असून शरीर दुसरी कांतीची नदीच आहे, अशा स्त्रीला दागिन्यांनीं सजविण्यांत काहींच अर्थ नाहीं. तरीदेखील लोक सजवितात, तें केवळ रूढीचें अनुकरण आहे. दुसरें कांहीं नाहीं.'

हें ऐकून राजा **कपिंजलाला** म्हणाला, 'अरे भोळ्या ब्राह्मणा, ही **विचक्षणा** तुला शिकवित आहे हें नीट नीटें ध्यानांत धर. ' कृत्रिम सौंदर्य आणण्याचा प्रयत्न करून चटिपटी करणें हें नटव्या स्त्रीचें काम आहे. जें स्वतःसिद्ध सौंदर्यानें दुसऱ्याचें मन हरण करील त्यालाच ह्मणावें लावण्य. ज्या वयांत आवश्यक सर्व गुण परिपूर्ण असतात, त्या वयांत स्वभावसुंदर स्त्रिया आपल्या लाव-ण्यानें जी विलक्षण शोभा धारण करतात, तीच उत्तम.'

कामी पुरुष हे एकप्रकारें नादिष्ट असतात. राजाला **कर्पूरमंजरीचा** अभिप्राय समजून घेण्याची मोठी उत्कंठा होती. आणि म्हणूनच **कपिंजलाला** त्यानें तिकडे पाठविला होता. सांप्रत सुदैवानें **विचक्षणा** आली असून ती तिचा भाव उत्तमप्रकारें कळवील असें असतां, राजाचें मुळीच तिकडे लक्ष न जातां स्वाभाविक सौंदर्य आणि कृत्रिम सौंदर्य यांचें वर्णन करण्याकडेच त्याची तार लागली होती! यामुळें **कर्पूरमंजरीचा** हेतु समजून घेणें तसेंच एकीकडे राहिलें. पण **विचक्षणा** मुद्दाम तेंच कार्य घेऊन आली होती. तेव्हां तें सौंदर्याचें वर्णन एकीकडे ठेवून ती राजाला ह्मणाली, 'महाराज, दुसरी एक विनंती करावयाची आहे. मी त्या **कर्पूरमंजरीच्या** बरोबर गेले ती केवळ बाईसाहे-

यांच्या ( गणांच्या ) आज्ञेवरूनच गेलें असें नाहीं. तर तिचें आणि माझें जातक जमलें आहे. आह्मां दोघींची अशी कांहीं तारामैत्री जमली आहे कीं, लहानपणापासून एकेठिकाणीं वाढलेल्या सखींची देखील तशी जमत नाहीं. सांप्रत मी तिच्या कार्याविषयीं प्रयत्न करीत आहे. तिणें लिहून पाठविलेल्या त्या श्लोकांत तिणें आपला भाव पूर्णपणें व्यक्त केलाच आहे. तरी मी तिची दासी होऊन तिच्या तर्फेनें आणखी एकवार विनंती करितें. सरकार, तिची अवस्था कशी झाली आहे ह्मणून सांगूं. परीक्षा पाहण्याकरितां वेळोवेळ सख्यांनी तिच्या छातीवर हात टेकून पाहिलें. तों ती रसरशीत असून नेहमीं धडधडत असते. हाताचा स्पर्श देखील तिला सहन होत नाहीं. पण तें तरी कशाला पाहिजे. मी काय सांगतें तें एकावें ह्मणजे झालें. चंद्राचे किरण

---

* ज्योतिषशास्त्रकर्त्यांनीं विवाह मैत्री इत्यादि संबंधाला नक्षत्रांचा योग अनुकूल वें प्रतिकूल कसकसा असतो तें वर्णन केलें आहे. मेष वृषभादि राशी; अश्विनी, भरणी इत्यादि नक्षत्रें व सूर्य, चंद्र इत्यादि त्यांचे अधिपति; यांचे निरनिराळे वर्ग केले आहेत. व त्यांत मित्र, शत्रु, आणि उदासीन असे तीन भेद आहेत. वे स्त्रीपुरुषांत किंवा मित्रामित्रांत विशेष प्रीति राहण्याला वर सांगितलेले योग कारणीभूत आहेत असें त्यांचें मत आहे.

तोंडावर पडलें असतां आपला हात छत्रीमारखा त्यांच्या आड धरून ती रात्र कंठीत आहे! यापुढें आणखी काय सांगायचें आहे? हें ऐकून एक प्रकारें—आपल्याला संतोष व आम्हीं होईल. बरें मी आतां जातें. मला इकडे येऊन फार वेळ झाला. आणखी काय सांगायचें तें **कपिंजल** सांगेल. त्याप्रमाणें आपण केलें मात्र पाहिजे. नाहीं तर साराच घोटाळा होईल.' असें सांगून राजाची आज्ञा घेऊन **विचक्षणा** निघून गेली.

**विचक्षणेनें कर्पूरमंजरी**शीं आपली विशेष मैत्री झाली असल्याचें मुद्दामच वर्णन केलें होतें. कारण ती नुक-तीच येथें आली आहे तेव्हां तिच्या जिवाभावाचें कोणी मनुष्य येथें असण्याचा संभव नाहीं. जनानखान्यांतील सर्व मंडळी राणीच्या ताब्यांतली. तेव्हां आपण तिच्या संबंधानें मन मोकळें करून कोणाजवळ कांहीं सांगितलें तर त्याचा परिणाम काय होईल कोणास ठाऊक? अशी राजाच्या मनांत कदाचित् शंका असेल व म्हणूनच तो मन मोकळें करून बोलणार नाहीं आणि आपण ज्या गोष्टी सांगितल्या त्यांवर कदाचित् विश्वासही ठेवणार नाहीं असें समजून तिनें मुद्दामच त्या मैत्रीचें वर्णन केलें. त्यावरून आपण **कर्पूरमंजरीची** हितकर्त्री असून तिच्याच कामाविषयीं

झटन आहे असें तिनें दर्शविलें. अल्पकाळांत इतकी गट्टी कशी जमली? अशी शंका येईल ह्मणून तारामैत्री असल्याचें दाखविलें. तात्पर्य **विचक्षणे**नें राजाला आपल्यावर पूर्णपणें विश्वास ठेवून वागण्याविषयीं योग्य सूचना केली.

त्याप्रमाणें राजालाही तें सर्व खरें वाटलें. तो **कपिंजला**ला म्हणाला, 'अरे, त्या **विचक्षणे**नें बाकीचें कार्य तूं सांगशील असें जें ह्मटलें, तें कोणतें कार्य तें सांग पाहूं?'

**कपिंजल** ह्मणाला, 'मित्रा, अरे दुसरें कसलें असणार? सांगे तुझी चैन, आणखी काय? आज **हिंदोलचतुर्थी**चा* उत्साह आहे. तेव्हां तुझी राणी स्वतः **कर्पूरमंजरी**लाच **गौरी** बनवून तिला हिंदोल्यावर बसविणार आहे. याक-

---

* 'हिंदोला' ह्मणजे हिंदोळा अथवा झोपाळा. निरनिराळ्या देवांना त्यांच्या त्यांच्या नियमित दिवशीं हिंदोल्यावर बसवून उत्सव करावा असें धर्मशास्त्रांत सांगितलें आहे. हे उत्सव बहुतकरून **वसंत**ऋतूंत होतात. उत्तरहिंदुस्थानांत **मथुरा**, **वृंदावन**, **अयोध्या** इत्यादि प्रसिद्ध ठिकाणीं हे उत्सव फार मोठे होतात. तद्देशीय लोक याला हिंदोला ह्मणतात व देवाला सजवून हिंदोल्यावर बसवून झोके देत देत अनेक प्रकारचीं गाणीं गातात. **गौरींचा** हिंदोलोत्सव चतुर्थीचे दिवशीं करावा असें सांगितलें आहे. ह्मणूनच त्या चतुर्थीला **हिंदोलचतुर्थी** असें ह्मणतात.

रितां **मरकतपुंज**नांवाच्या बंगल्याच्या गच्चीवर बसून तूं आपल्या डोळ्यांचें पारणें फेडून घे! त्या सटवीनें (**विचक्षणेनें**) सांगितलेलें कार्य तें हेंच. समजलासना? गड्या, एकंदरींत तुझें नशीब सव्वा हात खरें! राणी पक्की वस्ताद आहे तरी तिला भुरळ पडली. म्हाताऱ्या मांजरीला दूध म्हणून खुशाल ताक पाजविलें, अशी स्थिति झाली! ही सगळी मसलत अस्मादिकांची आहे, हें मात्र ध्यानांत असूं दे!'

राजा म्हणाला, 'गड्या, तूं असें कांवें म्हणतोस? तुझ्यावांचून माझ्या कार्याला दुसरा कोण झटणार आहे? आणि तें त्याच्या हातून होईल तरी कसें? चंद्रावांचून समुद्राला दुसऱ्याच्यानें भरती कधीं तरी आणवेल काय?'

**कपिंजल** म्हणाला, 'तें असो. आतां लवकर चल. उत्सवाची वेळ होत आली. आपण त्या **मरकतपुंज** महालाच्या गच्चीवर लवकर जाऊन बसूं या' असें म्हणून दोघेही तिकडे गेले.

इकडे राणी **विभ्रमलेखेनें कर्पूरमंजरीला** खूप सजवून तयार केली होती. कधीं न होणारी वहिणीची भेट झाल्यामुळें तिला, ती कोठें बसेल व कोठें उठेल असें झालें होतें. तिचा (राणीचा) स्वभाव कांहींसा संशयखोर असून

उदार होता. राजाचा डोळा तिच्यावर होताच; परंतु **कर्पूरमंजरी**चेंही मन राजावर आसक्त झालें आहे, ही गोष्ट राणीच्या ध्यानीमनींदेखील नव्हती. आपली लाडकी बहीण दोन दिवस आपल्या येथें आली आहे, तर सर्वप्रकारें तिला आनंद व्हावा अशी राणीची इच्छा होती. **गौरी**चा वेष देऊन तिला हिंदोल्यावर बसविण्याची कल्पना राणीच्या मनांत प्रथम आली नव्हती. पण त्या कारस्थानी **विचक्षणे**नें मुद्दाम तिला तसें करण्यास सुचविलें. व तिनेंही बहिणीच्या लोभास्तव मोठ्या आनंदानें ती गोष्ट मान्य केली.. पण इकडे काय काय तजविजी झाल्या आहेत, हें तिला मुळींच ठाऊक नव्हतें! खूप नटूनथटून तयार झालेली **कर्पूरमंजरी** राजाच्या दृष्टी पाडावी असा विचार करूनच **विचक्षणेनें कपिंजला**करवीं ती गोष्ट त्याच्या कानावर घातली.

इकडे तर तयारीच होती. **कपिंजला**नें सांगतांच स्वारी त्याला बरोबर घेऊन **मरकतपुंज** नांवाच्या महालाच्या गच्चीवर जाऊन बसली. राणीला ही गोष्ट मुळींच माहित नव्हती. तिनें बाकीची सर्व तयारी करून **कर्पूरमंजरी**ला हिंदोल्यावर बसविली. आणि मोठ्या कौतुकानें इतर पुष्कळ स्त्रियांसहवर्तमान गानें गात राणी तिला झोंके देऊं लागली.

हा प्रसंग पाहून कपिंजल राजाला म्हणाला, 'मित्रा पहा, पहा, हा येथें पूर्ण चंद्र उगवला आहे तो!'

'कपिंजलाचें हें भाषण ऐकून राजाला मोठा चमत्कार वाटला. कारण ही तिसऱ्या प्रहरची गोष्ट होती. दिवसा चंद्राचा उदय कोठून होणार? ह्मणून तो चकित होऊन अमळ थांबला नंतर कर्पूरमंजरीच्या मुखाकडे पाहून म्हणाला, 'ओहो! झोंपाळ्यावर बसलेल्या माझ्या वल्लभेच्या ( कर्पूरमंजरीच्या ) मुखाला पूर्ण चंद्र असें म्हणतोस काय? वाहवा, तुझें वर्णन ठीक आहे! खरोखर हा पूर्ण चंद्रच आहे. ह्या नगरींतील इतर स्त्रियांचीं मुखें निस्तेज करणारा, आपल्या कांतिरूप उदकानें आकाशरूप गुहा स्वच्छ करणारा, पाहणाऱ्यांच्या मनांतील सौंदर्याचा गर्व निर्दलन करणारा असा हिंदोल्यावर बसलेला या सुंदरीचा हा मुखचंद्र पौर्णिमेच्या चंद्रासारखाच आहे यांत कांहीं संशय नाहीं!'

झोंपाळ्याच्या मागेंपुढें होणाऱ्या गतीकडे पाहून म्हणाला, 'गड्या, कपिंजला, मी वर्णन करतों तें खरें आहे किंवा नाहीं तें तूंच पहा. वर लावलेल्या ध्वज आणि पताका यांनीं शोभणारी, घंटांच्या शब्दानें अप्सरांच्या विमानासारखी दिसणारी, वेगानें मागें जाणारी व पुढें

येणारी ही दोला अर्थात् हिंदोला, प्रेक्षकांचें मन हरण करते किंवा नाहीं तें पहा बरें!,

राजानें संक्षिप्त रीतीनें वर्णन केलें. तें ऐकून **कपिंजल** म्हणाला 'मित्रा, तूं सूत्रकार* झालास. आतां मी वृत्तिकार† होऊन विस्तारपूर्वक याचें वर्णन करतों. वर उरःस्थलाचा विशेष भार होऊन त्याखालीं दबलेलें हि नें **( कर्पूरमंजरीचें )** चरणकमलद्वय पैंजणांच्या ध्वनींच्या

---

* संस्कृतभाषेंत प्रत्येक शास्त्रीयविषयांचे मूलग्रंथ **सूत्रें** या नांवानें प्रसिद्ध आहेत. सूत्र (सूत) या शब्दाचा सामान्यतः अर्थ अस्थूल अथवा सूक्ष्म किंवा बारीक असा घेतां येईल. विस्तृत असलेल्या शास्त्रीयविषयाचा अगदीं संक्षेप करून यांत समावेश केलेला असतो म्हणून याला सूत्र असें म्हणतात. **बादरायणसूत्र, जैमिनिसूत्र, गौतमसूत्र** इत्यादि वेदान्त, **मीमांसा, न्याय** वगैरे शास्त्रांचीं सूत्रें प्रसिद्ध आहेत. अशाप्रकारचीं सूत्रें करणारांला **सूत्रकार** म्हणतात. राजानें फार संक्षिप्तरीतीनें वर्णन केल्यावरून कपिंजलानें त्याला **सूत्रकार** म्हटलें आहे.

† **वृत्ति** या नांवाचे प्रत्येक शास्त्रांत संक्षिप्त व्याख्याग्रंथ आहेत. सूत्रांतील एकेक पद घेऊन त्याचा अक्षरशः अर्थ ज्यांत केलेला असतो त्याला **वृत्ति** म्हणतात. त्यांचीं विशेष लक्षणें सांगितलीं तर फार विस्तार होईल. व वाचकांला त्यांचा विशेष बोधही होणार नाहीं. याकरितां सामान्यतः वृत्ति म्हणजे सूत्रांची व्याख्या इतकाच अर्थ घेतला तर पुरे आहे.

मिषानें जणुं काय मदनाचे सुस्कारे सोडीत आहे. हिंदोल्याच्या हिसक्यानें हालणारा इच्या गळ्यांतील हार कामराजाची कीर्ति हीच कोणी वेळ हिचा विस्तार करीत आहे की काय असें वाटतें. वाटोळी गरगरीत अशी हिची कंबर माजपट्ट्याच्या घागऱ्यांच्या मिषानें किलकिलाट करते आहे असें वाटतें. समोर वाऱ्याचा झोंक आल्यामुळें तोंड बाजूला फिरविणारी हि जणुं काय मदनाला बोलवून आपल्या बाजूला बसवीत आहे असें दिसतें. दोन्ही कानांतल्या कुंडलांना हिसके बसल्यामुळें त्यांच्यांवर असलेले मोत्यांचे काप वारंवार केशरानें माखलेल्या गालांवर आपटताहेत, त्याच्या योगानेंही, हिंदोला हालविण्याचें कौतुक दाखवीत आहे असें वाटतें. कानांपर्यंत विस्तार पावलेले व कौतुकानें प्रफुल्लित झालेले इचे नेत्र, जणुं काय मदनाचे बाणच झाले आहेत. झोके घेण्याचा खेळ विरस न व्हावा म्हणूनच की हिच्या पाठीवर लोंबत असलेली लांब वेणी जणुं काय मदनाचा चाबूकच आहे! याप्रमाणें हिंदोलोत्सवांत उज्ज्वल दिसणारी चर्या पाहून मदनरूपि चित्रकार तीं कोणाच्या मनावर ठसविल्यावांचून राहील!

हें ऐकून कपिंजल लक्ष्यपूर्वक पाहून म्हणाला, 'अरे,

हो खरेंच, मित्रा, विद्युल्लतेसारखी ती क्षणभर दिसून लागलीच नाहींशी झाली.'

राजा ह्मणाला, 'असें ह्मणूं नको. हरिश्चंद्राच्या* नगरीसारखी ती आह्माला दिसली; पण पाहतां पाहतां नाहींशी झाली.'

**कपिंजल** ह्मणाला, 'यें कांहीं चिंता नाहीं. प्रियमित्रा, ह्या **मरकतपुंज**महालांतच वसून तूं तिची वाट पहा. संध्याकाळ होत आला आहे. तेव्हां कदाचित् पुन्हां योग येईल.'

कामविकार ज्वरासारखा असतो. ह्मणूनच त्याला **कामज्वर** असें म्हणतात. राजाच्या अंगांत यावेळीं त्या ज्वराचा संचार झाला होता. चहूंकडे रमणीय देखावा असून, शीतल अशा बागेंत यावेळीं तो होता; तरी कामज्वराचा संचार झाल्यामुळें त्याच्या अंगाची काहिली होऊं लागली. तो ह्मणाला, 'गड्या **कपिंजला**, यावेळीं अत्यंत शीतल असें बर्फदेखील मला संतापदायक होत आहे!'

**कपिंजल** ह्मणाला, 'तर मग त्या **वसंतशोभे**शीं विनोद करीत क्षणभर येथेंच बैस. मी जाऊन शीतल

* ह्या नगरीचें वर्णन हरिश्चंद्राख्यानांत सविस्तर आहे.

उपचारांची सामुग्री घेऊन येतों.' असें सांगून **कपिंजल** गच्चीवरून खालीं उतरला. इतक्यांत त्याला, **विचक्षणा** हातांत शीतलउपचाराचे पदार्थ घेऊन जात होती, ती भेटली.

जसा इकडे राजा कामज्वराने संतप्त झाला होता. तशीच तिकडे **कर्पूरमंजरी**ही त्या ज्वरानें जेर पडली होती. हिंदोल्यावर ती बसली होती त्यावेळीं समोरच्या **मरकतपुंजा**च्या गच्चीवर राजा बसला आहे हें तिला माहित होतें. **विचक्षणेनें** अगोदर सुचवून ठेविलें होतें. ह्मणून ती हिंदोल्यावर बसली होती तरी तिची दृष्टि एकसारखी राजाकडे लागली होती. व उभयतांला उभयतांनीं चांगल्या रितीनें पाहिलें होतें. यामुळें जसा राजा तिच्याकरतां विव्हळ झाला होता, तशीच तीही त्याच्याकरतां विव्हळ झाली होती.

**विचक्षणेनें**—'आज सायंकाळीं उभयतांचा समागम होईल अशी तजवीज करितें', ह्मणून **कपिंजला**-करवीं राजाला सूचना केली होती. जसजसा सायंकाळ जवळ जवळ येत चालला, तसतसें राजाचें चित्त फारच अस्वस्थ होऊं लागलें. तो सुस्कारा सोडून ह्मणाला, 'भेटीच्या संकेताची वेळ तर अगदीं जवळ जवळ येत

चालली आहे; या कामांतले आमचे मंत्री ( **कपिंजल** आणि **विचक्षणा**) यांणींही मला आश्वासन दिलें आहे, तरी पण काय होतें कोणास ठाऊक? खरोखर मला त्याचा मोठा चमत्कार वाटतो. तिचे हात आणि पाय हे केवळ कोमलपल्लवासारखे सुकुमार आहेत, कमलपत्रासारखे नेत्र आहेत, कमलासारखें मुख आहे, सोनचांफ्याच्या फुलासारखा शरीराचा वर्ण आहे, अशा सर्व मनोरम लक्षणांनीं युक्त असून ती माझ्या शरीराला अत्यंत संताप देते हा काय चमत्कार!'

याप्रमाणें राजा इकडे तळमळत बसला आहे, तों तिकडे **कपिंजल** आणि **विचक्षणा** यांची गांठ पडली. **विचक्षणेच्या** हातांत थंड उपचाराचे पदार्थ होते. ते पाहून **कपिंजल** म्हणाला, 'अग, हें काय तुझ्या हातांत आहे?'

**विचक्षणा**—'शीतळ उपचारांची सामुग्री आहे.'

**कपिंजल**—'ती कोणाकरतां नेतेस?'

**विचक्षणा**—'माझी प्रियसखी **कर्पूरमंजरी** इच्या करतां नेतें.'

**कपिंजल**—'तर मग मलाही त्यांतली अर्धी दे.'

**विचक्षणा**—'ती कोणा करतां?'

**कपिंजल**—'महाराजां करतां?'

**विचक्षणा**—'त्यांना शीतल उपचार करण्याचें काय कारण?'

**कपिंजल**—'**कर्पूरमंजरी**ला तरी हे उपचार करण्याचें काय कारण?'

**विचक्षणा**—'तुला हेंदेखील ठाऊक नाहीं का? महाराजांचें दर्शन हेंच कारण झालें आहे!'

**कपिंजल**—'मग तुलादेखील हें ठाऊक नाहीं का? कीं **कर्पूरमंजरी**चें दर्शन हेंच महाराजांना शीतल उपचार करण्याला कारण झालें आहे!' असें बोलून उभयतांही हसूं लागलीं.

**विचक्षणा**—'तर मग महाराज यावेळीं कोठें आहेत?'

**कपिंजल**—'दुसरीकडे कोठें असणार? तुझ्या सांगण्यावरून **मरकतपुंज**महालांत वाट पाहत बसले आहेत.'

हें ऐकून **विचक्षणा** ह्मणाली, 'तर मग असें कर; कीं महाराजांसह त्या महालाच्या द्वारांत उभा रहा. इतक्यांत सहज उभयतांचें दर्शन होईल. म्हणजे अर्थात् त्या शीतल उपचारांच्या सामुग्रीला जलांजली देतां येईल.

हें ऐकून **कपिंजल विचक्षणे**च्या पाठीवर एक

थप्पड मारून म्हणाला, 'सटवे मग, जा कोठें तरी. जेथें गेल्यावर परत येणार नाहींस तेथें जा!' असें बोलून **कपिंजलानें** तिला ढकलली. आणि पुनः म्हणाला, '**रक्तपुंजाच्या** दारांत कशाला बसायला सांगितलेंस?'

**विचक्षणा** ह्मणाली, 'अग भद्रा, मी सांगितलें तसें मुकाट्यानें कर. तुला अधिक पंचाईत कशाला पाहिजे? बाईसाहेबांच्या आज्ञेवरून स्वतः **कर्पूरमंजरीच** इकडे येणार आहे.'

**कपिंजल**—'राणीनें तुला काय हुकूम केला आहे?'

**विचक्षणा**—'अरे, बाईसाहेबांनीं तीन झाडांचे लहान लहान रोपे लावले आहेत.'

**कपिंजल**—'कसल्या कसल्या झाडांचे?'

**विचक्षणा**—'**कोरांटी, तिळवा** आणि **अशोक** यांचे रोपे लावले आहेत.'

यावर **कपिंजल**—'अग बटकीचे पोरी, या दांडक्यानें तुझें आतां कपाळ फोडतों. अग, राणीनें तीन झाडें लावलीं त्यांच्याशीं आणि **कर्पूरमंजरीशीं** काय संबंध? तूं सरळ कां बोलत नाहींस?'

**विचक्षणा** म्हणाली, 'आर्या **कपिंजला**, असें काय करतोस रे? माझें बोलणें पुरतें ऐकून तरी घे. बाई-

साहेबांनीं तीं तीन झाडें लावली आहेत. त्यांना कधीं फुलें येतील आणि तीं मी कधीं पाहीन; असें त्यांना झालें आहे. ह्मणून त्यांनीं तिला (**कर्पूरमंजरीला**) त्या झाडांचे दोहद करण्यास सांगितलें आहे. **कोरांटी तिळक** आणि **अशोक** या तिन्ही वृक्षांला; अनुक्रमें उत्तम स्त्रीचें–आलिंगन, दर्शन, आणि डाव्या पायाची लाथ, हे दोहद आहेत. यांच्यायोगानें त्यांना लवकर फुलें येतात; असें शास्त्रांत सांगितलें आहे. **कर्पूरमंजरीला** आज हिरेमुक्तकांच्या अलंकारांनीं खूप सजविली आहे. मुक्ताफ हिंदोल्यावर बसण्याचा उत्सव झाला. तेव्हां अंमळ विश्रांति घेऊन आजच त्या तीन झाडांचे दोहद पुरवावेत, असें बाईसाहेबांनीं सांगितलें आहे. म्हणून ती इकडे येणार आहे. तिला विशेष काहिली होऊं लागली म्हणून मी ही शीतलोपचारांची सामुग्री तिकडे घेऊन चाललें आहें.'

हें ऐकून **कपिंजल** ह्मणाला, 'तर मग मी असें करतों कीं, **मरकतपुंजांत** माझा प्रियमित्र (राजा) बसला आहे त्याला बोलावून आणून त्या **कोरांटीच्या** झाडाच्या समोरच **तमालाचा** मोठा वृक्ष आहे; त्याच्या आड उभा करतों. ह्मणजे उभयतां एकमेकांच्या नीट दृष्टीस पडतील.'

याप्रमाणें उभयतांनीं संकेत केला. **विचक्षणा** जनानखान्यांत **कर्पूरमंजरी**कडे गेली. व **कपिंजल** राजाकडे गेला, आणि त्याला त्याणें हें वर्तमान सांगितलें. व संकेताप्रमाणें त्याला त्या **तमाल**वृक्षाच्या आड आणून उभा केला.

तिकडे **विचक्षणा** जनानखान्यांत गेली; तों तेथें **कर्पूरमंजरी** फार फारच व्याकुळ होऊन पडली आहे, व कामज्वरानें तिच्या सर्वांगाची काहिली होत आहे, असें पाहून **विचक्षणे**नें तिला वारा घालून अंमळ सावध केली. नंतर तिला राणीची आज्ञा कळवून वर सांगितलेल्या त्या तीनही झाडांला दोहद करण्याकरतां ती तिला घेऊन निघाली. यावेळीं तिच्या नखशिखांत सर्व शरीरावर दागिन्यांचा एक प्रकारें मोठा भार झाला होता. त्यांतून ती फार व्याकुळ झाली होती यामुळें तिच्यानें लवकर लवकर चालवत नव्हतें. **विचक्षणे**चा हात धरून हळू हळू ती त्या झाडांजवळ येऊन पोंचली.

त्या दोघी तेथें आल्यावर, संकेताप्रमाणें राजा येऊन बसला आहे कीं नाहीं हें पाहण्याकरितां **विचक्षणा** अंमळ बाजूला गेली. तेव्हां ती जवळ नाहीं असें पाहून **कर्पूरमंजरी** घाबरी झाल्यासारखी होऊन ह्मणाली, '**विचक्षणे**, अग **विचक्षणे**, मला सोडून कुठें गेलीस?'

इतक्यांत **विचक्षणा** नेमलेल्या ठिकाणीं राजा बसला आहे असें पाहून परत तिच्याजवळ येऊन ह्मणाली, 'अग, ही पहा मी येथेंच आहे. कोठें गेलें नाहीं. गडे आतां उशीर लावूं नको. बाईसाहेबांनीं सांगितल्या प्रमाणें लवकर कर.'

**विचक्षणेचें** हें भाषण ऐकून राजा **कपिंजलाला** ह्मणाला, 'अरे, ही ( **विचक्षणा** ) तिला ( **कर्पूरमंजरीला** ) काय करायला सांगत आहे?'

**कपिंजल** ह्मणाला, 'उगीच रहा, कांहीं बोलूं नकोस. येथें झाडाच्या आड राहून काय काय होतें तें मुकाट्यानें पहा.'

इकडे **विचक्षणा कर्पूरमंजरीला** कोरांटीच्या झाडाजवळ नेऊन म्हणाली, 'प्रियसखे, हा कुरवकवृक्ष तुझ्या आलिंगनरूपि दोहदाची आशा धरून बसला आहे. याचा हेतु पुरव.'

हें ऐकून **कर्पूरमंजरीनें** प्रेमपूर्वक त्या कोरांटीच्या झाडाला आलिंगन दिलें तेव्हां असा चमत्कार झाला कीं, आलिंगन देतांच त्याला एकाएकीं फुलांचा बहार आला! तो चमत्कार पाहून राजा **कपिंजलाला** ह्मणाला, 'पहा पहा तरी हा नवीन कुरवक वृक्ष! ह्या सुंदरीनें

(**कर्पूरमंजरीनें**) त्याला प्रेमभरानें आलिंगिल्यामुळें त्याला इतका फुलांचा बहार आला आहे कीं, त्याच्या वासाला लुब्ध झालेल्या भ्रमरींची जणुं काय यात्राच मिळाली आहे!'

**कपिंजल** राजाला ह्मणाला, 'ओहो! खरोखरच हें मोठें गौडबंगाल. हा कुरबकवृक्ष जरी बाल असून याला या तरुणीनें (**कर्पूरमंजरीनें**) दृढ आलिंगन दिल्यामुळें एकाएकीं, जणुं काय मदनाचे बाणच असा, फुलांचा बहार, हा धारण करीत आहे, हें कसें झालें? याचा मला मोठा अचंबा वाटतो.'

राजा ह्मणाला, 'अरे, दोहदांचा प्रभावच असा आहे. त्यांत इतकें आश्चर्य मानण्यासारखें कांहीं नाहीं.'

इकडे **विचक्षणा कर्पूरमंजरी**ला ह्मणाली, 'अग, हा तिळव्याचा वृक्ष आहे पहा. याला तुझें प्रेमभरित अवलोकनरूप दोहद पाहिजे आहे, तो याचा हेतु पुरीव.'

हें ऐकून **कर्पूरमंजरीनें** प्रेमभरितदृष्टीनें मोठ्या नखऱ्यानें त्या तिळव्याकडे अवलोकन केलें. त्यायोगानें त्याला तत्काल फुलें आलीं! तो चमत्कार पाहून राजा ह्मणाला, 'गड्या, हें एक दुसरें आश्चर्य पहा. ज्यांचा वेग मोठा तीक्ष्ण, स्वतः अत्यंत चंचल, काज-

ळाचा ज्यीला संपर्क झाला आहे, धनुष्याला बाण लावून सिद्ध झालेला **मदन** ज्यांच्या जवळ आहे; अशा इच्या नेत्रांची दृष्टि ह्या तिलकवृक्षावर पडली असून त्यामुळें याला मंजरींचे झुबकेचे झुबके आले आहेत. व हीमुळें त्याच्या सर्वांगावर रोमांच उभे राहिले आहेत कीं काय असें दिसतें!'

याप्रमाणें दोन वृक्षांचे दोहद झाले. नंतर **विचक्षणा** अशोकाच्या झाडाजवळ **कर्पूरमंजरीला** नेऊन ह्मणाली, 'हा पहा अशोक. कामी पुरुषाप्रमाणें हा तुझ्या डाव्या पायाच्या लाथेचा प्रसाद मिळण्याची आशा करीत आहे! तर तूं याच्यावर अनुग्रह करून याच्या मनांतले कोड पुरीव.'

हें ऐकून **कर्पूरमंजरीनें** अशोकालाही प्रेमपूर्वक लाथ मारली. त्यासरसा तो फुलांच्या भारानें ओथंबला! तो चमत्कार पाहून राजा ह्मणाला, 'ह्या इंदुवदनेनें, ज्यांत पैंजणांचा ध्वनि होत आहे, अशा आपल्या कोमल पायाची लाथ केवळ अशोकाच्या हिताकरितांच मोठ्या जोरानें मारली; नव्हां नाजुक अशा माझ्या वल्लभेच्या पायाला, त्याच्या कठोर अंगाचा स्पर्श झाल्यामुळें दुखत असलेले तिचे पोथ रगडण्याकरितांच कीं काय, यानें आपल्या

कन्या ( डहाळ्या ) पुष्पभारांच्या संभारासह खालीं पाठविल्या आहेत असें वाटतें!'

हें ऐकून **कपिंजल** राजाला म्हणाला, 'मित्रा, मला एक दुसरी मोठी शंका आहे, वस्तुतः हें दोहद पुरविण्याचें काम स्वतः राणीनेंच करावयाचें! असें असून तिनें आपण न करितां त्या कामावर ह्या **कर्पूरमंजरी**ला नेमली ह्याचें कारण काय ह्याविषयीं तुझ्या लक्षांत कांहीं आलें आहे का?'

राजा म्हणाला, 'मला त्याचें काय ठाऊक? असलें तर तुलाच माहित असायचें.'

**कपिंजल** म्हणाला, 'हो हो, मला ठाऊक आहे. आणि मी तें सांगेन देखील. पण तुला राग नाहीं येणार तर!'

राजा म्हणाला, 'अरे, येथें रागाचें काय कारण? जीभ फुलवून खुशाल पाहिजे तें बोल.'

**कपिंजल** म्हणाला, 'बोलूंच तर आतां. सांगतों हूं, ऐक. अरे, जी स्त्री उपजत सुंदर असेल तिचें तें सौंदर्य अखेर-पर्यंत प्रत्येक अवयवांत असतेंच. पण तारुण्याची मौज कांहीं निराळीच आहे. तारुण्यांत शोभा ही अधिदेवते-सारखी त्यांच्या शरीराला व्यापून असते.'

'राणी प्रौढी सुंदर आहे तरी ती वयस्कर झाली असल्या-कारणानें तिला तितका बहार नाहीं. व म्हणूनच तिनें **कर्पूरमंजरी**ला या कामावर नेमलें, असें **कपिंज-ला**ला बोलून दाखवायचे होतें. पण तें त्यानें राजाला राग न यावा म्हणून मोठ्या युक्तीनें सुचविलें. तें ऐकून राजा म्हणाला, 'पुरे पुरे, तुझा अभिप्राय काय तो मी समजलों. पण मी काय सांगतों तें ऐक. अरे, ज्या बाला असतात त्यांला प्रत्येक गोष्टीचें मोठें कौतुक असतें; त्यामुळें त्या अल्लड असतात. पण ज्या अंमळ प्रौढ असतात त्यांच्याठिकाणींच काय तें मुख्य रहस्य आहे; हें तुला कोठें ठाऊक आहे.'

**कपिंजल** म्हणाला, 'बाबा, आम्हांला तें कांहीं ठाऊक नाहीं. आम्ही आपले रूपाला पाहून भुलणारे आहों. पहा, हे निर्जीव वृक्षदेखील रूपाकडे पाहूनच प्रफुल्लित झाले आहेत. जें तुझें काय रहस्य म्हणतोस, तें या बिचाऱ्यांला मुळींच ठाऊक नाहीं.'

राजाचा आणि **कपिंजला**चा याप्रमाणें संवाद चालला आहे. इतक्यांत भाटांनीं सायंकाल झाल्याची सूचना केली. ते म्हणाले, 'हा संध्यासमय महाराजांना सुख-कर होवो! लोकांच्या नेत्रांसह कमलवन अर्धे मिटवि-

णारा, मानिनीस्त्रियांना उत्सुक करणारा, अळित्याच्या रंगानें रंगविलेल्या वस्त्रासारखे ज्याचे किरण लाल आहेत, पिकलेल्या नारिंगासारखा पिंगट दिसणारा, चक्रवाक-पक्ष्यांचा मित्र हा भगवान् **दिनमणि** अस्ताचलावर जाऊन विश्रांति घेण्यास प्रवृत्त झाला आहे.'

याप्रमाणें भाटांनीं पुकारलें तें श्रवण करून राजा **कपिंजलाला** ह्मणाला,' गड्या, अरे खरोखरच सायंकाल झाला, तेव्हां आतां काय करावें ?'

**कपिंजल** ह्मणाला, ' मुकाट्यानें आपल्या ठिकाणीं निघून जावें. आणि दुसरें काय करावयाचें! ह्या गांढ-लेकांनीं ( भाटांनीं ) सारा घात केला. तेव्हां आतां काय बोलावें ?'

इकडे संध्याकालाचा इषारा ऐकून **कर्पूरमंजरी विचक्षणेला** ह्मणाली,' गडे, येथें आणखी कितीवेळ रहा-यचें? संध्याकाल झाला. आतां आपण लवकरच जाऊंया.'

ही गोष्ट **विचक्षणेला**ही मान्य झाली. नंतर त्या दोघी तेथून निघून हळू हळू आपल्या ठिकाणीं गेल्या. व **कर्पूरमंजरीकडे** पाहून सुस्कारे सोडीत राजाही आप-ल्या महालाकडे गेला.

---

# कलिका तिमरी.

स्त्रीवर ज्याचें मन आसक्त झालें असून तिची प्राप्ति होत नसली अथवा त्याला विलंब लागत असला म्हणजे त्या पुरुषाची अवस्था मोठी चमत्कारिक होते. त्याला आसनीं, शयनीं, भोजनीं सार्वकाल तीच दिसत असते. वर सांगितल्याप्रमाणें राजा **चंडपाल** आपला नर्मसचिव **कपिंजल** यासहवर्तमान महालांत गेला. त्या रात्रीं त्यानें राणीची भेट घेतली नाहीं. कारण आपलें मन ठिकाणावर नाहीं. तेव्हां ही गोष्ट तिच्या लक्षांत येईल. व ती कदाचित् रागावेल. म्हणून त्यानें त्या दिवशीं तिकडची दिशाच सोडली. रात्रभर तो हुश्श हुश्श करीत तळमळत होता. पहाटे पहाटे त्याचा कोठें अंमल होऊं लागला. पण त्यावेळीं तरी गाढ झोंप कोठून लागणार? त्यांतल्या त्यांत त्याला **कर्पूरमंजरीच्या** संबंधानें एक स्वप्न पडलें.

सरासरी त्यानें ती रात्र कशीतरी घालविली. प्रभातसमय होतांच त्याचा प्रियमित्र **कपिंजल** त्याला भेटायला आला. व दोघेही एकमेकांला भेटून प्रेमानें गोष्टी

करीत बसले. त्यांच्या गोष्टींला कर्पूरमंजरीवांचून दुसरा कांहीं विषय नव्हताच.

राजानें स्वप्नांत ज्याचा अनुभव घेतला होता त्या गोष्टीस उद्देशून तो म्हणाला, 'गड्या कपिंजला, काय सांगूं! सोनचांफ्याच्या कळ्या दूर फेंकून दिल्या तरी हरकत नाहीं, हळदीची तर मुळीं गरजच नाहीं, तावून स्वच्छ केलेल्या बावनकशी सोन्याचीदेखील तिच्या अंगकांतीपुढें कांहींच गणना नाहीं. मग ताज्या केशराच्या फुलांची मातब्बरी काय असणार? जणुंकाय माणकांचा हारच, अशी तिची ती लाल असून मोठी पाणीदार व मान वांकडी केल्यामुळें तिरकस झालेली दृष्टी, प्रथम माझ्या कानाजवळ येऊन एकदम मनांत प्रविष्ट झाली!'

हें ऐकून कपिंजल राजाचें मन दुसऱ्या कोणत्यातरी विषयाकडे लावून त्याला अमळ तिचा (कर्पूरमंजरीचा) विसर पाडावा म्हणून म्हणाला, 'मित्रा, तूं वाईलवेड्यासारखा सारादिवस कांहीं तरी कुरकुरत असतोस हें काय?'

राजा म्हणला, 'तसें नव्हे रे. गेल्या रात्रीं मला जें स्वप्न पडलें, त्याचें मी वर्णन करीत आहें.'

हें ऐकून कपिंजल म्हणाला, 'कसलें रे तुला स्वप्न पडलें? तें सांग पाहूं.'

राजा ह्मणाला, 'अरे, कालच्या रात्रीं पुष्कळवेळ मला झोंप लागली नव्हती. नंतर पहाटेच्यावेळीं झोंप लागली! तों त्यांत एक स्वप्न पडलें. एक कमलमुखी सुंदरी माझ्या समोर खेळत खेळत माझ्या पलंगावर आली. तिच्या हातांत एक कमल होतें. त्यानें मला मारावें अशी तिची इच्छा होती, म्हणून ती इतकी माझ्याजवळ आली कीं, आह्मां उभयतांत कायतें एक हाताचें अंतर राहिलें होतें. ही तिची इच्छा पाहून मीही आळस केला नाहीं. मी झटकन् पुढें सरून तिचा पदर धरला; आणि आतां तिला पुढें ओढणार इतक्यांत हिसका मारून तिनें पदर सोडवून घेतला आणि तत्काल कोठें नाहींशी झाली! नंतर मी तिला शोधण्याचा प्रयत्न करीत आहें, इतक्यांत माझेही डोळे उघडले.'

राजानें आपलें स्वप्न सांगितलें तें त्याचें अगदीं खरें होतें; पण स्वारीचें लक्ष **कर्पूरमंजरी**कडे लागलें असल्यामुळें, तीच स्वप्नांत दिसली असावी असें समजून घटकाभर विनोद करण्याकरितां **कपिंजल** म्हणाला, 'महाराजा, मलाही एक स्वप्न पडलें, आणि तें फारच मोठें चमत्कारिक होतें.'

वस्तुतः **कपिंजलाला** मुळींच स्वप्न पडलें नसून तें

त्याचें ढोंग होतें. तथापि राजाला घटकाभर करमणूक करायचीच होती. म्हणून तो म्हणाला, 'तरमग तुला कसें काय स्वप्न पडलें तें सांग पाहूं.'

हें ऐकून **कपिंजल** म्हणाला, 'ज़रा थांब; मी त्याची आठवण करतों,' असें सांगून त्यानें तितक्यांतल्या तितक्यांत एक गोष्ट रचली. आणि राजाला म्हणाला, 'हँ, मला सर्व आठवलें. आतां लक्षपूर्वक ऐक. गेल्या रात्रीं सुमारें मध्यान्हीच्या नंतर मला हें स्वप्न पडलें. प्रथम मी असें पाहिलें कीं, आमची स्वारी **भागीरथी**च्या प्रवाहांत सुस्त पोंरत पडली आहे! नंतर **महादेवा**च्या मस्तकावर क्रीडा करणाऱ्या त्या **गंगे**च्या प्रवाहांत पडल्यामुळें उदकाच्या वेगानें व तींतल्या वाटोळ्या घोंड्यांनीं, इकडून तिकडे व तिकडून इकडे लोळतांनां माझें अंग घांसून घांसून स्वच्छ झालें!'

हें ऐकून राजा म्हणाला, 'बरें, मग पुढें काय झालें?'

**कपिंजल** म्हणाला, 'पुढें का? पुढें काय झालें तें काय विचारतोस. शरदृतूंत वृष्टि करणाऱ्या मेघानें नंतर मला यथेच्छ पिऊन फस्त केलें!'

हें ऐकून राजाला फारच आश्चर्य वाटलें. शरदृतूंत मेघ असण्याचा संभव कमी. बरें कदाचित् असला तरी

तो याला पिऊन कसा टाकणार? राजाला असें जरी वाटलें तरी तो कौतुकानें म्हणाला, 'हा मोठा चमत्कार बुवा' 'पण पुढें काय झालें तें सारें ऐकलें पाहिजे!'

**कपिंजल** म्हणाला, 'नंतर जेव्हां भगवान् **सूर्य** स्वातीनक्षत्रावर आला, तेव्हां **ताम्रपर्णी**नदी जेथें समुद्राला मिळाली आहे, तेथें तो महामेघ आला. मलाही त्यावेळीं असें वाटलें कीं, मेघाच्या गर्भांत असलेलो मी खुशाल त्याच्याबरोबर चाललों आहे!

नंतर तो मेघ तेथें मोठमोठ्या मुसळधारांनीं वृष्टि करूं लागला. तेव्हां मीही त्याच्या उदकधारांबरोबर खालीं पडलों. खालीं, ज्यांच्या पोटांत मोत्यें उत्पन्न होतात, त्या शिंपा पोट उकलून बसल्याच होत्या. मी उदकधारांबरोबर खालीं पडलों तो त्या शिंपांच्या पोटांत गेलों! लागलीच त्या शिंपा मिटल्या. तेव्हां मी त्यांच्या पोटांत दहा चव वजनाचीं भलीं मोठीं टपोरीं मोत्यें होऊन राहिलों!'

हें ऐकून राजाला मोठें नवल वाटलें. तो म्हणाला, 'अरे, खरोखरच तर मग तूं मोठ्या विचित्र स्थितींत पडला होतास म्हणायचें. पण पुढें काय झालें?'

**कपिंजल** म्हणाला, 'आकाशांतून मेघोदकाबरोबर

'मी खालीं पडलों; तो एक नाहीं, दोन नाहीं, चौसष्ट शिंपांत पडलों होतों! पण चमत्कार असा कीं, त्या सर्व शिंपा मिळून माझ्या सर्व शरीराचा आकार एक झाला नाहीं. प्रत्येक गरगरीत असून मोठीं पाणीदार अशा चौसष्ट मोत्यांचा आकार मला प्राप्त झाला! त्या शिंपांच्या पोटांत असल्यामुळें मी आपल्याला एक उंच मोतीं समजत होतों.'

राजा म्हणाला, 'यांत काय संशय! खरोखर तूं मोतींच आहेस. हूँ, चालूं दे.'

'नंतर मोत्यें पक्कीं होण्याचे दिवस आले. तेव्हां पाणबुड्यांनी आंत बुड्या मारमारून त्या साऱ्या शिंपा वर काढल्या; आणि त्यांचीं पोटें उकलून आंतलीं मोत्यें बाहेर काढलीं. मी त्यांत चौसष्ट मोत्यांचा आकार धारण केला होता. म्हणजे एकट्या माझीं चौसष्ट मोत्यें झालीं होतीं. आधींच तीं मोत्यें म्हणजे उत्तम; आणि त्यांतून माझ्यासारख्यांची! मग काय विचारतोस? एका मोठ्या सावकारानें एकेक मोत्याला लक्षलक्ष रुपये देऊन तीं चौसष्टही मोत्यें तेथल्यातेथेंच खरेदी केलीं.'

राजाला याचा फारच चमत्कार वाटला. तो म्हणाला, 'गड्या तुझें स्वप्न विचित्र आहे खरें, बरें मग नंतर काय झालें तें सांग.'

**कपिंजल** म्हणाला, 'येथपर्यंत' सारें यथास्थित झालें, मला हविलपर्यंत कांहीं वेदना झाली नव्हती. पण यापुढें मात्र थोडावेळ दुःख सहन करावें लागलें. त्या गांडलेंक सावकारानें जीं मोत्यें खरेदी केलीं, तीं तशींच ठेवलीं नाहींत. लागलीच त्यानें कारागिराला आणून त्यांला वेजें पाडलीं. त्यावेळीं मात्र मला थोडेंच दुःख सहन करावें लागलें.'

हें ऐकून राजा कळवळून ह्मणाला, 'अरेरे! फार वाईट झालें. बिचाऱ्या ब्राह्मणाला वेदना सहन करावी लागली!'

**कपिंजल** म्हणाला, 'छेः छेः! वेजें पाडतेवेळीं मला दुःख भोगावें लागलें, याविषयीं तूं खेद करूं नकोस. त्यावेळीं जराशी वेदना सहन केली, पण त्यापासून पुढें काय लाट मिळाली ती ऐकलीस म्हणजे तुला माझा धन्य वाटेल! किंवा तूं मला मोठा दैववान्ली तरी म्हणशील. त्या सावकारानें मोत्यांला वेजें पाडलीं आणि नंतर दहीं दहा रत्नांच्या वजनाचीं तीं मोठीं टपोरीं मात्यें, हार करण्याला योग्य आहेत असें पाहून त्यानें सोन्याच्या तारेंत ओंवून त्यांचा एक उत्तम सर बनविला. तेव्हां त्या सराचें मोल इतकें चढलें कीं कोट रुपये किंमतीचा तो दागिना झाला.

मोत्यें विकत घेणारा तो सागरदत्तशेट मोठा पैसेवाला होता. तरी बोलून चालून तो व्यापारी असल्यामुळे, त्यानें तो सर घरांत न ठेवतां विकावयास काढला. ज्या ठिकाणीं तो होता तेथें त्याला कोणी मोठें गिऱ्हाईक मिळत नाहीं असें पाहून, तो पांचाळदेशांचा अधिपति वज्रायुधराजा यांच्या कान्यकुब्ज नावाच्या राजधानींत गेला. तेथें राजाची भेट घेऊन त्यानें तो सर एक कोट रुपयांस त्याला विकला.'

हें ऐकून राजा हंसून म्हणाला, 'वाहवा! एकून तूं त्या राजाकडे गेलास तर. अरे, शाबास रे गब्रू! तेथें काय झालें?'

कपिंजल म्हणाला, 'मग काय विचारतोस? माझी मोठीच चैन उडाली. वज्रायुधराजानें तो मोत्यांचा सर प्रथम आपल्या गळ्यांत घालावा असा विचार केला होता. पण त्या मोत्यांचा मोठेपणा व आपल्या छातीच्या उरःस्थलाचा भरगच्चपणा अवलोकन करून, त्यानें तो सर आपल्या प्रियेल्या गळ्यांत घालावयास दिला. उघडच आहे. रसिक लोकांला आपल्यापेक्षां आपल्या आवडत्या मनुष्याला शोभवावें अशी फार इच्छा असते.

याप्रमाणें त्या वज्रायुध राजाच्या राणीच्या गळ्यात

मी वास्तव्य करीत असतां, एके दिवशीं त्या दोघां नवराबायकोंचें भांडण झालें. तेव्हां रागाच्या आवेशांत राणीनें तो आपल्या गळ्यांतला मोत्यांचा सर दूर भिरकाऊन दिला, तो सभागृच्या एका भिंतीवर जाऊन आपटला. त्या प्रहारानें हाडें सैल झाल्यामुळें मी तत्काल जागा झालों, आणि येथें माझें स्वप्नही आटपलें!'

**कपिंजलानें** याप्रमाणें सांगितलेलें स्वप्न ऐकून राजा हंसत हंसत म्हणाला, 'अरे लबाडा, आतां मी तुझा हेतु पुरता समजलों. मी तुला आपलें खरोखरीचें स्वप्न सांगितलें असून त्यावर तान करून दाखविण्याकरितां मुद्दाम कांहीं तरी रचून तूं हें सांगितलेंस. कारण तसें नसतें तर तूं मूळपदावर आला असतास; पण तें कांहीं झालें नाहीं. पण इतकें कशाला? आजपर्यंत मला कित्येकवेळां स्वप्नें पडलीं आहेत, व इतरांलाही पडलीं असतील. पण त्यांत इतकें लांबचलांब व अनेक रूपांतरें झाल्याचें स्वप्न माझ्या कधीं पाहण्यांत किंवा ऐकण्यांत आलें नाहीं.'

हें ऐकून **कपिंजल** हंसून म्हणाला, 'अहो महाराज, दुर्दैवानें कोणताही मनोरथ पूर्ण न झाला तरी मानसिक कल्पना करून त्याची पूर्णता करून घेण्यास काय हरकत आहे. राज्यासनावरून भ्रष्ट झालेला राजा, भुकेलेला

ब्राम्हण, विषयसेवनाची इच्छा करणारा थालरंडा, आणि वियुक्त झालेला कामी, हे मनांत मांडे खाऊन आपला हेतु पूर्णकरून घेत असतात. बरें पण प्रियमित्रा, मी तुला असा प्रश्न करतों कीं, हा प्रभाव कोणाचा आहे? म्हणजे तुला जीं अशीं स्वप्नें पडतात व चित्ताची अस्वस्थता होते याचें कारण काय?'

राजा म्हणाला, 'प्रेमावांचून दुसरें कोणतें कारण असणार?'

कपिंजल म्हणाला, 'अरे, पण राणीवर तुझें वळकट प्रेम असूनै **कर्पूरमंजरी**कडे डोळे ताठ लावून तिच्या सौंदर्याचें प्राशन करीत असतोस याचें कारण काय बरें? काय त्या **कर्पूरमंजरी**पेक्षां राणी फार वाईट आहे?

राजा म्हणाला, 'छे! छे! असें म्हणूं नको कीं, **कर्पूरमंजरी** राणीहून फार सुंदर आहे म्हणून माझें मन तिच्यावर आसक्त झालें आहे! कोणत्याही मनुष्याचें कोणावरही स्वाभाविक प्रेम नसतें. प्रेम जडण्याला केवळ रूपच कारण असतें असें नाहीं. प्रेम करणारे लोक आपण जिच्यावर प्रेम करतों तिच्याच सौंदर्याचें वर्णन करीत असतात. पण तें केवळ निंदकाच्या तोंडांत मारण्याकरतांच असतें. बाकी प्रेम जडण्याचीं जीं कांहीं कारणें असतात तीं निराळींच.'

कपिंजल म्हणाला, 'यावरून मला दुसरी एक शंका आली. 'प्रेम प्रेम' असें जें सर्वलोक म्हणतात तें आहे तरी काय?'

राजा म्हणाला, 'अरे, एकमेकांचें चित्त अगदीं मिळून गेलें आहे, अशा स्त्रीपुरुषांचा कामदेवाच्या आज्ञेनें परस्परांवर जो जीव लागलेला असतो त्यालाच रसिक-पुरुष प्रेम अथवा प्रणयग्रंथि असें म्हणतात.'

कपिंजल म्हणाला, 'मित्रा, येवढ्यानें माझें समाधान होत नाही. एकांत एक अशा अनेक शंका उत्पन्न होतात. तूं प्रणयग्रंथि सांगितलास तो कसा असतो तें उघड सांग?'

राजा म्हणाला, 'सांगतों ऐक. ज्यांत कोणत्याही प्रकारच्या विकल्पाची घटना नसते असें उभयतांचें अंतः-करण एकमेकांविषयीं अगदीं स्वच्छ होतें, व परस्परांच्या मनांत परस्परांविषयीं एकसारखी शृंगाररसाची वृद्धि होत असते, त्यालाच प्रणयग्रंथि म्हणतात.'

कपिंजल म्हणाला, 'पण यावरून परस्परांला तो प्रणयग्रंथी समजून येतो कसा?'

राजा म्हणाला, 'अरे, तो समजण्याचीं अनेक लक्षणें आहेत. एकमेकांवर प्रेमभरितदृष्टीचा प्रसार होणें, व

अनेकप्रकारच्या चाळ्यांनी परस्परांविषयीं अनुकूलता दाखविणें इत्यादिकांनीं दोघांलाही एकमेकांच्या अंतः-करणाची स्थिति समजून येते.'

हें ऐकून अवज्ञा दाखविल्यासारखें करून **कपिंजल** म्हणाला, 'हात्तेच्या ! यांत काय विशेष आहे? हें तर माझ्या सारख्या पाषाणालादेखील समजून येतें. माझी म्हैस माझ्याशीं अशीच चाळे करीत असते; व मीही उलट तसेच करतों, आणि त्यायोगानें दोघांला परस्परांचीं अंतः-करणेंही समजून येतात. तें समजायला म्हणजे रसिकच पाहिजे असें नाहीं. बरें पण तें असो एकीकडे. जर मनांतलें प्रेमच अनुराग उत्पन्न करितें; तर भूषणांचें वगैरे अवडंबर करतात याचें कारण काय?'

राजा म्हणाला, 'वस्तुतः त्यांत कांहीं अर्थ नाहीं. तो अरसिकांला भुलवायाचा सर्व व्यापार आहे; दुसरें कांहीं नाहीं. उत्तम गायन किंवा नृत्य अथवा वारुणीनें डोळ्यां-वर सुस्ती आलेली असो, सुवासिक धूप असो अगर चंदनाचा लेप असो, केशर कस्तूरी इत्यादि पदार्थ अंगाला लावलेले असोत, त्या सर्व साधनांचा वस्तुतः कांहीं उपयोग नाहीं. मी तुला खरें सांगतों कीं: केवळ आपल्या आवडीवांचून या जगांत प्रेम उत्पन्न करणारें

दुसरें काहींएक साधन नाहीं. असें पहा कीं; एका मोठ्या सार्वभौम राजाची स्त्री आणि यःकश्चित् एका कुणबटाची स्त्री, या दोघींच्या बाह्य डौलांत जमीनअस्मानाचें अंतर असेल. पण सार्वभौमराजाची आणि त्या कुणबटाची जी आपआपल्या बायकोवर प्रीती असेल तींत काहीं-मात्रही फरक नाहीं! नखशिखांत हिऱ्यामाणकांनीं खचलेली ती पट्टराणी राजाला जितकी प्रिय वाटत असते, तितकीच, किंवा त्याहूनही अधिक कुणबटालाही आपली घरकारीण आवडत असते. तात्पर्य—उत्तम रूप, उंची वस्त्रें, बहुमोल दागिनें, नृत्यगायनादिकलाप्रवीणत्व; इत्यादि गुण हे प्रेमाला मुळींच कारण नाहींत. तर तें अगदीं निरपेक्ष असून कांहींतरी विलक्षण कारणानें जडलेलें असतें!'

**कपिंजल** म्हणाला, 'बरोबर. तूं सांगितलेंस तसेंच आहे खरें, बरें पण मला दुसरें एक विचारायाचें आहे तें सांग. जे मनुष्य लहानपणीं चांगले दिसत नाहींत तेच तारुण्यांत विशेष सुंदर दिसतात, व त्यांचें सौंदर्य वाटतें, याचें कारण काय?'

यावर राजा ह्मणाला, 'खरें म्हणशील तर सृष्टि करणारा एकच आहे असें लोक समजतात; पण मला-तर सृष्टिकर्ते दोघे आहेत असें वाटतें. ते कोणते ह्मणशील

तर जो प्रथम देह उत्पन्न करतो तो एक सृष्टिकर्ता आहेच; पण जो तारुण्य देतो तो एक दुसरा जन्मदाताच आहे. एक प्रथम शरीर उत्पन्न करतो, आणि दुसरा, प्रत्येक अवयवांत सौंदर्य व्यक्त करून दाखवितो. वस्तुतः मदनाचीं दुसरीं पुष्कळ आयुधें असतील तर असोत; पण तारुण्य हें त्यांत मुख्य असलें पाहिजे. मला तर असें वाटतें कीं लोकांचें मन हरण करणारा हा तारुण्यरूपी एक मंत्रच आहे. व तो मोठा जबरदस्त असून हटकून कार्यसिद्धि करणारा आहे!'

याप्रमाणें कपिंजलासह अनेक विलासिक गोष्टी करतां करतां स्नानाची वेळ झाली. तेव्हां भाटांनीं सूचना केल्यावरून राजा मित्रासह स्नान संध्या करायला गेला: भोजन वगैरे आटोपल्यावर सभेंत जाऊन राजकीय कामें करावयाचीं होतीं, तीं त्याणें केलीं. सायंकाल होतांच कचेरी बरखास्त करून तो बाहेर निघाला; तों त्याचा लीलासचिव कपिंजल त्याला येऊन भेटला. विचक्षणेनें केलेली मसलत त्याला कळलीच होती. म्हणून कपिंजलासह इकडच्या तिकडच्या गोष्टी करीत करीत तो त्या मरकतपुंजमहालाच्या आसपास संचार करीत होता

विचक्षणेनें कुरंगिकानांवाची दुसरी एक दासी आपल्या मसलतींत घेऊन, आजच्या दिवशीं सायंकालीं राजाची कर्पूरमंजरीशीं भेट करून देण्याचा विचार केला होता. विचक्षणा आपल्या हिताकरतां एकसारखी झटत आहे; असें पाहून कर्पूरमंजरी तिच्यावर विश्वास ठेऊन तिच्या अर्ध्या वचनांत वागत होती. विचक्षणेनें कशीकाय तजवीज केली आहे, तें सांगितल्यावरून कर्पूरमंजरी तत्काल तिच्या ह्मणण्याला अनुकूल झाली. तेव्हां पूर्वी ज्याठिकाणीं उभयतांचें दर्शन झालें होतें, त्याच मरकतपुंजमहालांत सायंकालीं कर्पूरमंजरी येऊन बसली. विचक्षणा या कार्याची प्रवर्तक होती. तरी आपण अगदीं निराळें व्हावें, असा विचार करून ती कर्पूरमंजरीला त्या महालांत पोंचवून दुसरीकडे निघून गेली. व कुरंगिकेला तिणें तिच्या जवळ बसविली.

कर्पूरमंजरी कामानें व्यथित झाली होती. तिच्या अंगाचा विशेष दाह होऊं लागला ह्मणून कुरंगिका तिला शीतल उपचार करूं लागली; पण त्यापासून तिला कांहीं सुख झालें नाहीं.

कर्पूरमंजरी कुरंगिकेला ह्मणाली, 'गडे कुरंगिके, तूं हे शीतल उपचार उगीच कां करतेस? हे तुझे श्रम

अगदीं व्यर्थ आहेत; त्यां पासून मला कांहींच सुख होत नाहीं. ह्या तुझ्या शीतल उपचारांनीं मी, जशी कमलीनी उन्हानें व्याकुळ होते तशी, अधिकच व्याकुळ होत आहें: हीं कमलांचीं पानें मला विषासारखीं झालीं आहेत. हा **चंद्रकांत**मण्यांचा हार शीतल असूनही मला सर्पासारखा भासतो. वाळयाच्या विंझण्याचा वारा अग्नीच्या ज्वालेसारखा वाटतो. तूं हें शीतल उदक माझ्या अंगावर शिंपडते आहेस, तें मला आधणाच्या पाण्यापेक्षांही फार कढत वाटतें. अंगाला लावलेला चंदनाचा लेपही काहिली शांत करीत नाहीं! तेव्हां हे उपचार करून तूं व्यर्थ आपल्याला कां श्रम करून घेतेस?'

राजा **कपिंजला**सहवर्तमान तेथें आसपास संचार करीत होता, हें वर सांगितलेंच आहे. **कर्पूरमंजरी**चें वरील भाषण त्या दोघांसही ऐकूं आलें. तें ऐकून **कपिंजल** राजाला म्हणाला, 'प्रियमित्रा, संकेताप्रमाणें तुझी प्रिया ( **कर्पूरमंजरी** ) येथें वाट पाहत बसली आहे.' व तिणें आतां काय म्हटलें तें ऐकलेंस ना? हे तिचे उद्गार तुझ्याच उद्देशानें निघाले आहेत, हें मी सांगावयास नकोच.' कामिपुरुषाला हे उद्गार किति प्रिय वाटतात याचें वर्णन करतां येत नाहीं ह्या उद्गारांनीं अमृतानें

तूं आपले कान भरून घे. अजूनही तिची कां उपेक्षा करतोस? कडक उन्हानें कमलिनी व्याकुळ व्हावी, किंवा उत्तम पाणीदार मोत्यांची माळा अग्नीच्या संतापानें फुटूं लागावी, त्याप्रमाणें सांप्रत हिची अवस्था झाली आहे. आज सकाळीं तूं जें स्वप्न सांगितलेंस तें खरें होण्याची वेळ आली आहे. तर आतां लवकर ये आपण आंत जाऊंया. आणि तूं आपले मनोरथ पूर्ण करून घे."

**कपिंजला**चें हें सांगणें राजाला किती गोड वाटलें असेल हें सांगावयास नकोच. तो त्याच्यासह लवकर लवकर त्या **मरकतपुंज**महालांत जाण्याविषयीं प्रवृत्त होऊन दरवाज्यांत आला. तो बाहेरून कुलूप लावलेलें दृष्टीस पडलें. तेव्हां अंमळ खिन्न होऊन दिंडी तरी उघडी असेल म्हणून पाहूं लागला; पण जिकडे तिकडे कुलपें लावून दारें बंद केलेलीं होतीं. तेव्हां आतां काय करावें याचा त्याला मोठा विचार पडला.

वाचक येथें कदाचित् गोंधळतील दरवाऱ्याला कुलपें कशीं लागलीं याचें त्यांना मोठें गूढ पडेल; पण आम्हांस त्यांना तसें गोंधळांत ठेवावयाचें नाहीं. पूर्वी सांगितल्याप्रमाणें **विचक्षणा कर्पूरमंजरी**ला **कुरंगि-के**सह तेथें बसवून निघून गेली. तिनें आपल्याकडून, ही

गोष्ट राणीला न समजण्याविषयीं मोठी खबरदारी ठेवली होती. पण त्या बागेची माळीण **कुमुदिका** सहज त्यावेळीं तेथें आली असून, **विचक्षणेनें** ही तजवीज केली आहे असें तिला समजलें नाहीं तरी, कांहींतरी संकेत झाला आहे हें पुरतें तिच्या लक्षांत आलें. म्हणून ती तेथल्यातेथें आड राहिली व **कुरंगिकेचा** आणि **कर्पूरमंजरीचा** संवाद तिणें एकला. आणि तत्काळ तें वर्तमान आपल्या धनिणीला कळवावें ह्मणून ती, राणी **विभ्रमलेखा** इच्याकडे गेली! तिणें तिला ती सर्व हकीकत कळविली. राणी यावेळीं कांहीं विशेष कामांत होती म्हणून तिनें **कुमुदिकेला** तत्काल दाराला कुलुप लावण्यास सांगितलें व 'आपण पाठोपाठ येतें. ही आलेंच तूं हुषार ऐस,' असें सांगून तिणें तिला परत पाठविलें.

राणीच्या आज्ञेप्रमाणें **कुमुदिकेनें** जिकडेतिकडे कुलपें लावून कडेकोट बंदोबस्त केला. **कर्पूरमंजरी** व **कुरंगिका** त्या महालांत दडून बसल्या होत्या. तरी **कुमुदिकेनें** बाहेरच्याबाहेर एकाएकीं दारें लावून कुलपें ठोकलीं यामुळें त्यांचा कांहीं इलाज चालला नाहीं. व हें एक मोठें संकट प्राप्त झाल्यामुळें त्यांना दुसरीच काळजी उत्पन्न झाली.

राजा **कपिंजला**सह महालांत जाण्याचा प्रयत्न करीत होता; परंतु त्याला कांहीं सवड मिळाली नाहीं. शेवटीं **कपिंजला**नें तजवीज काढून एक खिडकी उघडी होती तींतून आंत शिरण्याचा विचार केला व त्याप्रमाणें दोघेही खिडकीच्या वाटेनें महालांत गेले.

राजा एकाएकीं वरून खालीं उतरला हें पाहून **कर्पूरमंजरी** फार दचकली व मनांत म्हणाली, आकाशांतून हा अकस्मात् पौर्णिमेचा पूर्णचंद्र खालीं उतरला? किंवा प्रसन्न झालेल्या **शंकरा**नें ज्याला पुन्हां देह दिला आहे असा प्रत्यक्ष **मदन**च उतरला कीं काय? हा माझ्या डोळ्यांला फार चांगला वाटतो; पण ह्याला पाहून माझें हृदय तळमळतें. **कुरंगिके**ला म्हणाली, 'गडे **कुरंगिके**, मलातर बाई हें कांहीं गौडबंगाल वाटतें.'

बोलण्याला हीच उत्तम संधी आहे असें पाहून **कपिंजल** तिला म्हणाला, 'अहो बाई, खरोखरच हें इंद्रजाल झालें आहे.' असें बोलून राजाला हातीं धरून त्यानें पुढें ओढलें. तें पाहून **कर्पूरमंजरी**नें लाजून मानखालीं घातली.

**कर्पूरमंजरी**—लज्जा, भीति, भय इत्यादि विकारांनीं घाबरी झाली असल्यामुळें राजा अगदीं जवळ आला तरी उठून उभें राहण्याचें तिच्या लक्षांत आलें नाहीं.

**कुरंगिका** म्हणाली, 'सखे **कर्पूरमंजरी**, उत्थापन देऊन महाराजांचा सत्कार कर.' हें ऐकून **कर्पूरमंजरी** उठूं लागली. तेव्हां राजा तिचा हात धरून म्हणाला, 'नको नको, उठण्याचे श्रम घेऊं नको. आधींच अत्यंत बारीक असलेली तुझी कंबर उरःस्थलाच्या भारानें वांकली आहे. तिला उठण्यांच्या श्रमानें उगाच मोडूं नको. तुझ्या ह्या प्रिय दर्शनानेंच सर्व आदरउपचार आम्हाला भरून पावले. ज्या माझ्या नेत्रांनीं हें तुझें सुंदर शरीर पाहिलें, त्यांला मी फार धन्य मानतों! व ते केवळ दर्शन-लाभानेंच संतुष्ट आहेत. त्यांला आदर नको आहे.'

**कर्पूरमंजरी** फार वेळ त्या कोंडलेल्या हवेंत राहिली होती यामुळें तिच्या अंगाला घाम सुटला होता. तशांतून काहिली होत होती; यामुळें ती फारच विकळ झाली होती. तिच्या अंगांतून चरचर घामाच्या धारा वाहत होत्या. त्या पाहून **कपिंजल** म्हणाला, 'अरे! ही फारच थकली आहे. हिला मी आपल्या अंगवस्त्रानें वारा घालतो'

ही वेळ सायंकालची होती. व दारें बंद केलीं असल्यामुळें सर्वत्र अंधकार पडला होता. तरी दिवाबत्ती लावण्याची नेहमीप्रमाणें तेथें सर्व तयारी होतीच. अंधारांत भय वाटूं लागलें ह्मणून **कुरंगिकेनें** एकीकडे दिवा लावून

ठेवला होता. व त्याच्या जवळच दोघीही बसल्या होत्या. **कपिंजल** अंगवस्त्रानें वारा घालूं लागला, तों वाऱ्यानें एकाएकीं दिवा गेला. तेव्हां तो हंसून ह्मणाला, 'वाहवा! वाहवा! आतां खूप बहार झाली म्हणायची; सांप्रत हा अंधारांतला नाच झाला आहे!' राजाला ह्मणाला, 'मित्रा, आतां आपण युक्तिप्रयुक्ति करून बाहेर गेलें पाहिजे आणि दरवाजे तर बंद आहेत. येथें जिकडेतिकडे अंधार पडला आहे तेव्हां आतां करायचें काय? आपण ह्या भुयाराच्या द्वारानें **प्रमदोद्यानां**त जाऊंया ह्मणजे झालें.'

**कपिंजल** याप्रमाणें भाषण करीत आहे, इतक्यांत राणी **विभ्रमलेखा कुमुदिके**सह तेथें प्राप्त झाली. 'सर्व मंडळी आयतीच त्या महालांत सांपडली आहे; आतां प्रत्येकाची खूप खरडपट्टी काढतें,' असें ह्मणून, तिनें **कुमुदिके**ला दाराचें कुलूप काढावयास सांगितलें. कुलूप काढतेवेळीं दाराचा आवाज झाला तों आंतल्या मंडळीला ऐकूं आला. चोराला श्रवणशक्ति मोठी तीव्र असते. त्याप्रमाणें राजाही यावेळीं चोरच झाला होता. त्या महालांत सुरंग, अर्थात् चोरवाट होती. त्या वाटेनें सर्व मंडळी तत्काल निघून गेली.

इकडे राणी मोठ्या आवेशानें महालांत येऊन पाहते तों तेथें कोणीही दृष्टीस पडलें नाहीं. तेव्हां खजिल होऊन परत जनानखान्यांत गेली. तरी तिला **कर्पूरमंजरी**चो राजाशीं भेट झाली, ही गोष्ट पक्केपणीं समजून आली. व युक्तिप्रयुक्तीनें तिला चांगल्या प्रतिबंधांत ठेवावी असा राणीनें विचार केला.

वस्तुतः ही गोष्ट किती लाजिरवाणी होती. मनुष्याला आपल्या हितापुढें दुसरें कांहींच दिसत नाहीं. **कर्पूर-मंजरी** ही राणीची मावस बहीण. **भैरवानंदानें** मंत्रसामर्थ्यानें तिला आणल्यामुळें सहज तिची तिच्याशीं गांठ पडली. व जिणें **भैरवानंदाच्या** हातींपायीं पडून तिला आग्रहपूर्वक ठेवून घेतली, व जिला **कर्पूरमंजरी** काय खाईल, कोठें बसेल, कोठें उठेल असें झालें होतें! तीच राणी सांप्रत नातेंगोतें चटसारें झुगारून देऊन त्या आपल्या बहिणीला बंदिशाळेंत घाल-ण्यास तयार झाली, हा केवढा मोठा चमत्कार! पण मानवी स्वभावाप्रमाणें पाहिलें तर चमत्कार मुळींच नाहीं. जोतो मनुष्य आपल्या हिताकडे पहात असतो. प्रत्येक स्त्रियेला आपला पति आपल्या हुकुमांत असावा, त्याणें आप-ल्यावांचून दुसरीकडे डोळे उघडून पाहूंदेखील नये, असें

वाटत न असतें. ज्या राजा **चंडपाला**विषयीं तिचा असा ग्रह होता त्यालाच **कर्पूरमंजरी**ची आसक्ति झाली व त्याचेंही मन तिच्याकडे लागलें, ही गोष्ट राणीला कशी सहन होईल! व याबद्दल तिणें स्वहिताला विरोध आणणाऱ्या आपल्या बहिणीवर असा राग केला तरी त्यांत फारसें आश्चर्य तें काय? असो.

इकडे **कर्पूरमंजरी, कुरंगिका, कपिंजल** व **राजा** हीं चौघेंही त्या सुरंगाच्या द्वारानें जाऊं लागलीं. बोलून चालून भुयारच तें. त्यांत अंधार असायचाच. राजाला व **कपिंजलाला** त्याची माहिती होती. पण **कर्पूर-मंजरीला** कोठून असणार? ती इकडेतिकडे ठेंचलूं लागली. तेव्हां राजानें तिचा हात धरून हळू हळू तिला त्या मार्गानें नेलें.

इतक्यांत **चंद्राचा** उदय झाला. राजा **कर्पूरमंजरी**-सह **प्रमदोद्यानांत** पोहोंचला, तों चंद्रोदयाची सूचना करणारे भाट ह्मणाले, 'हा **चंद्राचा** उदय महाराज सरकाराला सुखकर होवो! सारा भूगोल अंधकारानें मळकट झाला असतां, जणुंकाय त्याला स्वच्छ करण्याकरतां पूर्वदिशेनें आपल्या मुखावाटे ही चंद्रकांति सोडली! सांप्रत हा भगवान् **चंद्रमा** हळूहळू संपूर्ण उदय पावत आहे.'

याप्रमाणें **कनकचंड** नामक भाटानें वर्णन केलें; तें ऐकून **कपिंजल** राजाला ह्मणाला, 'मित्रा, ह्या भाटानें तर चंद्रोदयाची सूचना केली. त्यानें या समयाचें फार चांगलें वर्णन केलें, तेव्हां मीही वर्णन करतों.'

राजा ह्मणाला, 'गड्या, तूं तर महाकवि आहेस! तूं पाहिजे तें वर्णन करूं शकशील. आम्ही तुझेंही वर्णन ऐकण्यास तयार आहों.'

**कपिंजल** ह्मणाला, 'ऐक तर मी वर्णन करतों तें. दिशारूप वधूच्या डोक्यावरचा तुरा, आकाशरूप सरोवरांतला हंस, आणि क्रीडेचा कंद असा हा चंद्र प्रकट झाला आहे.'

हें ऐकून **कुरंगिका**ही वर्णन करूं लागली. ती **चंद्रा**ला उद्देशून ह्मणाली, 'सशाला धारण केल्यामुळें गर्विष्ठ झालेला व मानवी स्त्रियांचा मान भरडून टाकणारा विरट, नवीन प्रफुल्लित झालेलें चांफ्याचें फूल ज्याचें धनुष्य आहे अशा **मदनाचा** मित्र, असा हा **चंद्र** उदय पावला!'

**कर्पूरमंजरी**ला ह्मणाली, 'गडे, तूं केलेलें **चंद्र**वर्णन मला सांगितलें होतेंस तें मी ध्यानांत धरलें आहे. तें आतां महाराजांच्या पुढें म्हणून दाखवितें' 'असें म्हणून **कुरंगिके**नें पुढील कविता म्हटली.

गौरत्वर्णगजदन्तसदृशशीशिमण्डलिं भासत आहे ।
लांछनमृग हा क्रीडाकोकिलछाव्यापरि तूं पाहे ॥ १ ॥

**कर्पूरमंजरीची** कविता ऐकून राजा खुष होऊन म्हणाला, 'वाहवा! हिच्या कवितेंत तर नवीनच अर्थ आहे. शब्दयोजना फारच उत्तम असून रचना करण्याची शैली वर्णनीय आहे. आणि रस तर ओतप्रोत भरला आहे.'

याप्रमाणें **कर्पूरमंजरीच्या** कवितेचें वर्णन करून राजा तिला उद्देशून म्हणाला, 'सुंदरि, तुझें तेजस्वी मुख हाच पौर्णिमेचा चंद्रमा, त्याला पाहून लोकांना कदाचित् भ्रम होईल म्हणूनच कीं काय, आकाशांतल्या खरोखरीच्या **चंद्रानें** मृगलांछनाच्या मिषानें जणुं आपल्या गालाला काजळाचीं बोटें लावून, आपल्या रूपाची निराळी खूणच केली आहे असें वाटतें!'

राणी **विभ्रमलेखा**, **मरकतपुंजमहालांत कर्पूरमंजरी** भेटली नाहीं तेव्हां खिन्न होऊन जनानखान्यांत गेली, असें वर सांगितलेंच आहे. ती आपल्या महालास जाऊन पोहोंचते आहे इतक्यांत, राजा **कर्पूरमंजरीसह** वर्तमान **प्रमदोद्यानांत** आहे, असें वर्तमान लागलें. तेव्हां लगेच ती तिकडे निघाली. आपल्या

मतें ती अगदीं गुप्तरीतीने गेली होती तरी तिच्या बरोबर दासी वगैरे जो परिवार होता त्याची बरीच गडबड झाली, व ती राजाला, ती तेथें पोहोंचण्यापूर्वींच समजली.

राजा ती गडबड कसली आहे ह्मणून पाहतो तों, ही राणी आली असें समजून कर्पूरमंजरी कुरंगिकेला म्हणाली, 'प्रियसखे, हें काय आहे तें पाहून ये.'

कपिंजल म्हणाला, 'कशाला जातेस? राणीनें प्रियमित्राला (गुप्ताला) फसविलें असें वाटतें!'

कुरंगिका कर्पूरमंजरीला म्हणाली, 'बाई प्रियसखे, तूं आपल्याला फसवून महाराजांस भेटलीस, हें वर्तमान समजून राणी रागाऊन येत आहे! आणि तिच्या बरोबरच्या लोकांची ही गडबड आहे.'

हें ऐकून कर्पूरमंजरी घाबरली. ती राजाला म्हणाली, 'महाराज, मला आतां निरोप द्या. मी लवकर या सुरंगाच्याच वाटेनें परत जाऊन आपल्या ठिकाणीं बसतें. ह्मणजे राणीसाहेबांला याविषयीं संशय येणार नाहीं.'

हें ऐकून राजानें मोठ्या संकटानें तिला निरोप दिला. व कुरंगिकेसह कर्पूरमंजरी आपल्या ठिकाणीं गेली.

इकडे राणी मोठ्या आवेशानें राजाची चोरी नाटीवर पकडण्याकरतां ह्मणून आली होती; पण ती येण्यापूर्वींच

**कर्पूरमंजरी** तेथून गेल्यामुळें नाट सांपडलें नाहीं. तिनें राजावर आच राग काढला. कारण त्यानें चोरून **कर्पूरमंजरी**ची भेट घेतली, याविषयीं तिला मुळींच कांहीं शंका नव्हती. राजानें पुष्कळ लपंडावाच्या गोष्टी सांगून आपण निर्दोष आहें असें सिद्धकरून दाखविण्याचा प्रयत्न केला! पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं राणी अतिशय रागावून जनानखान्यांत निघून गेली.

**कर्पूरमंजरी** राजाच्या जवळ असतांना तिच्या दृष्टीस पडली नव्हती; तरी **कुमुदिका** व इतर सेवक यांच्या सांगण्यावरून ती राजाला भेटली, याविषयीं राणीची पक्की खातरी झाली होती. म्हणून तिणें जनानखान्यांत जातांच एकदम तिला प्रतिबंधांत ठेवण्याविषयीं हुकूम दिला. व त्याप्रमाणें सेवकांनीं **कर्पूरमंजरी** आपल्या महालांत होती तेथें जाऊन राणीच्या हुकुमावरून तिला प्रतिबंधांत नेऊन ठेविलें; व त्या विचारीवर मत्त पाहरा बसला!

---

## कलिका चवथी.

राजा **चंडपाल** ज्याच्यावर इतका आसक्त झाला

होता तें त्याचें प्रीतिपात्र ( **कर्पूरमंजरी** ) राणीनें प्रतिबंधांत ठेवलें, हें वर्तमान त्याला त्याविषयीं कळलें नाहीं. तरी राणी रागावून गेली आहे तेव्हां ती **कर्पूरमंजरी**वर राग काढील असें वाटून तो अस्वस्थ झाला होता. कामीपुरुषाला उचित असे विलाप करीत त्याणें ती रात्र कशीतरी काढली. दुसऱ्या दिवशीं तो आपला मित्र **कपिंजल** यासहवर्तमान कांहीं मसलतींत गुंतला होता. जनानखान्यांतील दास दासी वगैरे लोक राणीच्या हुकुमांतले असल्यामुळें ते तिच्या विरुद्ध कोणतीच गोष्ट राजाला कळवीत नसत. उघडच आहे, आधींच नवराबायकोंचा कलह; आणि त्यांतूनही मोठ्या लोकांचा. तेव्हां तशा प्रकरणांत ज्याला थोडी तरी अक्कल असेल तो कशाला पडेल? कसें झालें तरी तीं उभयतां एकच आहेत. वेळप्रसंगीं, मध्यें पडणाऱ्या हलक्यासलक्या मनुष्याच्या मात्र जिवावर बेतणार. ह्मणून **कर्पूरमंजरी**ला प्रतिबंधांत ठेवलें यागोष्टीचा राजाला मुळींच कोणी सुगावा लागूं दिला नाहीं.

असें होतें तरी राजाचा प्रियमित्र **कपिंजल** हा मोठा धूर्त व राजाच्या पक्षाचा असून त्याला राजवाड्यांत पाहिजे त्या ठिकाणीं जाण्याविषयीं मुळींच प्रतिबंध नव्हता.

व तो त्यांचेवर जनानखान्यांतली बातमी राजाला कळवीत असे. 'गेल्या रात्रीं राणी फार रागावून गेली. तव्हां तिणे **कर्पूरमंजरीला** कांहीं तरी शिक्षा केली असेल. तर त्याचें वर्तमान काढून ये,' असें राजानें सांगितल्यावरून **कपिंजल** अंतःपुरांत गेला. व त्याणें तिकडील समाचार आणला.

राजा **कपिंजलाला** अंतःपुरांत पाठवून आपल्या महालाच्या गच्चीवर इकडेतिकडे फिरून वेळ काढीत होता. इतक्यांत **कपिंजलही** लवकरच परत आला. यावेळीं **वसंत**ऋतूचे अखेरचे दिवस होते. **सूर्याचा** प्रकाश फार कडक झाला होता. राजा जेथें बसला होता तेथें व. छाया होती तरी हवेच्या उष्णतेमुळें व त्यांतूनही त्याचें मन अस्वस्थ असल्यामुळें त्याला फार काहिली होऊं लागली. तो ह्मणाला, 'गड्या **कपिंजला,** ऊष्मा फार होतो, वारादेखील सांप्रत कडक लागतो. आतां हा उन्हाळा आपण कसा सहन करावा? कारण कुसुमधन्वा भगवान् **मदन** याच्या तावडींत सांपडलेल्या मनुष्याला महानाग* झालेल्या **सूर्याचे** कठोर किरण ज्यांत आहेत

* येथे सूर्याला महानाग म्हटला आहे याचें कारण असें की, मेषादि बारा राशींत सूर्य परिभ्रमण करित असतो.

असा हा वसंतकाल व प्रियजनांशीं वियोग: या दोन्ही गोष्टी फारच असह्य होतात!'

राजाची ती अवस्था पाहून 'कपिंजल म्हणाला, 'मित्रा! कोणी कोणी मदनाला, पीडा देण्यास पात्र होत असतात, व कोणी ग्रीष्माला, अगदीं वाळवून टाकण्याला योग्य असतात, असें कोणाकोणाचें कांहींकांहीं होत असतें;

---

त्यांत मेष आणि तुला यांना विषुवसंक्रांति म्हणतात. कारण त्यांत रात्री आणि दिवस यांचे प्रमाण बहुतकरून सारखें असतें. निदान एक दिवस तरी अगदीं बरोबर होतें. दक्षिणायन आणि उत्तरायण असे जे वर्षाचे दोन विभाग आहेत त्यांत दक्षिणायनांत दिवस लहान होतात व उत्तरायणांत मोठे होत जातात. तेव्हां दिवसांचे लहान होणें याला तारुण्य व मोठे होणें याला म्हातारपण अशी कल्पना केली असतां दक्षिणायनाचा शेवटचा दिवस अथवा तुलासंक्रांतीपासून सूर्याचें वय गणूं लागलें असतां मेषसंक्रांतीपर्यंत तो पूर्ववयांत आहे असें मानतां येईल. आणि मेषसंक्रांतीच्या नंतर दिनमान वाढतें. तेव्हां अर्थात् सूर्याला म्हातारपण लागलें असें म्हणतां येईल. मेषसंक्रांत बहुधा चैत्रमहिन्यांत येते. तो हाच वसंतऋतूचा काल. चैत्र आणि वैशाख वसंतऋतूंत गणतां येतील. सांप्रत वसंतऋतूचे अखेरचे दिवस होते अर्थात् दिनमान चढलें होतें, म्हणून राजानें सूर्याला 'जरठ अथवा म्हातारा' म्हटलें आहे असें समजावें.

पण आमच्यासारख्या मनुष्याला गंडलेन्द तो काम बाधा करीत नाहीं, तापही देत नाहीं, व शोपही करीत नाहीं! आणि आम्हांस उन्हाळा मुळींच उपद्रव देत नाहीं.'

यावेळीं तेथें एक पाळींव पोपट जवळच्या झाडावर बसलेला होता. तो मोठा बोलका असून कोणी कांहीं बोललें तर त्याची थट्टादेखील करीत असे. ह्या राजवाड्यांतल्या बहुतेक सर्व मंडळींशीं त्याची पुष्कळ सलगी झाली होती. **कपिंजल** हा नेहमीं कांहींतरी नक्कल करीत असे हें त्याला माहीत होतें. **कपिंजलानें** वर सांगितल्याप्रमाणें भाषण केलें, तें ऐकून तो पोपट मध्येंच म्हणाला, 'तुला जर ताप होत नाहीं. तर मग तूं आपल्या डोक्यावर हा शेंडीचा बुचडा ठेवला आहेस तो कशाला? तो मुळापासून उपटून टाकून तुझें टक्कल केलें तर चालेल का?'

अकस्मात हे शब्द ऐकून **कपिंजल** काविराबावरा होऊन चहूंकडे पाहूं लागला. पोपटाचें तें बोलणें त्याला ऐकूं आलें; पण तो मात्र दिसला नाहीं. त्याचें बोलणें हुबेहुब मनुष्यासारखें असल्यामुळें **कपिंजल** गोंधळांत पडला. तें पाहून राजा हंसून म्हणाला, 'वेड्या **कपिंजला**, अरे, असा कावराबावरा काय होतोस? आपल्या वाड्यां-

तला पाळीव राघू स्वच्छंदानें फिरत फिरत येथें कोठें तरी झाडावर बसला असेल त्याचें हें बोलणें आहे.'

हें ऐकून **कपिंजल** रागावून म्हणाला, 'अरे रांडलेका, असा मातलास काय? थांब तुझी खोड मोडतों. रांडलेका तूं शलाकरण* करण्यास योग्य आहेस.'

हें ऐकून तो राघू म्हणाला, 'ऐकलें महाराज, तुमच्यासारखे लोक पाहिजे तें करण्यास मागें सरायचे नाहींत! पण मी हातीं सांपडलों मात्र पाहिजे. मला जर पंख नसतील तर तुम्ही तें देखील कराल!' असें बोलून तो, पोपट तेथून दूर उडून गेला.

तें पाहून राजा म्हणाला, 'अरे! हा तर उडूनदेखील गेला! गड्या **कपिंजला** तूं उगीच याला धमकावलास.' असें बोलून तो त्याच्याकडे पाहूं लागला.

---

* **शूलाकरण** हा शब्द संस्कृत असून बराच अप्रसिद्ध आहे तरी विशेष पाल्हाळ करण्यापेक्षां तोच शब्द योजावा हें बरें वाटल्यावरून तसें केलें. मराठींत याला प्रतिशब्द मुळीच मिळत नाहीं. मांस खाणारे लोक, ते अनेक, तऱ्हेनें शिजवून तयार करतात. त्यांपैकींच **शूलाकरण** ही एक रीत आहे. शूल म्हणजे लोखंडाचा कांटा त्याला टोंचून मास भाजून तयार करणे याला **शूलाकरण** म्हणतात.

राजाला एकसारखें कर्पूरमंजरीचें ध्यान लागलें होतें. राण्यानें मध्येंच थोडिशी मौज केली त्यामुळें त्याला तेवढावेळ विस्मरण झालें; पण तो उडून गेल्यामुळें पुन्हा मूळपदावर येऊन कपिंजलाला म्हणाला, "सख्या कपिंजला, सांप्रत दिवस तर खरोखरच मोठे झाले आहेत; पण माझ्यासारख्याला रात्रीदेखील मोठ्या वाट-तात. तसेंच ह्या चंद्रम्याकडे तर अगदीं पाहवत नाहीं. सूर्याचा प्रकाश एकसारखा दाह करतो. ह्या उन्हाळ्याच्या दिवसांत ज्याची अशी स्थिती होते तो दुर्दैवी असें म्हटलें पाहिजे, व त्याचें दैव त्याला तीक्ष्ण शस्त्रानें नेहमीं तोडून टाकीत आहे असें वाटतें! यावरून हा काल म्हणजे सर्वांलाच वाईट आहे असें नाहीं. प्रियजनांचा समागम झाला असेल तर हा फारच रमणीय वाटतो!

दोनप्रहरीं काहिली शांत होण्याकरतां अंगाला चंदन लावावें, व संध्याकाळपर्यंत ओलें वस्त्र अंगावर घ्यावें. तिसरा प्रहर झाला कीं सायंकाळपर्यंत जलक्रीडा करीत असावें, व संध्याकाळ होतांच कांहीं उपचारांनीं थंड-गार केलेली मदिरा प्राशन करावी आणि उत्तररात्रींत क्रीडा करावी. हे जे उपभोग सांगितले आहेत तेच या

'ग्रीष्मऋतूंत मदनाचे मोठे विजयी बाण आहेत. बाकीचे बाण या ऋतूंत अगदीं निष्फळ होतात.'

कपिंजल त्या पोपटावर रागावला होता; पण

---

" प्राचीन व अर्वाचीन सर्व ग्रंथकारांनी या कामाचें अनेक प्रकारें वर्णन केलें आहे. वस्तुतः त्याला रूप वगैरे कांहीं-एक नसून तो एक मानसिक विकार आहे. तथापि रंगेल्या कवींनीं त्याला मूर्तिमान् बनविला नंतर महादेवाच्या क्रोधाग्नींत त्याची आहुति घातली. लगेच त्याच्या प्रसादानें त्याला दुसरें शरीरदान करून दिलें. रति नावाची एक त्याला बायको करून दिली. फुलांचें धनुष्य कल्पना करून त्याला मोठा वीर बनविला. त्याचे अनेक बाण कल्पना केले. त्याचा रथ, ध्वज, पताका, इत्यादि सर्व कांहीं कल्पना केल्या. लोकोत्तर वर्णन करण्याविषयीं निपुण असे कवी हे एक दुसरे ब्रह्मदेवच आहेत. ज्या वस्तूचा मुळींच ठिकाण नाहीं; जिला रंग नाहीं, रूप नाहीं, अशी कां होईना ती वस्तु त्यांच्या हातीं सांपडण्याचीच कायती खोटी. लगेच ते तिला पाहिजे ते रूप देऊन हव्या त्या रितीनें तिचें वर्णन करतात! मदन ही एक तशापैकींच वस्तु आहे. या मदनाच्या बाणांची मोठी तारिफ करतात. व ते बाण एकच नसून अनेक कल्पना केले आहेत. तरी त्याला रूप, रंग वगैरे मुळींच कांहीं नाहीं. सर्व कल्पनासृष्टी आहे. सामान्यतः 'मदनाचे बाण' म्हटलें असतां त्यापासून येवढेंच ध्यानांत घ्यावें कीं; मनांत तो विकार उत्पन्न होण्याविषयीं अथवा त्याला उत्तेजन येण्याविषयीं साधनीभूत ज्या वस्तु तेच बाण होत.

राजानें दुसरा विषय काढल्यामुळें त्याला त्याचें विस्मरण होऊन त्याचें मन अंमळ शांत झालें. तो राजाचें भाषण ऐकून ह्मणाला, 'असें बोलूं नको. ज्यांची कांति पांढरी आहे अशीं नागवेलीचीं पानें, व सुवासिक कात्याच्या गोळ्या, आणि सुपारी, कापुराचा वास ज्याला लावला आहे असें चंदन, हे पदार्थ सेवन करणाऱ्या मनुष्याला हे उन्हाळ्याचे दिवस खरोखर आनंद कारक वाटतात.'

यावर राजा ह्मणाला, 'येथें दुसऱ्या प्राणखीं एका वस्तूचें वर्णन केलें पाहिजे. या वेळवांच्या बेटांत परस्परांचें घर्षण होऊन कानांला गोड असा जो शब्द ऐकूं येतो तो, व थंडगार उदकानें मिश्रित केलेली सुरा आणि चंदन अंगाला लावलेला प्रियजन हीं या उन्हाळ्या दिवसांत दिव्य औषधेंच आहेत!

शिरसाच्या फुलांचा गजरा वेणींत धारण करून दुपारीच्या फुलांचा हार जिनें आपल्या गळ्यांत घातला आहे, जिचें अंगावरचें वस्त्र फार बारीक असून ओलसर झालें आहे, अशा प्रकारची माझ्या आत्मनाची इच्छा करणारी ती प्रिया, खरोखरच यावेळीं माझ्या डोळ्यांपुढें दिसत आहे!'

**कपिंजल** ह्मणाला, 'गड्या, मला तर असें वाटतें

कीं; दोनप्रहरच्या वेळीं अंगाला ज्यांनीं चंदनाची उटी लावली आहे, व सायंकाळीं ज्यांनीं डोक्यावरून स्नान केलें आहे, पाण्यांत भिजविलेल्या वाळयाच्या विंझण्यानें ज्या वारा घेत आहेत, अशा स्त्रियांचा, मदन या दिवसांत केवळ चाकरच बनतो!'

याप्रमाणें पुष्कळ वेळ इकडचें तिकडचें वर्णन चाललें होतें. राजाचें लक्ष कायतें कर्पूरमंजरीकडे वेधलें होतें. त्याला दुसरी कोणतीच गोष्ट नको होती. कपिंजलाला त्यानें मुद्दाम तिचा समाचार आणण्याकरतां पाठवलें होतें व त्याप्रमाणें तो तिकडची बातमी घेऊन आला होता. तेव्हां राजानें दुसऱ्यातिसऱ्या गोष्टी सोडून आधीं कपिंजलानें काय खबर आणली आहे ती ऐकून घ्यावी हें योग्य होतें. तरी फार आतुर होऊन घाईघाईनें आपण विचारलें तर तोदेखील कदाचित् आपली थट्टा करील. म्हणून त्यानें बराचवेळ इकडच्या तिकडच्या गोष्टी केल्या व नंतर सहज त्याला म्हणाला, 'गड्या, तें असो; पण कांरे, तुला तिकडची (कर्पूरमंजरीची) कांहीं बातमी समजली आहे का?'

हें ऐकून कपिंजल छातीला हात लावून मोठ्या गर्वानें म्हणाला, 'हो हो! आमच्यासारखे चतुर लोक गेल्यावर

मग खानगी समजणार नाहीं म्हणजे काय? मला तिची सर्व हकीकत कळली आहे. आणि ती सांगतों देखील. काल सुरंगाच्या वाटेनें ती निघून गेल्यामुळें राणीला तेथें भेटली नाहीं; तरी तुझ्याशीं तिचें बोलणेंचालणें झालें हें राणीला समजलें. आणि तिणें कालच्या रात्रींच तिचा पक्का बंदोबस्त केला. मोठ्या मोठ्या शिळा घालून सुरंगाचें दार अगदीं बंद करून टाकलें व **अनंगसेना, कलिंगसेना, कामसेना, वसंतसेना,** आणि **विभ्रमसेना** अशा 'सेना' नांव धारणकरणाऱ्या पांच दासी, ज्या तिच्या सेवेंत नेहमीं हजर असत त्यांच्या हातांत तरवारी देऊन व आणखी कांहीं शिपाई त्यांच्या मदतीला देऊन त्यांना पूर्वेकडच्या बाजूला पाहऱ्यावर ठेवलें आहे! जें **मरकतपुंज** नांवाचें गृह रमणीयविलासांचें स्थान होतें तेंच राणीनें सांप्रत तिचें कारागृह केलें आहे. व त्याच्याच पूर्वेकडे वर सांगितलेलें सैन्य ठेवलें आहे.

याप्रमाणेंच **अनंगलेखा, चित्रलेखा, चंद्रलेखा, मृगांकलेखा** आणि **विभ्रमलेखा** ह्या 'लेखा' नावांच्या पांच दासी, हातांत धनुष्यबाण घेणार व भाते ज्यांनीं आपल्या पाठीस लावले आहेत अशा पुष्कळ शूर शिपायांसह दक्षिणदिशेला ठेवल्या आहेत. **कुंदमाला,**

**चंदनमाला, कुवलयमाला, कांचनमाला, बकुलमाला, मंगलमाला,** आणि **माणिक्यमाला** अशा 'माला' नांवाच्या सात दासी, बरोबर पुष्कळ शूर शिपाई देऊन पश्चिमेकडे ठेवल्या आहेत. **अनंगकेली, पुष्करकेली उत्पलकेली, कंदर्पकेली** आणि **सुंदरकेली** अशा 'केली' नांवाच्या पांच दासी, तरवारीनें लढणाऱ्या शिपायांसह उत्तरदिशेस पाहरा करण्याकरतां ठेवल्या आहेत. आणि यांच्यावर **मदिरावती, केलिवती, कलोलवती, तरंगवती** आणि **अनंगवती** अशा पांच 'वती' नांव धारण करणाऱ्या कुळंबिणीच्या तरुण मुली, ज्या पूर्वी राणीजवळ चोपदारणींचें काम करीत होत्या व ज्या मोठ्या चतुर, त्यांला सर्वांवर मुख्य अधिकारिणी केल्या आहेत. याप्रमाणें सभोंवतीं कडेकोट बंदोबस्त ठेऊन त्याबिचाऱ्या **कर्पूरमंजरीला** तेथें प्रतिबंधांत ठेवली आहे!'

हें ऐकून राजा ह्मणाला, 'वाहवा! राणीची तयारी किती तरी विलक्षण आहे! एखाद्या राजानें मोठ्या प्रबळ शत्रूला जिंकून आणलें असतां तो जसा त्याला बंदोबस्तांत ठेवतो, त्याप्रमाणें राणीनें **कर्पूरमंजरीला** कडक बंदोबस्तांत ठेवली आहे. तेव्हां आतां आपण बहुत-

करून तिची आशा सोडावी! पण ती वेटी सुटते कशी?'

इतक्यांत **सारंगिका** नांवाची एक दासी राणीकडून कांहीं निरोप घेऊन राजाजवळ आली. तिला पाहून **कपिंजल** ह्मणाला, 'मित्रा, ही वटकीची पोर कांहीं तरी तुझ्या राणीकडचा निरोप घेऊन येत आहे असें वाटतें? पाहूंया वरें ही काय सांगते ती.'

सांप्रत ग्रीष्मऋतु चालला होता, हें वर सांगितलेंच आहे. अर्थात् ज्येष्ठ महिना होता व **वटसावित्रीचें** व्रत जवळ आलें होतें. राणी **विभ्रमलेखा** तें व्रत मोठ्या थाटानें करीत असे. तिनें त्याकरतां एक मोठा मंडप तयार करून तेथें पुष्कळ आरास केली होती. व अनेक-प्रकारची सामुग्री जमविली होती. तेव्हां तो समारंभ राजानें पहावा अशी राणीची इच्छा होती म्हणून तिनें, ती आपली दासी **सारंगिका** हिला पाठविलें होतें.

**सारंगिका** राजाला मुजरा करून ह्मणाली, 'सरकार, बाईसाहेब विनंती करताहेत कीं, 'आजपासून चवथ्या दिवशीं **वटसावित्रीची*** पूजा व्हायची आहे त्याकरतां

* **वटसावित्री** हें व्रत तीन दिवस अथवा एक दिवस करण्याचा संप्रदाय आहे या व्रताची विशेष प्रसिद्धि करणारी **सावित्री**

त्यांणीं आज सर्वप्रकारची तयारी केली आहे ती क्रीडागृहाच्या गच्चीवर बसून आपण पहावी असें बाईसाहेबांचें ह्मणणें आहे.'

हें ऐकून राजा ह्मणाला, 'हो हो; आमच्याकडून अशा कामीं आळस कधींच व्हायचा नाहीं. जा, तुझ्या धनिणीला सांगऽकीं, आम्ही त्या गच्चीवर जाऊन बसतों.'

राजाची आज्ञा होतांच **सारंगिका** मुजरा करून राणीकडे निघून गेली. इकडे राजा आपला प्रियमित्र **कपिंजल** त्यासह त्या केलिगृहाच्या गच्चीवर जाऊन बसला. तेथून **वटसावित्री**व्रताकरतां केलेला मंडप अगदी जवळच होता व तेथें काय काय चाललें आहे तें सर्व चांगलें दिसत होतें. त्या मंडपांत स्त्रियांचा मोठा समाज जमलेला असून अनेकप्रकारच्या क्रीडा चालल्या होत्या. त्या पाहून **कपिंजल** राजाला ह्मणाला, 'मित्रा, पहा पहा तरी, ही काय गडबड चालली आहे

---

हिणें तीन दिवस व्रत केलें होतें व त्यामुळेच तें व्रत तीन दिवस करणेंच योग्य आहे. परंतु सांप्रत, निदान महाराष्ट्र देशांत तरी, हें व्रत एकाच दिवसांत पुरें करतात. वस्तुतः श्रद्धा कमी व शक्तिचा अभाव, व त्याकामीं उत्तेजन देणाऱ्या लोकांचा प्रतिकूळपणा इत्यादि कारणांनीं या व्रताची हेळसांड होते हें उघडच आहे!

ती! मोत्यांचे आणि हिऱ्यांचे सुंदर दागिने ज्यांणीं अंगावर घातले आहेत. व नृत्य करीत असल्यामुळें ज्यांच्या अंगावरचे पदर सरकले आहेत, व एकमेकीं बद्दल गीतें गाऊन पिचकाऱ्या भरभरून ह्या परस्परांच्या अंगावर सोडताहेत!

हा पहा दुसरीकडे आणखीं एक चमत्कार चालला आहे. ह्या नृत्य करणाऱ्या वर्त्तीसजणी स्त्रिया अनेकप्रकारांनीं नृत्य करीत आहेत. यांचीं पावलें नेमकीं तालावर पडताहेत. सांप्रत यांचा 'दंडरास'* नांवाच्या क्रीडेचा प्रकार चालला आहे. व नृत्यकरतेवेळीं यांचे–खांद्याला खांदा, डोक्याला डोकें, बाहूला बाहू, हाताला हात, हे कसे अगदीं एका समान रेषेंत दिसताहेत. आणि ज्या नृत्य करीत आहेत त्यांच्या समोर दुसऱ्या ताल देत आहेत. कांहीं स्त्रिया, ठिकठिकाणीं लावलेलीं कारंजीं मोकळीं करून तोट्यांचीं तोंडें फिरवून एकमेकींच्या अंगावर पाण्याची वृष्टि करीत आहेत. यांत कितीएक, शाई किंवा काजळ यासारख्या अत्यंत काळ्याकुट्ट असून त्यांणीं आपल्या वेणींत मोराचीं पिसें धारण केलीं आहेत. यांला पाहून प्रेक्षकांला मोठा विलक्षण चमत्कार वाटतो!

---

* 'रास' हा एक नृत्याचा प्रकार आहे. 'दंडरास' म्हणजे हातांत टिपऱ्या घेऊन नाचतात तो.

दुसऱ्या कितीएक स्त्रिया रौद्ररस उत्पन्न करित होत्सात्यां हातांत मांसाचा बलि धारण करणाऱ्या असून वरचेवर हुंकार सोडीत आहेत. यांनीं भयंकर वेष घेतला असून सांप्रत ह्या राक्षसांच्या स्त्रियांचा अभिनय करीत आहेत. कांहीं स्त्रिया उत्तम उत्तम वाद्यें वाजवीत आहेत. त्यांतल्यात्यांत कोणाचा पैंजण गळतो, कोणाची वेणी मोकळी होते, एकीचें हातांतलें वाद्यच खालीं पडतें, अशा अनेकप्रकारच्या मौजी होत असल्यामुळें परस्परांला विलक्षण हंसूं येत आहे!'

याप्रमाणें **कपिंजल** त्या समारंभाचें वर्णन करीत आहे, व राजा कौतुकानें तिकडे पहात आहे; इतक्यांत **सारंगिका** राणीकडे जाऊन तिला राजाचें उत्तर कळवून परत राजाकडे आली. व ती त्या उत्सवाच्या समारंभाचें विशेषरितीनें वर्णन करून दाखवूं लागली; तरी राजाला त्याचें फारसें कौतुक वाटलें नाहीं. कारण त्याचें मन कोणीकडे वेधलें होतें हें वर सांगितलेंच आहे. मन ठिकाणावर नसलें ह्मणजे कोणतीही गोष्ट आनंदकारक वाटत नाहीं.

राजाला **कर्पूरमंजरीचा** समागम होण्याची कांहीं आशा राहिली नव्हती. व यामुळें त्याचें मन मोठें चिंता-

श्रांत झालें होतें. 'दुसऱ्या कोणत्याही उपायानें आपला हेतु पूर्ण होण्यासारखा नाहीं. **भैरवानंद** अनुकूळ होईल तर तो मात्र आपला हेतु पूर्ण करील' असें राजाला वाटत होतें; ह्मणून त्यानें **कपिंजला**करवीं त्या मांत्रिकाला विनंति करविली. व त्याणेंही ती गोष्ट मान्य केली होती.

त्याचवेळ तो **वटसावित्री**चा उत्सव पाहून राजा **कपिंजला**सह आपल्या महालांत गेला. **भैरवानंदा**ला राजाची विनंती मान्य होती व त्याप्रमाणें करावें असें त्याच्या मनांत होतें. तरी राणीला एकदम सांगितलें तर ती, ही गोष्ट मान्य करील किंवा काय? यांविषयीं त्याला संशय होता. पण राजाच्या सुदैवानें **भैरवानंदा**चें सांगणें राणीनें अवश्य मान्य केलेंच पाहिजे असा योग लवकरच घडून आला.

राणीनें पद्मरागरत्नाची एक **गौरी**ची मूर्ति केली होती व तिची स्थापना करावी असें तिच्या मनांत होतें. कोणत्याही देवाची स्थापना वगैरे करणें झाली तर ती मोठ्या विद्वान् व तपस्वी मनुष्याच्या हातून करवायची हा सांप्रदायच आहे. त्याप्रमाणें, **भैरवानंदा**वर राणीची विशेष भक्ति होती ह्मणून, तिणें ती प्रतिमा त्याच्या-करवीं स्थापना करावी असा विचार करून त्याप्रमाणें

व्यवस्था करविली. ज्यावेळीं त्या मूर्तींची स्थापना केली त्यावेळीं स्वतः आपणही मंत्राची दीक्षा घ्यावी असें मनांत आल्यावरून राणीनें देवीच्या मंत्राची भैरवानंदाकडून त्याच प्रसंगीं दीक्षा* घेतली.

संप्रदायाप्रमाणें दीक्षेचा विधी आटपल्यावर गुरूला दक्षिणा दिली पाहिजे. त्यावांचून सांगता होत नाहीं, म्हणून राणीनें भैरवानंदाला दक्षिणेविषयी विनंती केली. ती म्हणाली; 'महाराज, माझ्या हातून देण्यासारखें असेल असें काय पाहिजे तें आपण मागावें.'

राजानें केलेली प्रार्थना भैरवानंदाच्या लक्षांत होतीच. त्याचा हेतु पुरविण्यास हीच उत्तम संधी आहे असें जाणून तो राणीला म्हणाला, 'जर अवश्यमेव

---

* 'दीक्षा' म्हणजे उपदेश. अर्थात् मंत्र एकणं. मंत्रशास्त्रकर्त्यांच्या नियमाप्रमाणें यथाविधि मंत्र ग्रहण करणं याला 'दीक्षा' असे म्हणतात. दीक्षेचा विधि फार मोठा आहे. त्यांत अनेक प्रकार आहेत, सौर, शाक्त, वैष्णव इत्यादिकांचे निरनिराळे सांप्रदाय असून त्यांच्या दीक्षेचे विधीही निरनिराळे आहेत. एका शाक्त संप्रदायांतच अनेक पोटभेद आहेत. त्यांचें वर्णन करूं गेलें असतां मोठा विस्तार होईल व वाचकांस त्याचा तादृश उपयोगही नाहीं म्हणून आम्ही तसे करीत नाहीं.

दक्षिणा द्यावी असें तुझ्या मनांत असेल तर मी सांगतों ती दक्षिणा दे.'॥

हें ऐकून राणी म्हणाली, 'गुरुमहाराज आज्ञा करतील तो मला मान्य आहे.'

**भैरवानंद** म्हणाला, 'बरें तर सांगतों एक. **लाट** नांवाचा प्रसिद्ध देश तुला माहितच असेल. त्या देशचा **चंडसेन**नांवाचा राजा आहे. त्याची **घनसारमंजरी** नांवाची एक कन्या आहे. तिच्या जन्मकाळीं ज्योतिष्यांनीं भविष्य केलें आहे कीं; 'ही मुलगी सार्वभौमराजाची स्त्री होईल.' तें त्या ज्योतिष्यांचें भविष्य अगदीं खरें आहे असें मलाही वाटतें. तेव्हां तूं आपल्या भर्त्याच्या हिताकरतां त्या मुलीचा त्याच्याशीं विवाह करून दे. हीच माझी गुरुदक्षिणा. यांत माझा हेतु पूर्ण होईल व तूंही आपल्या भर्त्याला सार्वभौम केलेंस असें होईल.'

वस्तुतः राणीला आपणहोऊन राजाचा विवाह करून देणें ही गोष्ट मान्य झाली नसती; पण त्या योगानें त्याला सार्वभौमपदवी प्राप्त होणार हें ऐकून तिला समाधान वाटलें. व गुरूच्या आज्ञेप्रमाणें त्याला दक्षिणा दिलीच पाहिजे होती. तेव्हां राणीनें तत्काल ती गोष्ट मान्य केली. व 'आज्ञेप्रमाणें विवाहाची तयारी करते' असेंही सांगितलें.

भैरवानंदानें कर्पूरमंजरीचाच राजाशीं विवाह करून देण्याची मसलत केली होती ; तरी पण त्याणें राणीला तिचें खरें नांव न सांगतां घनसारमंजरी हें नांव सांगितलें. 'घनसार' हें कर्पूराचेंच दुसरें नांव आहे. फक्त शब्दाचा मात्र भेद असून कर्पूरमंजरी आणि घनसार-मंजरी एकच.

त्याणें खरें नांव लपविलें यांतला हेतु फार निराळा होता. स्त्रियांचा स्वभाव मोठा चमत्कारिक असतो. नवऱ्यानें दुसरें लग्न करणें हें त्यांना बहुधा इष्ट नसतें. कदाचित् तसेंच कांहीं विशेष कारण असलें तर त्या तसल्या गोष्टी-लाही मान्य होतात; तथापि नवऱ्याला जी दुसरी बायको करून द्यायची ती आपल्या ताऱ्यांतली असावी, निदान आपल्या सख्यानें तरी तो संबंध जडलेला असावा ह्या गोष्टी त्यांच्या मनांत फारकरून असतात. नवऱ्यानें परभारें कोणत्याहि स्त्रीची भेट घ्यावी व त्या उभयतांचें जमावें हें त्यांना फार असह्य वाटतें. तात्पर्य इतकेंच कीं, कोणत्याही रितीनें नवऱ्याला आपल्या दाबांत ठेवण्याविषयीं त्यांचा प्रयत्न असतो.

कर्पूरमंजरीविषयीं राणीचा विशेष द्वेष होता असें नाहीं. भैरवानंदानें सांगितलें असतें किंवा तिच्या

मनांत आलें असतें तर, ती आपणहोऊनच राजाशीं तिचा विवाह करून देण्यास तयार झाली असती; पण **कर्पूरमंजरीनें** आपल्याच इच्छेनें, आपल्याला नकळत राजाची भेट घेतली व राजाही तिला अनुकूळ झाला, ही गोष्ट राणीला फार असह्य झाली होती.

**भैरवानंदाच्या** सांगण्यावरून राणीनें विवाहाची सर्व तयारी केली. हा विवाह **प्रमदोद्यान**नांवाच्या बागेंत एका मोठ्या वडाच्या झाडाखालीं **चामुंडेचें** स्थान होतें तेथें व्हावयाचा असें ठरलें होतें. कारण ती जागा **भैरवानंदाला** आपली मसलत सिद्ध करण्याविषयीं मोठी सोईची होती. **कर्पूरमंजरीला** राणीनें ज्या ठिकाणीं प्रतिबंधांत ठेविली होती तेथून गुप्तरितीनें येण्याविषयीं थेट त्या वडाच्या मुळापर्यंत एक सुरंग तयार केला होता. व **चामुंडा**देवीही तेथें पूर्वीपासून नव्हती. त्या सुरंगाच्या तोंडावर झांकण घालावयाचा जो दगड केला होता त्यावर **चामुंडेचा** आकार खोदून शेंदूर वगैरे लावून **भैरवानंदानें** ती एक देवी बनविली होती. पण त्या सर्व गोष्टी राणीला मुळींच माहित नव्हत्या. गुरूच्या आज्ञेप्रमाणें विवाहाची तयारी करून राणीनें आपली दासी **सारंगिका** हिला राजाला बोलाविण्यास पाठविलें.

**सारंगिका** राजाला मुजरा करून ह्मणाली, 'सरकार, बाईसाहेब विनंती करताहेत कीं, आज संध्याकाळीं गोरज मुहूर्तावर आपलें लग्न करायचें!'

हें ऐकून **कपिंजल** राजाला ह्मणाला, 'अरे बुवा हें काय? हें अकालींच काय कुभांड रचलें आहे!'

राजालाही त्यांतलें कांहीं कळलें नव्हतें. ह्मणून तो **सारंगिके**ला ह्मणाला, 'अग, अंमळ विस्तारपूर्वक काय तें सांग.'

राजाचा हुकूम झाल्यावरून **सारंगिके**नें मुळापासून झालेली सर्व हकीकत सांगितली. व 'आज गुरुदक्षिणे-करितां हा विवाह व्हायचा आहे.' असें तिणें कळविलें.

तें ऐकून **कपिंजल** ह्मणाला, 'वाहवा! हें सगळें थोतांड आहे. कोठें **लाटदेश**, कोठें ती राजकन्या आणि कोठें **भैरवानंद**? कशास कांहीं ठिकाण नाहीं. आज येथें लग्नाची तयारी आणि **लाटदेशां**त नवरी मुलगी! हें आहे तरी काय?'

**भैरवानंदा**नें **घनसारमंजरी** हें नांव बदललें ती गोष्ट कोणाच्याच लक्षांत आली नाहीं. **कपिंजला**लाही तें ठाऊक नव्हतें, ह्मणूनच तो असें ह्मणाला. तरी पण **भैरवानंदा**चा प्रभाव विलक्षण आहे याविषयीं राजाची

खात्री होती. **कपिंजलानें** उपहास केला. तेव्हां तो ह्मणाला, 'अरे, असें काय ह्मणतोस? त्या **भैरवानंद-जांचा** प्रभाव तुला माहित नाहीं काय? त्यांनिवशीं एकाक्षणांत **कर्पूरमंजरीला** कोठून आणिली हें तूं पाहिलें नाहींस का?' **सारंगिकेला** ह्मणाला, 'अग, यावेळीं **भैरवानंदजी** कोठें आहेत?'

**सारंगिका** ह्मणाली, '**प्रमदोद्यानांतल्या** त्या वडाच्या झाडाखालीं ते आणि बाईसाहेब आपली वाट पहात बसलीं आहेत. आणि हा कौतुकाचा विवाहसमारंभही तेथेंच व्हायचा आहे. तर आपण येथेंच क्षणभर बसावें. मी पुन्हां लौकरच आपल्याला बोलविण्यास येईन' असें सांगून दासी निघून गेली.

तिणें सांगितलेली हकीकत ऐकून राजा **कपिंजलाला** म्हणाला, 'गड्या, हें सर्व **भैरवानंदाचें** कारस्थान आहे असें वाटतें!'

**कपिंजल** ह्मणाला, 'हो हो, यांत काय संशय? तुझ्या सांगण्यावरून मी जेव्हां त्याला विनंती केली; तेव्हां त्याणें कबूलच केलें होतें. **चंद्रावाचून** चंद्रकांत मण्याच्या पुतळीला पाझर आणण्याचें दुसऱ्या कोणाचें

सामर्थ्य आहे? शरदृतूंतल्या वाऱ्यावांचून निर्गुंडीच्या फुलांचा बहर आणण्याचें कोणाचें सामर्थ्य आहे?'

इकडे राणीनें विवाहाची सर्व तयारी केली. **भैरवानंद** त्या वडाच्या झाडाखालीं जाऊन बसलाच होता. राणीनें तेथें जाऊन त्याला तयारी झाली असल्याचें कळविलें व ती पुन्हा कांहीं कामाकरितां आपल्या महालांत गेली. इकडे **भैरवानंदानें** हळुच त्या सुरंगाच्या दारावर बसविलेली **चामुंडा** देवीच्या आकाराची शिळा काढून **कर्पूरमंजरीला** बाहेर आपल्याजवळ आणली. तिणें **भैरवानंदाला** नमस्कार केला. तेव्हां 'तुला योग्य असा मनाजोगता वर मिळो' असा त्याणें तिला आशीर्वाद दिला, व आपल्या जवळ बसवून घेतलें.

इतक्यांत राणी लगबगीनें पुन्हा **भैरवानंदाकडे** आली. तिणें **चामुंडेला** नमस्कार करून **भैरवानंदाला** नमस्कार केला. व पाहते तों **कर्पूरमंजरी** त्याच्याजवळ बसल्याचें दृष्टीस पडलें. तिला पाहून **भैरवानंदाचें** राणीला मोठें आश्चर्य वाटलें. कदाचित् त्याणें तिला आणली असेल असें ती मनांत समजली. **भैरवानंदाच्या** आज्ञेप्रमाणें **घनसारमंजरीचा** विवाह करून देण्याचें तिणें कबूल केलें होतें. पण

**कर्पूरमंजरी**च्या विवाहाविषयीं तिची मान्यता नव्हती. ह्मणून ती कांहींशी रागावली. तरी-ही खरोखरीच **कर्पूरमंजरी** आहे, किंवा **भैरवानंदानें** सांगितलेली **धनसारमंजरी** आहे याविषयीं तिला संशय आला. व **भैरवानंदा**ची चांगली खावड काढावी असेंही तिच्या मनांत आलें. तथापि पुर्ती खात्री झाल्यावांचून कांहीं बोलूं नये, ह्मणून **कर्पूरमंजरी**ला जेथें प्रतिबंधांत ठेवली होती तेथें जाऊन तिला पाहून यावें असें तिच्या मनांत आलें; पण कांहीं निमित्ताशिवाय परत जाणें योग्य नाहीं ह्मणून ती **भैरवानंदा**ला ह्मणाली; 'महाराज, विवाहाचें बाकीचें सर्व साहित्य येथें तयार आहे; पण मंगळसूत्र आणि अष्टपुत्री वगैरे कांहीं जिनसा मी आपल्या महालांत ठेवल्या आहेत. त्या आणायला विसरलें, तर लौकर जाऊन घेऊन येतें.'

**भैरवानंदानें** नसें कर ह्मणून सांगितल्यावरून राणी तेथून लौकर लौकर थेट **कर्पूरमंजरी**ला जेथें प्रतिबंधांत ठेवली होती तिकडे गेली.

राणी यावेळीं कां गेली, व कोठें गेली हें **भैरवानंदा**च्या लक्षांत आल्यावरून त्याला हंसूं आलें., व 'ही **कर्पूरमंजरी**, ठेवल्याठिकाणीं आहे किंवा नाहीं हें

पाहण्याकरतां गेली आहे, ' असें समजून तो **कर्पूरमं-जरीला** ह्मणाला, 'मुली, **कर्पूरमंजरी** हें तुला मी सुरंगाचें दार उघडें करून देतों. लवकर लवकर जा आणि पूर्वी ज्याठिकाणीं होतीस त्याठिकाणीं जाऊन बैस. राणी तेथें तुला पहावयास गेली आहे. ती पाहून परतली ह्मणजे ती तेथें येऊन पोहोंचण्याच्यापूर्वी हळूच माझ्याजवळ येऊन बैस.'

**कर्पूरमंजरी** स्वतः मोठी हुषारच होती. **भैरवानंदानें** काय सांगितलें तें तेव्हांच तिच्या लक्षांत आलें. व ती त्या सुरंगाच्या वाटेनें लौकरलौकर आपल्या ठिकाणीं जाऊन बसली. इतक्यांत राणीही तेथें येऊन पोहोंचली. आणि पाहते तों **कर्पूरमंजरी** ठेवल्या ठिकाणीं बसली आहे! हें पाहून तिला मोठें आश्चर्य वाटलें. ती म्हणाली, 'ही तर येथें बसली आहे. आणि मघां **भैरवानंदा**जवळ जी मी पाहिली ती कोण? दोघींचा चेहरा मोहरा अगदीं एकसारखा आहे स्वरूपांत कोणत्याही प्रकारचें अंतर नाहीं. तेव्हां हा काय चमत्कार! मला असें वाटतें कीं **भैरवानंदा**जवळ बसलेली ती दुसरी कोणी असून दोघींचें रूप अगदीं एकसारखें असल्यामुळें मला टीच **कर्पूरमंजरी** असें वाटलें असावें?' **कर्पूरमंजरीला** ह्मणाली, 'बाई **कर्पूरमंजरि**, तुझी प्रकृति कशी काय आहे?

हें ऐकून **कर्पूरमंजरी** ह्मणाली, 'मला कांहीं वेदना होत आहेत.'

ह्या उत्तराबर राणी मुळींच कांहीं बोलली नाहीं. कारण प्रतिबंधांत ठेवल्यामुळें तिला वेदना होणें हें अगदीं साहजिकच आहे व त्यांचा परिहार करायचा झाला तर प्रतिबंधांतून सोडविण्यावांचून दुसरा कांहींच उपाय नाहीं व तसें करणें तर इष्ट नव्हतें, तेव्हां अर्थात् राणीला बोलण्यास कांहीं मार्गच राहिली नव्हता. ती मनांत ह्मणाली, 'आतां आपण परत **भैरवानंद** बसला आहे तेथें जावें' असा विचार करून बरोबर सख्या होत्या त्यांला ह्मणाली, 'अग, मी **प्रमदोद्यानां**त जातें. तुह्मी विवाहाचीं उपकरणें घेऊन लौकर तिकडे या.'

राणीच्या आज्ञेप्रमाणें सख्या तिच्या महालाकडे गेल्या. व ती **भैरवानंद** बसला होता तेथें परत आली. **मरकतपुंजगृहां**त **कर्पूरमंजरी**ला अडकावून ठेविलें होतें. राणी आंत असेतोंपर्यंत **कर्पूरमंजरी**-तेथेच होती. राणी बाहेर निघतांच पाहाऱ्यावर ठेवलेल्या दासींनीं दरवाजा लावून घेतला. त्याबरोबर **कर्पूरमंजरी**ही लौकर लौकर सुरंगाच्या वाटेनें बाहेर निघून-राणी तेथें येण्यापूर्वींच-**भैरवानंदा**जवळ येऊन बसली.

राणी **भैरवानंदा**जवळ येऊन पाहते तों **कर्पूरमंजरी** पुन्हां तेथें बसलीच आहे! हें पाहून तिला फारच आश्चर्य वाटलें व एकंदरींत ती मोठ्या गोंधळांत पडली. **कर्पूरमंजरी** अगदीं थोड्या वेळांत कोणाला नकळत **मरकतपुंज**गृहांत गेली व परत आली ही गोष्ट राणीला मुळींच माहित नव्हती. सुरुंगाचें साधन आहे हें तिला अगदीं ठाऊक नव्हतें. आसपास कांहीं खुणाखाणा दिससतील ह्मणावें तर सुरुंगाची वाट **भैरवानंदा**नें इतकी गैमालूम केली होती कीं, तिच्या दारावरच्या शिळेवर **चामुंडा**देवीची मूर्त्ति केल्यामुळें त्या संबंधानें कोणाला मुळींच कांहीं संशय येण्यासारखा नव्हता.

याप्रमाणें गोंधळांत पडलेल्या राणीला **भैरवानंद** ह्मणाला, 'वत्से **विभ्रमलेखे**, विवाहाचें सामान घेऊन आलीसना? ' पहिल्या खेपेप्रमाणेंच या खेपेसही राणीला संशय आला होता तेव्हां पुनरपि **मरकतपुंज** गृहांत जाऊन **कर्पूरमंजरी** तेथें आहे किंवा नाहीं हें पहावें असें तिच्या मनांत आलें. ह्मणून ती **भैरवानंदाला** ह्मणाली, 'होय आणलें आहे; पण **घनसारमंजरी**च्या अंगावर घालण्याजोगते दागिने काढून ठेवले होते ते आणायला विसरलें. तर आतां पुन्हा एकवेळ

जाऊन येतें' असें सांगून राणी आपल्या महालाकडे जाण्याचें निमित्त करून पुनरपि मरकतपुंजगृहाकडे निघून गेली.

भैरवानंदाला तिचा हेतु समजून चुकलाच होता. त्याणें पुन्हां कर्पूरमंजरीला पूर्वीप्रमाणें करण्याविषयीं सांगितल्यावरून ती सुरुंगाच्या वाटेनें लौकर स्वस्थळीं जाऊन बसली. इकडे राणी दार उघडून आंत गेली व पहाते तों कर्पूरमंजरी आपली तेथें आहेच! हें पाहून तिला फारच अचंबा वाटला. आणि विचार करून ती मनांत ह्मणाली, 'छे! मी अगदीं वेडी झाले आहें! दोघींचें रूप एकसारखें असल्यामुळे मी फसलें। ध्यानरूपी विमानांत बसून पाहिजे तिकडे संचार करणारा महायोगी भैरवानंद याचा हा सर्व चमत्कार आहे. त्याणें योगसामर्थ्यानें लाटदेशांतून त्या घनसारमंजरीला लौकरच आणलें असेल. व तिचें आणि या कर्पूरमंजरीचें अगदीं सादृश्य असल्यावरून मी वेड्यासारखी इकडून तिकडे आणि तिकडून इकडे येरझाऱ्या घालीत आहें!'

नंतर—'भैरवानंदाला सांगितल्याप्रमाणें—दागिने घेऊन या' असें दासीला सांगून राणी पुन्हां त्या योग्याजवळ

थेऊन पोहोंचली. **भैरवानंदानें** तिला बसावयास सांगितलें. इकडे राजा, **सारंगिकेनें** पूर्वी सूचना दिल्याप्रमाणें बोलावण्याची वाट पाहत बसला होता. इकडची सर्व तयारी होतांच **भैरवानंदानें** त्याला बोलावून आणण्यास सांगितलें. तेव्हां **सारंगिका** जाऊन **कपिंजलासह** राजाला घेऊन आली. राणी खालीं बसते आहे. इतक्यांत राजाही तेथें येऊन पोहोंचला. त्याला पाहतांच **भैरवानंदानें**–'महाराजाला आसन आणा' ह्मणून सांगितलें व त्याप्रमाणें सेवकांनीं आसन आणून दिलें.

**कर्पूरमंजरी** पूर्वीप्रमाणें, राणी तेथें येण्याच्या आधींच **भैरवानंदाजवळ** येऊन बसली होती. राजा तिला लक्षपूर्वक पाहून म्हणाला, 'ही मूर्त्ति धारण करणारी मकरध्वजाची केवळ मृगयाच आहे. शृंगाररसाच्या शोभेनेंच जणुं काय हें प्रत्यक्ष रूप धारण केलें आहे! दिवसा संचार करणारी पौर्णिमेच्या रात्रीची पूर्ण चंद्रिका व गुणरूपरत्नांची पेटी, अशी ही सुंदरी साक्षात् **लक्ष्मीच** आहे. हिच्या रूपाची शोभा त्रिभुवनालाही जिंकणारी आहे. हें रूप जसें जसें एखाद्या मनुष्याच्या विशेश विशेश दृष्टीस पडत जाईल; तसें तसें त्याच्या चित्तांत,

ज्यानें धनुष्याला बाण लावले आहेत असा भगवान् **कामदेव**, विषेशप्रकारें वास्तव्य करील!'

**कपिंजल कर्पूरमंजरी**ला पाहून राजाला हळूच ह्मणाला, 'मित्रा, तूं हिच्या सौंदर्याचें वर्णन केलेंस तें अगदीं खरें आहे! तथापि इतक्यांत असें उघड उघड तूं बोलूं नको. तुला वाटत असेल की आतां आपल्याला हिची प्राप्ति झाली, तेव्हां राणीचें काय भय आहे? पण ही तुझी मोठी चूक आहे. 'अरे नांव अगदीं तडीला लागली तरी जमिनीवर उतरेपर्यंत गाफल राहूं नये. तर एकदांचें लग्न लागेपर्यंत तूं उगीच मुकाट्यानें बैस.'

**भैरवानंदा**जवळ असलेली ही **घनसारमंजरी** व आपण प्रतिबंधांत ठेवली आहे ती **कर्पूरमंजरी**, ह्या दोघीही अगदीं निरनिराळ्या आहेत अशी राणीच्या मनाची खात्री झाली होती. म्हणून राजाशीं लग्न लावण्या-बद्दल तिनें कांहीं आढेवेढे घेतले नाहींत. **कुरंगिका**नांवाची दासी जवळ होती तिला राजाला अलंकार वगैरे घालून सजविण्यास सांगितलें व **सारंगिका** नांवाच्या दुसऱ्या दासीला **घनसारमंजरी**ला अलंकार घालण्यास सांगि-तलें. त्याप्रमाणें त्या दोघींनीं राजा व **कर्पूरमंजरी** यांला सजवून तयार केलीं. तें पाहून **भैरवानंद** राणीला

ह्मणाला, 'हं, आतां लग्नाचा मुहूर्त जवळ आला. तुमचा पुरोहित कोठें आहे त्याला लौकर बोलावून आणा.'

हें ऐकून राणी राजाकडे पाहून ह्मणाली, 'आर्यपुत्र, आतां यावेळीं उपाध्येबुवांला बोलवून आणण्याची सवड राहिली नाहीं. तर हा आर्य **कपिंजल** बसला आहे हाच कां उपाध्येपण करीना? हा मोठा पंडित नसला तरी अरण्यपंडित तर आहे! काय मंत्रतंत्र ह्मणावयाचें तें सर्व हाच ह्मणेल म्हणजे झालें.'

हें ऐकून **कपिंजल** पुढें होऊन ह्मणाला, 'हो हो, हा पहा मी तयार आहें.' राजाजवळ जाऊन ह्मणाला, 'आतां अवरानवरीच्या वस्त्रांची गांठ देतों. मित्रा ( राजा ) तूं आपल्या उजव्या हातानें **कर्पूरमंजरी**चा उजवा हात धर ह्मणजे झालें!'

**भैरवानंदानें** हावेळपर्यंत **घनसारमंजरी** हें दुसरें नांव ठेवून **कर्पूरमंजरी**चा विवाह करण्याची मसलत चालविली होती, हें **कपिंजलाला** मुळींच ठाऊक नव्हतें. त्याणें चुकून तिचें नांव घेतलें तें ऐकून राणी चपापून म्हणाली, 'अरे! **कर्पूरमंजरी** येथें कोठें आहे?' **कपिंजलाची** चूक **भैरवानंदाच्या** तेव्हांच लक्षांत आली. त्याला कसेंहीकरून आपली बाजू साधून घ्याव-

याप्रमाणें राजानें प्रार्थना केल्यावरून **भैरवानंदानें** युक्तिप्रयुक्ती करून **कर्पूरमंजरीचा** त्याच्याशीं विवाह करून दिला. तें कार्य निर्विघ्नपणें शेवटास गेलें तरी राणी रागावून गेली यामुळें राजा फार अस्वस्थ झाला होता. **भैरवानंद** हा तिचा गुरु होता. तेव्हां त्याणें दोन समाधानाच्या गोष्टी सांगून **विभ्रमलेखेचें** मन प्रसन्न केलें, व तिणें **कर्पूरमंजरीला** मोठ्या प्रेमानें स्वीकारलें. नंतर **भैरवानंद** राजाला ह्मणाला, 'महाराज, आतां मी येतों. आह्मी तपोवनांत राहणारे लोक; आह्मास नगरांत राहणें काय कामाचें? तुमच्या लोभास्तव आज बरेच दिवस मी येथें घोंटाळत आहें. तर आतां मला तुझा निरोप असावा,' असें सांगून त्याणें राजाचा व राणीचा निरोप घेतला. सर्वांला आशीर्वाद देऊन राजाला ह्मणाला 'महाराज, तुझें आणखीं काय प्रिय करावें तें सांग?'

राजा ह्मणाला, 'महाराज योगीश्वर, यापेक्षां दुसरें प्रिय ह्मणून काय व्हावयाचें राहिलें? **कुंतलदेशच्या** राजाची कन्या **कर्पूरमंजरी** हिच्या हाताच्या स्पर्शानें जें सुख प्राप्त झालें आहे, त्यापुढें स्वर्गही तुच्छ झाला आहे. चक्रवर्ती ही पदवी धारण करून ह्या **कर्पूरमंजरीच्या** शुभ

दैवाच्या साह्यानें मी लौकरच सर्व पृथ्वीचे
णार आहें. तेव्हां आणखीं काय पाहिजे! तथ
माग झगतां तर येवढ्या गोष्टी होवोत. सत्पुरु
आनंदित असोत! दुष्टांला दुःख प्राप्त होवो! व
आशीर्वाद खरे होवोत! मेघ यथाकालीं यथायोग
करोत! लोक लोभपराङ्मुख होऊन धर्मावर श्रद्धा ठे
ह्या सर्व गोष्टी व्हाव्या अशी माझी प्रार्थना आहे.'

याप्रमाणें राजाची प्रार्थना ऐकून—'परमेश्वर तु
मनोरथ पूर्ण करील' असें सांगून **भैरवानंद** तेथल्यातेथेंच
अदृश्य झाला. इकडे राजा, राणी **विभ्रमलेखा** व
**कर्पूरमंजरी** यांसहवर्त्तमान मोठ्या आनंदांत सुखाचा
उपभोग घेता झाला.

**समाप्त.**

TATTVA-VIVECHAKA "PRESS."